# माणूस

शनिवार । ४ डिसेंबर १९७६ । साठ पैसे

## साहित्यिक पत्रपंडित

लेखक उदंड असतात. छाप पाडणारे लेखक मात्र थोडे. भाऊसाहेब माडखोलकरांची गणना अशा थोड्यांमध्ये करावी लागेल. ज्या काळात बांधिलकी हा शब्द प्रचारात नव्हता, साहित्य आणि समाज या विषयांवर परिसंवाद झडत नव्हते, साहित्यिकांच्या गळ्यात कुणी जबाबदारीचे ढोलही अडकवलेले नव्हते, त्या काळात भाऊसाहेबांनी ' मुक्तात्मा ' लिहिली आणि महाराष्ट्रात नव्यानेच उदयास आलेल्या एका प्रभावी राजकीय विचारसरणीची ओळख प्रथमच अनेकांना त्यामुळे झाली. साहित्यिक त्या काळात न सांगता सवरता, सहजप्रवृत्तीने समाजात वावरत होते, जेथेजेथे काही जीवंत आणि पुरोगामी प्रवृत्ती आढळून आल्या, त्यांपैकी काहींचे आपल्या कलाकृतीत कळतनकळत त्यांनी चित्रण केले. फडके-खांडेकर-माडखोलकर या त्या काळच्या त्रिमूर्तीपैकी कुणीही याला अपवाद नव्हते. फडक्यांचा भर सौंदर्यनिर्मितीवर तर माडखोलकर-खांडेकरांचा ध्येयवादित्वावर असला तरी या तिघांच्याही कलाकृती वाचून समाजमन भारावले जात असे, यात काही शंका नाही. प्रत्येकाची नविन कलाकृती ही एक ' घटना ' ठरत असे व तिचे सादपडसाद समाजजीवनात बऱ्याच काळ उमटत राहात. भाऊसाहेबांच्या मुक्तात्म्याने केवढे वादळ त्या काळात उठवले होते ? त्यातील चंद्रशेखर कोण हे न सांगताही सगळ्यांना उमजत होते आणि तो कादंबरीभर मांडत असलेल्या विचारसरणीने संवेदनाशील तरूण मने भारली जात होती, त्या डाव्या चळवळीकडे ओढली जात होती. पुढे ही चळवळच शब्दात अडकली, चाकोरीत रुतली म्हणून कुणी लेखकही तिकडे फिरकला नाही व बांधिलकीची ओरड करणे, ही विचारसरणी धारण करणाऱ्यांना भागच पडले, हे वेगळे. खरे तर चळवळ अगोदर असते, साहित्य मागोमाग निर्माण होत राहते. त्याला बोलावून आणावे लागत नाही. माडखोलकर ज्या काळात उदयास आले, वावरले तो काळ सर्व क्षेत्रातील चळवळींनी अगदी गजबजून गेलेला काळ होता. एकीकडे रविकिरणांची कोवळी बरसात होती. दुसऱ्या टोकाला सावरकर-भगतसिंगांचे रौद्रोदात्त क्रांतिपर्व होते. गांधीजींची स्वराज्ययात्रा सुरूच होती. कोणताही लेखक या सगळ्या उसळत्या प्रवाहांपासून अलिप्त राहूच

# साप्ताहिक माणूस

**वर्ष सोळावे – अंक सत्ताविसावा**

**४ डिसेंबर १९७६**

**मूल्य : साठ पैसे**

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये

सहामाही वर्गणी : वीस रुपये

परदेशाची वर्गणी : पंचावन्न रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


....पृष्ठ एक वरून

शकत नव्हता. त्या काळच्या कवितेतून, कथातून, कादंबऱ्यातून कमीजास्त प्रमाणात या सर्व प्रवाहांचे प्रतिबिंब उमटलेले दिसेल. माडखोलकरांच्या कादंबऱ्यातून तर विशेषच. कारण त्यांचा या प्रवाहांशी निकटचा, साक्षात संबंधही होता. तरीपण त्यांना आधुनिक अर्थाने प्रतिबद्ध साहित्यिक मानता येणार नाही. साहित्य आणि समाज यांच्यातील नैसर्गिक सहजसंबंधच त्यांना अधिक मोलाचा व महत्त्वाचा वाटत होता. एखाद्या तत्त्वज्ञानाची, विचार-सरणीची किंवा कार्यक्रमाची बांधिलकी पत्करून श्रेष्ठ साहित्यनिर्मिती होऊ शकते, असे त्यांनी केव्हाही प्रतिपादन केले नाही–'मुक्तात्मा' सारखी पहिली प्रभावी राजकीय कादंबरी लिहूनही. तो खळबळजनक आणि तरीही मोकळा असलेला कालखंडच साहित्यनिर्मितीला फार अनुकूल होता. अशा अनुकूल कालखंडात वावरलेल्या भाऊसाहेबांसारख्या साहित्यिकांचा आज कुणाला हेवा वाटणार नाही ?

भाऊसाहेब पत्रकारही होते. त्यांच्यातला साहित्यिक थोर की पत्रकार मोठा हा नेहमी एक चर्चेचा विषय असे. असल्या चर्चा शेवटी निरर्थक आणि वेळ घालवायला बऱ्या असतात, हेच खरे. दोन्ही हातांनी युद्ध करणाऱ्याला आपण विशेष मोठा मानतोच. तसेच भाऊसाहेबांच्या बाबतीत म्हणायला हवे. ते 'भंगलेले देऊळ' ही लिहू शकत होते आणि आपल्या वृत्तपत्रातून अनेक चालू वादही खेळत–खेळवत होते. अर्थात केवळ वाद लढवले म्हणजे पत्रकार–निदान त्या काळात तरी–होता येत नसे. अनेक चळवळींचे प्रवर्तन व पुढारीपणही पत्रकाराला करावे लागे आणि भाऊसाहेबांनी हे सर्व त्या त्या वेळी खंदेपणाने केलेही. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा पहिला अध्याय त्यांनीच लिहिला. आंबेडकरांच्या विविध चळवळींना केवढा भरघोस पाठिंबा ! विनोबांच्या भूदानाची चिकित्सा आलीच. मला आठवते, भाऊसाहेबांचा एक भूदानाचार्यांवरचा प्रचंड लेख मी पवनारमध्ये मुक्कामाला होतो त्याच दिवशी प्रसिद्ध झाला होता आणि अनेक आश्रमवासीय त्यामुळे भाऊसाहेबांवर नाराज झाले होते. पण भाऊसाहेबांना याची फिकिर नव्हती. कारण लेखात टीका असली तरी विनोबांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा त्यात कुठेही अधिक्षेप नव्हता. या एका लेखातच भाऊसाहेबांच्या वृत्तपत्रीय लिखाणाची सर्व वैशिष्ट्ये प्रकट झालेली होती. विदग्ध भाषासौंदर्य, विचारांचा पल्लेदारपणा, डौलदार मांडणी–अशा गुणवैशिष्ट्यांनी दोन तपे त्यांनी 'तरुण भारत' समृद्ध केला, विदर्भातील सुशिक्षित जनतेची साहित्य, संस्कृती आणि राजकारण या क्षेत्रा-तील अभिरुची संपन्न केली. कुठल्याही वृत्तपत्राने अभिमान बाळगावा अशीच ही कामगिरी आहे.

कॉलेज शिक्षण न घेता साहित्य आणि पत्रकारिता या दोन्ही क्षेत्रात इतके चतुरस्र आणि सर्वमान्य यश संपादन केल्याचे दुसरे उदाहरण महाराष्ट्रात नसावे.

स्वतंत्र वृत्तीच्या या चतुरस्र साहित्यिक पत्रपंडिताला 'माणूस' आपली नम्र श्रद्धांजली वाहत आहे. **–श्री. ग. मा.**

# चीन

## नेतृत्व-संघर्षाचे स्वरूप

वा. दा. रानडे

चीनच्या फुकेन प्रांतातील लष्करी पथकाचे बंड मोडून काढण्यासाठी अध्यक्ष हुआ कुओ फेंग यांनी तेथे फौजा पाठविल्याच्या बातम्या आहेत. हे बंडखोर सैनिक माओंची पत्नी चिआंग चिंग यांच्या गटाचे होते, असे या वातम्यात म्हटले आहे. 'शांघाय चौकडी' म्हणून हा जहाल गट ओळखला जातो. माओंच्या निधनानंतर हुआ यांनी जास्तीत जास्त सत्ता आपल्या हाती केंद्रित करून आपले स्थान बळकट केले. लष्करी नेत्यांचा पाठिंबा हा त्यांच्या सत्तेचा महत्त्वाचा आधार, पण फुकेन प्रांतात लष्करी पथके बंड करतात आणि ते मोडण्यासाठी हुआ यांना फौजा पाठवाव्या लागतात, याचा अर्थ चीनमधील सत्तासंघर्ष अजून संपलेला नाही.

चीनमध्ये खरोखर काय घडत आहे? चिनी वृत्तसंस्था आणि पाश्चात्य वार्ताहरांनी पाठविलेल्या बातम्या हाच तेथील परिस्थिती समजून घेण्याचा मुख्य आधार. या बातम्याही आपल्या वृत्तपत्रांत तुरळक आणि संक्षिप्त स्वरूपात प्रसिद्ध होतात. वास्तविक चीनशी आपण आता राजकीय संबंध प्रस्थापित केले आहेत. तेथून स्वतंत्रपणे व त्वरित बातम्या मिळविण्यासाठी 'समाचार'ने कार्यक्षम यंत्रणा का उभारू नये? फुकेनमधील बंडाची बातमी 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या हाँग-काँगच्या बातमीदाराने प्रथम दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी 'समाचार'ने दिलेली शिळी बातमी इतर वृत्तपत्रांना छापावी लागली. अशा परिस्थितीत आपल्या वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या या बातम्यांतून जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करणे एवढेच आपल्या हाती आहे.

नेतृत्वासाठी आपणास खरा संघर्ष शांघाय गटाच्या जहाल नेत्यांशी करावा लागणार आहे, याची हुआ यांना कल्पना होती व त्यांनी काही हालचाल करण्यापूर्वी आपणच पुढाकार घेऊन त्यांच्यावर मात करावयाची, हे तंत्र हुआ यांनी यशस्वीपणे अवलंबिले आणि सर्व प्रचारयंत्रणा त्यांच्या हाती असल्याने त्यांना ते सोपे गेले. शांघाय गटाच्या नेत्यांनी पक्षविरोधी कारवाया केल्याचा आणि हुआंची सत्ता उलथण्याचा कट केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. पोलिट-ब्यूरोमधून व पक्षातील प्रमुख पदांवरून त्यांची हकालपट्टी करण्यात आली. प्रचार मोहिमेचा मुख्य रोख माओंची पत्नी चिआंग चिंग यांच्याविरुद्ध होता. त्यांच्या वैयक्तिक चारित्र्यांचे काळे चित्र रंगविण्यात आले. पण एवढा प्रचार करूनसुद्धा फुकेनमध्ये बंड होते, याचा अर्थ सर्वच लष्कर ठामपणे अध्यक्ष हुआंच्यामागे उभे नाही.

चीनमधील संघर्षात हुआ यांची भूमिका चूक आणि शांघाय गटाचीच भूमिका बरोबर, असे येथे सूचित करायचे नाही. दोन्ही गटांच्या भूमिका एकतर्फी आणि एकांगी आहेत. त्यांचा योग्य समन्वय साधण्यानेच चिनी कम्युनिस्ट चळवळीची व चीनची प्रगती होणार आहे.

चीनमधील सध्याच्या संघर्षातून केवळ चीनच्या दृष्टीनेच नव्हे तर जागतिक कम्युनिस्ट चळवळीच्या दृष्टीने काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. पहिला प्रश्न नेतृत्व-बदलाचा. एका नेत्याच्या निधनानंतर दुसरा नेता निवडण्याचा प्रसंग येतो तेव्हा तो कसा निवडावयाचा? भांडवलदारी देशातील लोकशाहीवर कम्युनिस्ट नेहमी टीका करीत असतात आणि खरी लोकशाही कम्युनिस्ट पक्षात आणि कम्युनिस्ट देशातच असल्याचा त्यांचा दावा असतो, पण वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहावयाचे तर खरी लोकशाही या दोन्ही पद्धतींमध्ये नाही. दोन्ही पद्धतीत काही उणीवा आहेत आणि त्या दूर करण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न झाले पाहिजेत. येथे फक्त कम्युनिस्ट देशातील नेतृत्वबदलाबाबतच काही विचार मांडीत आहे.

लेनिन व स्टॅलिनच्या निधनानंतर रशियात झालेला नेतृत्वबदल आणि सध्या चीनमध्ये होत असलेला नेतृत्वबदल या कम्युनिस्ट चळवळीतील महत्त्वाच्या घटना आहेत. नेतृत्व-संघर्षात यशस्वी होण्यासाठी कट-कारस्थाने, कारवाया, भांडवलदारी देशात होतात तशाच कम्युनिस्ट देशातही होतात. समाजवाद ही भांडवलदारी पद्धतीपेक्षा अधिक प्रगत जीवनपद्धती आहे, असा कम्युनिस्टांचा दावा असतो. पण नेतृत्वबदलाच्या पद्धतीपुरतेच बोलावयाचे तर कम्युनिस्ट देशांनी अधिक चांगला आदर्श जगापुढे ठेवला आहे असे म्हणता येणार नाही. स्टॅलिनच्या दोषांची लेनिनला जाणीव होती. आपल्या-मागे नेतृत्वाची सूत्रे स्टॅलिनकडे जाणे त्यास पसंत नव्हते. पण नेतृत्व-संघर्षात यशस्वी होण्यासाठी लेनिनचे मृत्यूपत्रच स्टॅलिनने दडवून ठेवले.

स्टॅलिनच्या निधनानंतर सामुदायिक नेतृत्वाचा पुकारा करण्यात आला. पण तो देखावा होता. मॅलेन्कॉव्ह, बेरिया, क्रुश्चोव्ह यांच्यात नेतृत्व-संघर्ष चालूच होता. त्यात क्रुश्चोव्ह यशस्वी झाले. दहा वर्षांनंतर त्यांना राजीनामा द्यावा लागून ब्रेझनेव्ह नेते झाले. पण हे सत्तांतरही लोकशाही पद्धतीने खुली चर्चा होऊन झाले नाही. क्रुश्चोव्ह विश्रांतीसाठी क्रीमियास गेले असताना त्यांना बेसावध अवस्थेत गाठून अधिकारपदावरून दूर करण्याचा पद्धतशीर बनाव रचण्यात आला. मॉस्कोत काय शिजत आहे, याची कल्पनाही न देता क्रुश्चोव्ह यांना काही महत्त्वाच्या कामासाठी मॉस्कोला बोलावण्यात आले. प्रथम प्रसिडियमच्या बैठकीत क्रुश्चोव्ह यांच्या चुकांचा सविस्तर अहवाल मांडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी करावयाची आणि मध्यवर्ती समितीच्या बैठकीचीही तयारी ठेवायची, असे क्रुश्चोव्ह-विरोधी गटाने ठरविले होते. दोन्ही बैठकांना आपल्या बाजूचे सभासद बहुसंख्येने उपस्थित राहतील, याची व्यवस्था त्यांनी आधीच केली होती. प्रेसिडियमच्या बैठकीत आपण अल्पमतात आहोत, असे दिसताच क्रुश्चोव्ह यांनी मध्यवर्ती समितीच्या बैठकीची मागणी केली. तेव्हा मध्यवर्ती समितीची बैठक चालू आहे, सभासद तुमचीच वाट पाहत आहेत, असे त्यांना सांगण्यात आले. विरोधी गटाने सारे काही आधीच ठरवून बैठक बोलावल्याचे त्यांना दिसून आले. क्रुश्चोव्ह यांनी भाषण केले, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. मध्यवर्ती समितीने प्रेसिडियमच्या निर्णयास मान्यता दिली. हे निर्णय बाह्यतः लोकशाही पद्धतीने घेतल्याचे दिसले तरी ते लोकशाही उपचारांचे नाटक होते. या दोन्ही बैठकीसाठी आपला गट संघटित करण्याची क्रुश्चोव्ह यांना संधीच मिळाली नाही. एवढ्या महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय घ्यावयाचा तर दोन्ही बाजूंच्या भूमिका वृत्तपत्रांत सविस्तर मांडल्या जाऊन पक्षात सर्व पातळींवर त्यासंबंधी चर्चा व्हावयास हवी होती. पुरेशी पूर्वसूचना देऊन बैठका बोलवायला हव्या होत्या. तसे घडले नाही. याचा अर्थ क्रुश्चोव्ह यांचे सारे बरोबर, सारा दोष क्रुश्चोव्हविरोधी गटाचा असे नाही. क्रुश्चोव्ह यांनीही अनेक प्रश्नांवर प्रेसिडियमला डावलून स्वतःच निर्णय घेतले होते, हेही येथे लक्षात घेतले पाहिजे.

माओंच्या निधनानंतर चीनमध्ये आज चालू असलेला नेतृत्व-संघर्ष हा काही पहिला संघर्ष नव्हे. क्रांतीनंतर प्रथम लिऊ शाओ ची यांच्याशी माओंना संघर्ष करावा लागला. लिऊ शाओ चि यांची देशाच्या अध्यक्षपदी

निवड झालेली होती. माओ अखंड क्रांतीचे पुरस्कर्ते तर लिऊ स्थैर्याचे पुरस्कर्ते होते. भांडवलदारी राष्ट्रांशी शांततापूर्ण सहजीवनाचा दीर्घकालीन करार करावा, अशी त्यांची भूमिका होती. या संघर्षात लिऊ यांना अध्यक्षपदावरून दूर करण्यात आले, एवढेच नव्हे तर देशाचे अध्यक्षपदच रद्द करण्यात आले. दुसरा संघर्ष लिन-पिआओ शी. वास्तविक माओंनीच त्याला आपला वारस ठरविले होते. पण माओंच्या हयातीतच सर्व सूत्रे आपल्या हाती घेण्याचे लिन-पिआओ यांचे प्रयत्न दिसू लागले, तेव्हा माओंनी त्यांच्याविरुद्ध प्रचारमोहीम उघडली. चौ-एन-लाय यांच्या निधनानंतर पंतप्रधानपदासाठी संघर्ष झाला. चौ यांनी आपली बरीचशी जबाबदारी तेंग सियाओ पिंग यांच्यावर सोपविल्याने तेच पंतप्रधान होतील, असे वाटत होते. सांस्कृतिक क्रांतीत तेंग यांना आपली अधिकारपदे गमवावी लागली होती, पण चौ यांच्या आग्रहानेच त्यांना पुन्हा महत्त्वाचे पद देण्यात आले होते. भावी नेतृत्व-संघर्षात पंतप्रधानपदही महत्त्वाचे ठरणार असल्याने माओंना व जहाल गटाला त्या जागी तेंग नको होते. अखेर तेंगना पंतप्रधानपद मिळाले नाहीच, पण उपपंतप्रधानपदही सोडावे लागले व हुआ कुओ फेंग यांची पंतप्रधानपदी निवड झाली.

माओंच्या निधनानंतर निर्णायक सत्तासंघर्षाला सुरुवात झाली. त्यात पंतप्रधानपद, पक्षाचे अध्यक्षपद, लष्कराचे प्रमुखपद आणि माओ – विचारप्रणालीच्या प्रसारकार्याचे प्रमुखपद आपल्याकडे मिळवून हुआ यांनी आपले स्थान बळकट केले आहे. नेतृत्वस्पर्धेत जहाल गटाला सध्या तरी हार पत्करावी लागली आहे. फुकेनसारखी बंडे होऊन संघर्ष काही काळ धुमसत राहील, पण हुआ यांना त्यांच्या पदावरून हलविणे आता सोपे नाही.

नेता निवडण्यासाठी पक्षाची रीतसर परिषद भरवून लोकशाही पद्धतीने निवड करण्याची पद्धती कम्युनिस्ट पक्षांनी का अवलंबू नये? कम्युनिस्ट विचारप्रणाली, धोरण, कार्यपद्धती आता एक छापाची राहिलेली असून प्रत्येक देशातील विशिष्ट परिस्थितीनुसार नवे मार्ग, नव्या वाटा चोखाळल्या जात आहेत. इटली व फ्रान्समधील कम्युनिस्ट पक्षांनी स्वतंत्र मार्ग स्वीकारला आहे. तेव्हा नेतानिवडीच्या बाबतीतही सरळ लोकशाही पद्धत रूढ करण्याचा पायंडा कम्युनिस्ट पक्षांनी पाडला तरच आतापर्यंतच्या अनुभवातून ते पुढे गेले, असे म्हणता येईल. □

# सोलकढी

## □ हे व्यंगचित्र पाहा आणि ते व्यंगचित्र पाहा–

'सोलकढी' या 'साप्ताहिक माणूस' मधल्या माझ्या शब्बात सदरात, मजकुराला शोभा आणण्यासाठी आणि रिकामी जागा भरून काढण्यासाठी कधी कधी एक व्यंगचित्र टाकलेले असते. व्यंगचित्र व्यक्ती टक्कलफू, अंगात आणि डोक्यात काहीशी विस्कटलेली, भुक्कडभोटम, आणि आंधोळीचा एकूण कंटाळा करणारी अशी दिसते. मी बिलकुल 'तसा' दिसत नाही. पण ते व्यंगचित्र माझेच आहे. व्यंगचित्रकार वसंत सरवटे यांना मी तसाच दिसतो. माझी तक्रार नाही. आपण आपल्याला दिसणे आणि दुसऱ्यांनी आपल्याला पाहणे, यात केवढातरी फरक पडतो, हे मला चांगले ठाऊक आहे. लोकशाहीत पुरेसेपणी रुतलेल्या प्रत्येक भारतीयाला हे चांगले ठाऊक आहे. साक्षात जवाहरलाल नेहरूंनी ही सबक आम्हाला शिकवली आहे. (अशी पक्की शिकवली आहे की नेहरूंनंतरचेसुद्धा ती मुळ्ळी ऽ विसरलेले नाहीत.)

परवा वाचलेल्या एका गोष्टीने याचा नवा प्रत्यय आला. ख्यातनाम भारतीय लेखक के. ए. अब्बास यांनी 'आय् ॲम नॉट ॲन आयलँड' या नावाचे आत्मचरित्र लिहिले आहे. त्यातला एक किस्सा पाहा: स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीचा काळ. नेहरूंचा मुक्काम बहिणीकडे–कृष्णा हाथीसिंगकडे–मुंबईला होता. त्यांचे रात्रीचे जेवण चालले होते. जेवून त्यांना एका सभेला जायचे होते. त्यामुळे घाईघाई. इतक्यात राधा नावाचा एक चिल्लर व्यंगचित्रकार तिथे टपकला. तो थोरमोठ्या माणसांची व्यंगचित्रे काढायचा. त्यात, उलटच्या दुधीभोपळ्याप्रमाणे, त्यांचे डोके भलेभप्प आणि पाय किडमिडे काढलेले असायचे. त्या दिवशी त्याला नेहरूंचे व्यंगचित्र काढायचे होते. पण नेहरूंना वेळ कुठे होता? त्यामुळे ते भडकले. जेवण कसेबसे संपवून ते उठलेच. राधा चक्क रडू लागला, आणि रडतारडता म्हणाला, 'तुमचे झाले जेवण. पण तुमच्या चित्राशिवाय मला थोडेच जेवायला मिळणार आहे आज!' हे ऐकताच, नेहरूच ते, विरघळले. त्यांनी राधाला जेवण दिले आणि व्यंगचित्राचे रेखाटन करण्यासाठी आवश्यक ते सगळे सहकार्यही दिले. ही गोष्ट मला प्रतीकात्मक वाटते: आपले व्यंगचित्र काढणाऱ्याला ज्या देशातले नेते जेवण घालतात त्या देशातली लोकशाही सदा सलामत राहते.

म्हणूनच भारतातल्या लोकशाहीची मला कधी काळजी वाटत नाही; पण फ्रान्सच्या लोकशाहीची वाटते. १२ ऑक्टोबर १९७६ रोजी वर्तमानपत्रात आलेली बातमीच पाहा: फ्रान्समध्ये मार्क वेज नावाचा एक प्रकाशक आहे. त्याने पत्त्यांचा एक नवीन जोड तयार केला आहे. हे साधे इस्पिकबदामकिलवर-चौकट पत्ते नाहीत. यातला प्रत्येक पत्ता म्हणजे फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष व्हॅलेरी गिस्कार्ड देस्तँग यांचे एक व्यंगचित्र आहे. अशा बावन्न शेलक्या व्यंगचित्रांचा हा पत्तेजोड आहे. व्यंगचित्रात राष्ट्राध्यक्ष देस्तँग रानटी गुहामानवासारखे दाखवले आहेत. बाजारात विक्रीला काढलेल्या या पत्तेजोडापैकी दोन जोड मार्क वेजने देस्तँगमहोदयांकडे पाठवले होते. त्यांच्याबरोबर एक पत्रही होते. ही व्यंगचित्रे म्हणजे राष्ट्राध्यक्षांच्या मोठेपणाला वाहिलेला नजराणा असून त्यामुळे राष्ट्राध्यक्ष बिथरणार नाहीत, अशी आशा त्या पत्रात व्यक्त केली होती. शिवाय त्यात राष्ट्राध्यक्षांना भोजनासाठी अत्यंत आग्रहाचे निमंत्रण होते.

पत्रातली आशा काही खरी ठरली नाही. राष्ट्राध्यक्ष व्हॅलेरी गिस्कार्ड देस्तँग चांगलेच बिथरले. त्यांनी आपल्या वकिलांकरवी मार्क वेजवर आरोपपत्र बजावले. राष्ट्रप्रमुखाची मार्क वेजने बदनामी केली, असे त्यात म्हटले आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता यांचा पाळणा ज्या फ्रान्सच्या स्वप्नभूमीवर आंदुळला त्या फ्रान्समध्ये असे घडावे ना? अरेरे. आपण आपल्याला दिसतो तसेच दुसऱ्यांनी आपल्याला पाहावे, असे मानणाऱ्या फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांना लोकशाहीचा खरा अर्थ समजलाच नाही, असे म्हणायचे का? 'माणूस'च्या अनंतरावांना जे समजते ते फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांना समजू नये?

शक्य आहे. हा फरक अनंतराव आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष यांच्यातला नाही. हा नेहरू आणि नेपोलियन यांच्यातला फरक आहे.

–अनंतराव

# अस्पृश्यतेच्या दृढीकरणाचे शिल्पकार कोण?

प्रेमानन्द गज्वी

'माणूस'च्या तेरा नोव्हेंबरच्या अंकात अस्पृश्य बांधवांचा स्वाभिमान जागा करण्यासाठी 'अस्पृश्यता उन्मूलन की दृढमूलन' या शीर्षकाखाली भा. द. भावे नामक कुणा एका इसमानं एक लेख खरडला आहे. हे भावे स्वतःला समजतात तरी कोण? असा प्रश्न विचारण्यापूर्वी झोपेतून जागं होत का होईना, त्यांनी दलितांना 'स्वाभिमान' शिकवला, याबद्दल मनमोकळे स्वाभिमानपूर्वक आभार! पण दलितांविषयी आंधळेपणानं लेख खरडल्याबद्दल त्यांच्या जन्मापासूनच ५०-६० वर्षे दलितोद्धाराची घोषणावाक्ये ऐकून ज्ञानी झालेल्या या भाव्यांनी निर्बुद्धतेचा शेळपट नमुना 'माणूस'मधून सादर केल्याबद्दल निषेध; पण कुठला शब्द हाणून करावा? एकूण दळभद्री लिखाण किती शांतपणे वाचून, विचार करून, किती संयमानं उत्तर द्यावं, ह्यालाही सीमा आहेत.

## चोरांच्या उलटचा....

भावे या विचारवंताचं विचारधन (?) सांगतंय की, आता ज्यांनी अस्पृश्यांवर अन्याय केले तेही नाहीत व अन्याय सहन करणारेही नाहीत. त्या पिढयाच नाहीत. यासाठी ते फार मोठं सुंदर उदाहरण देतात, हिंदु-मुसलमानांचं! वाहव्वा रे, चोरांच्या उलटचा बोंबा! साधीसुधी झालेली जखम, रक्त, पू होऊन वेदना होतात. ती जखम बरी व्हायला कित्येक दिवस जातात. जखम भरते. पण ती जिथे होते तेथे व्रण मात्र कायमच राहतो व आयुष्यभर सोबत करतो आणि जेव्हा जेव्हा तो व्रण दिसतो तेव्हा तेव्हा त्या जखमेची आठवण होऊन त्या वेळी भोगाव्या लागलेल्या वेदनांची जाणीव होते, तेव्हा...भावेमहाराज, मनात जी कालवाकालव होते ती शब्दातीत असते. हिंदु-मुसलमान जर 'आकसानं सूडाच्या भावना' आज जपत नाहीं म्हणावे, तर भिवंडी, अहमदाबाद कशाचं द्योतक आहेत? हजारो वर्षे ज्यांनी अन्याय नि अन्यायच सहन केला, आजही करीत आहेत, त्या समाजाला [सूडभावनेनं काहीच साधता येत नाही, हे खरे!] आता ते अन्याय करणारे नाहीत, सारं विसरून जा, असं म्हणून त्यांच्या जखमांवर मीठ चोळण्याचं काम करणारे भावे, दयाबुद्धीनं अस्पृश्योद्धाराची कावड वाहणाऱ्या महात्मा गांधींच्या शताब्दी वर्षात ११९७ ठिकाणी दलितांवर अत्याचार घडलेत, हे सहज विसरून जातात? एवढंच कशाला? कालपरवाचं बावडयाचं बहिष्कार प्रकरण आणि चालू वर्षाचं १९७६ चं ताजं उदाहरण गायकवाडबंधूंचे, केवळ बहिणीसाठी न्याय मागणाऱ्यांचे डोळेच फोडून टाकले! भावेजी, रोज वर्तमानपत्रे तरी वाचता का? की तुमचेच डोळे तुमच्या बुरसटलेल्या संस्कृतीनं फोडून आंधळे केलेत?...दलितांना हजारो वर्षे अंधारात ठेवल्याची घोषवाक्ये एकून ऐकून, तोच अंधार आता सर्वांगावर थुईथुई नाचेल, ते पाहणे नशिबी येऊ नये म्हणून गांधारीवारसा धारण केलात की काय? भावे, स्वतःच्या देशात काय घडतेय ते धड ठाऊक नाही. पण एकोणतीस वर्षांत नेत्रदीपक प्रगती करणाऱ्या चीनबरोबर ह्या मूठभर दलितांची प्रगती नाही म्हणून तुलना करता! ही तुमच्या बुद्धिमत्तेची चमक आहे! भारतीय स्वातंत्र्याला आज तेवढाच काळ होत आहे. तरी अन्नासाठी परदेशांकडे भीक मागावी लागतेच ना? तुलना समबलाची करावी. राष्ट्राराष्ट्रांची करावी. उजेडाची उजेडाशी. अंधाराची उजेडाशी नव्हे! अस्पृश्य समाजातील अंधार ज्या दिवशी पूर्णपणे नव्हे, नुसती मंगल प्रभात झाली तरी, मग तुलना खुशाल करावी. आजही ते अंधाराच्या गर्तेतच आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

## भूतकाळ ते वर्तमानकाळ

'इंग्रजांचे राज्य आल्यावर...अस्पृश्यांना काकणभर जास्तच सवलती मिळत होत्या,' ही गोष्ट भावे यांनी 'इतिहास' वाचून सांगितली आहे. असो ते म्हणतात, असं असूनही त्यांनी प्रगती का साधली नाही? आता हे काय भाव्यांना ठाऊक नाही? सगळा मलिदा आपल्यालाच मिळावा म्हणून इंग्रजांची गाथा गाणाऱ्या भावेसारख्यांनीच, होय, इंग्रजांच्याच राज्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शाळेच्या पायरीवरच बसून शिक्षण घेण्यास भाग पाडले. पाण्यासाठी त्याच इंग्रजांच्या राज्यात हंबरडा फोडावा लागला आणि त्याच इंग्रजांच्या राज्यात सिडनेहॅम कॉलेजात, विद्वानांच्या राज्यात, जेथे दुनियेचे ज्ञान दिले जाते, तेथे आंबेडकर या महार प्राध्यापकानं पाण्याच्या माठाला हात लावला म्हणून तो माठच फोडून टाकला. हे सारं कुणी केलं? कशासाठी केलं? न्यूनगंड हा व्यक्तिगत असतो असं म्हणणाऱ्या या भाव्यांनी डॉ. आंबेडकरांत कोणता न्यूनगंड होता म्हणून त्यांना तशी वागणूक मिळाली हे सांगावं? याच हिंदू गटार संस्कृतीनं पराक्रमी कर्णाची वारंवार हीने कुळातील, आईबापांचा पत्ता नसलेला अक्करमाशा म्हणून हिणवणी केली. त्याचं पौरुषही मातीमोल ठरवलं. तेच आता त्याची हीनता विसरून त्याच्या पौरुषाची गाथा गातात. केवळ हीन जातीच्या नावावर सवलती मिळतात व स्पृश्यांना पौरुष (?) दाखवूनही सवलती की बढत्या मिळत नाहीत, म्हणून कर्णाचा हवाला देऊन अस्पृश्यांना पौरुषाचे गीत गाऊन कर्णासारखं पौरुष दाखवा म्हणून कोकलतात. खासा न्याय!

हिंदू संस्कृतीनं पौरुषालाही कसे लाजविले, हे काय भाव्यांना ठाऊक नाही? धनुर्विद्या नाकारणाऱ्या द्रोणाच्या नाकावर टिच्चून स्वाभिमानपूर्वक ती मिळवली. पण त्या बिच्चाऱ्याचा बळी कपटानं कसा घेतला गेला? ही पौरुषाचीही अवस्था आहे.

आणि वर्तमानकाळास तरी काय आहे ? माझा स्वतःचा अनुभव. १३ मे १९७३. ' हुंडाविरोधी चळवळी 'ची स्थापना. संघटकांपैकी मीही एक आहे. सर्व थरातील तरुण आहेत. सरचिटणीसपदाची धुरा मी सांभाळतो आहे. एक दिवस आमच्या या कार्याची वार्ता ज्यांना कळली तो माझा एक मित्र. आम्ही पार्ल्याच्या एका स्पर्धेमध्ये एकांकिका सादर करण्याच्या निमित्तानं एकत्रित आलो होतो. मित्रत्वाचं नातं जुळले. आम्ही एकमेकांच्या तोंडातील सिगारेटी ओढल्या. असा माझा मित्र. त्यानं माझं अभिनंदन केलं. एक दिवस घरी गेलो. चळवळीसंबंधी बोलत असतानाच त्यानं मला विचारलं,

' गज्वी म्हणजे मुसलमान ना रे ?'

' होय !' मी उत्तरलो. ' पण मी बौद्ध समाजातील आहे !' शब्द तोंडातून बाहेर पडताक्षणीच त्याचा चेहरा घरातलं कुणी खपल्यागत सर्रकन उतरला. इतके दिवस एका पूर्वाश्रमीच्या महाराबरोबर सगळं काही केलं, याची लाज वाटली असेल !

वास्तविक आमच्या समाजात या हुंड्याचं इतकं प्राबल्य नाही. आमच्याच समस्या आम्हाला पुरून उरतात. तरी समाजप्रवाहात मिसळून जाण्याची, सर्वांच्या बरोबरीनं दुःखितांचे अश्रू पुसण्याची प्रेरणा डॉ. आंबेडकरांच्या पुण्याईनं लाभली आहे. ती सर्व समाजप्रश्न आपलाच समजून सोडविण्यासाठी सांगते. महाराष्ट्रीयच नव्हे तर हा समाज पूर्ण भारतीय आहे–काकणभर इतरांपेक्षा अधिक ! नाही तर एव्हाना अस्पृश्यतेचा लढा वेगळंच स्वरूप धारण करून देशाची अब्रू चव्हाट्यावर टांगता. समाजजीवनात समरस व्हावे म्हणून इतरांनी सांगण्याची गरज नाही, तर करून घेण्याची आहे.

आपलं अस्पृश्यत्व गाडून टाकण्यासाठी धडपडणाऱ्यांना जाणीव करून दिली जाते की, तू मोठा झालास, विद्वान झालास तरी तुझी जात बघत चल. अस्पृश्यता ही जातीच्या नावावर सवलती दिल्यामुळे दृढमूल होते, असे म्हणणे मूर्खपणाचं लक्षण आहे. धर्मांतरित बौद्धांना कुठं होत्या सवलती ? तरी त्यांच्यावर काय कमी अन्याय–अत्याचार झाले ? आणि तेही स्वाभिमानानं जगतात. अन्यायावर पेटून उठतात म्हणून. घटनेतील ' समान संधी 'च्या कलमावर बोलताना बौद्ध लोक त्याच समानतेसाठी धडपडत असताना त्यांना मिळाला न्याय, दिला न्याय ? उलट चारी बाजूंनी दडपण आणून छळ सुरू केला. आणि अव्याहत चालूच आहे. अस्पृश्यांचा छळवाद संपतच नाही. म्हणून तर १९ नोव्हेंबरपासून अस्पृश्यता कायदा कडक करून शिक्षेत वाढ केली. पण त्याची अंमलबजावणी कशी होते हा प्रश्न आहेच !

## अस्पृश्यता कशी जाईल ?

मनापासून, प्रामाणिकपणे अस्पृश्यता समूळ जावी, असे खरोखरच वाटते काय ? तर मग प्रथम सर्व जातीय अड्डे–जे विविध क्षेत्रांत पसरले आहेत–ते नष्ट केले पाहिजेत. केवळ जातींच्यासाठी चालवणाऱ्या संस्थांचे कितीतरी अड्डे आहेत. ते सपाट केले पाहिजेत. पण ते न करता हाताच्या बोटांवर (सवलती जरी सर्व अस्पृश्यांना असल्या तरी खेड्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे.) सवलती घेणाऱ्या लोकांच्या नावाने कोकलणे हे केवळ असूयेचे लक्षण आहे. धडधडीत दिसणारे मुसळ काढण्याऐवजी कुसळासारखा लहान अस्पृश्य समाज सवलती घेतो म्हणून डोळ्यात खुपतो काय ?

अस्पृश्यता–निवारणाचे प्रचलित मार्ग जर कुचकामी आहेत, तर ते निवारणाचे अन्य मार्ग का नाही सांगत भावे ? पण तसे सांगणे म्हणजे आपणच आपल्या तोंडावर थुंकण्यासारखे आहे. म्हणून ते त्या वाटेला जातच नाहीत. वास्तविक जातीयतेचे विष चातुर्वर्ण्य चौकटीने आणले. ती चौकटच का तोडू नये ? स्वतःच्या डोळ्यातले हे मुसळ वर्षानुवर्षे दिसत असताना, जातीच्या नावावर सवलती दिल्यामुळे अस्पृश्यता ' दृढमूल ' होते असं म्हणून, म्हणजे बेंबीची पारंबी तुटेपर्यंत ओरडून आपलीच अक्कल आपल्याच जोड्याने बडवणे होय !

भावे आपल्या लेखात एके ठिकाणी खंताळतात. इंग्रजांपासून भाव्यांच्या विनोबांपर्यंत सगळ्या स्पृश्यांनीच दलितांनी सगळ्यांच्या बरोबरीनं यावे म्हणून प्रयत्न केलेत. इतरांच्या बरोबरीनं पुढे जायची इच्छा अस्पृश्यांमध्ये स्पृश्यांनीच निर्माण केली. पण ती झाली नाही म्हणून आक्रोश करतात. इथेच मायेची कड नसून दयेची रड दिसते. मायेची कड घेणाऱ्या फुल्यांनाच डॉ. आंबेडकर आपल्या गुरुस्थानी मानतात आणि अस्पृश्यांच्या सेवेचं ऋण फेडण्याचा यत्न करतात. आतापर्यंत किती स्पृश्यांनी अस्पृश्यांना स्वाभिमानाच्या पेटवा मशाली, म्हणून सांगितले ?

विशाल दृष्टिकोनाचा जप करणारे हेच भावे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ' एक महाभाग ' असा उल्लेख करतात. ज्याची त्या आंबेडकरांचे जोडे पुसण्याचीही लायकी नाही, अशा यःकश्चित माणसानं ' एक महाभाग ' म्हणून संबोधणं, हे काय त्याच्या विशाल दृष्टिकोनाचं लक्षण आहे ? न्यूनगंडानं पछाडलेल्या महारोग्यानं, हे पाहा माझं नाक म्हणून दाखविण्याचा कितीही आटापिटा केला तरी दिसतात ती मस्तकात रुतून बसलेल्या नाकाची केवळ भोकेच ! म्हणून तर भारतीय पातळीवरचा पुढारी म्हणून ' हरिजनांतला एक महाभाग, ' आंबेडकरच दिसतो.

पण आम्हाला अनेक दिसतात. ' नवाकाळ 'च्या ' वाहते वारे- ' मध्ये हरी विवेकनाही दिसतात. [ दि. २०–११–१९७६. ] आता तसे कुणाला दिसत नसले तरी एकटे डॉ. आंबेडकर शेकडोंना पुरून उरतात. म्हणूनच एक शायर म्हणतो,

चली आयी ये आजादी, बनी दुल्हन मगर कैसे ?
मेरा भीम दुल्हा नही होते, तो ये शादी नही होती ! ◻

# गरज आहे समजूतदारपणाची

ज. बा. संकपाळ, वाई

अस्पृश्यता दूर करण्यासाठी समजूतदारपणाची आवश्यकता आहे. परंतु हा समजूतदारपणा स्वतःला बुद्धिमान आणि विचारवंत म्हणविणाऱ्या लोकांत दिसला नाही, म्हणजे वाईट वाटते. अस्पृश्यता निवारण होण्याच्या दृष्टीने चर्चा होणे हे योग्यच वाटते. परंतु श्री. भा. द. भावे यांनी आपला लेख पूर्वग्रहदूषित भावनेने लिहिला नसता, तर हिताचे झाले असते. परंतु दुर्दैवाने लेखकाने बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न केला आहे. विचारवंतांमध्ये अशी बुद्धिभेदाची भावना व वस्तुस्थितीकडे जाणूनबुजून डोळेझाक करण्याची भावना निर्माण व्हावी, ही एक दुर्दैवी गोष्ट आहे.

भाव्यांनी अस्पृश्यांच्या समस्यांचा बराच ऊहापोह करून आपले मत जनतेवर लादण्याचा प्रयत्न केला आहे. हजारो वर्षे अस्पृश्यांना सवर्णीयांनी अंधारात ठेवले, अज्ञानात ठेवले, त्यांच्यावर अत्याचार केले, अशा घोषणा भाव्यांसारख्या विद्वानांना गेल्या ५०–६० वर्षांत जास्त करून जाणवतात. पण त्यापूर्वी शेकडो वर्षे हा समाज पिचत पडला होता, संधीची, समानतेची वाट पाहात होता, त्याच्या प्रगतीची जाणीव तितकीशी होत नाही, हे त्यांच्या लेखावरून दिसते.

लेखकाचे असे एक विधान आहे, की हजारो वर्षे अस्पृश्यांवर अन्याय करणारे व ते अन्याय सोसणारेही गेले आहेत; तो जमानाच गेला आहे. हे कोणीही नाकबूल करणार नाही. त्या पिढ्या जरूर गेल्या असतील; पण अस्पृश्यता मानणारे पूर्ण संपले आहेत, असे म्हणता येणार नाही. आजही अनेक ठिकाणी अस्पृश्यांच्या स्त्रियांवर बलात्कार झाल्याचे आपण वृत्तपत्रांत वाचतो, त्यांचे पाणी बंद केलेले वाचतो. जाणूनबुजून त्यांचे सी. आर. खराब केलेले व त्यांची प्रमोशने डावललेली दिसतात. या समाजाला पुष्कळ सवलती दिल्या जातात; पण प्रत्यक्षात व्यवहारात मात्र किती दिसतात, याचा लेखकाने प्रथम विचार करावा. जुलूम करणारे संपले असतील; पण त्यांच्या रक्ताने संस्कारित झालेले रक्त संपूर्ण संपले असेल, असे म्हणता येणार नाही.

एवढ्या प्रचंड काळ रुजलेली जातिभेदाची चौकट आता हळूहळू सैल होत आहे. शासनही वेळोवेळी अशा सामाजिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. समाजातील देशभक्त, विद्वान व सामाजिक संघटनाही या कामात शासनाला मदत करीत असतात.

अस्पृश्यतेचा हिंदू धर्माला लागलेला कलंक हा फार पुरातन आहे. जातिभेदाची चौकट हे त्याचे मानवनिर्मित विकृत स्वरूप आहे. काही विद्वानांचे मत आहे, माणसाला जात बदलता येणार नाही, फार तर वर्ग बदलता येईल. उदा., गरिबाचा श्रीमंत व श्रीमंताचा गरीब होऊ शकेल. तात्पर्य, जी जात नाही ती जात, अशी जातीची व्याख्या काही विद्वान देतात. जातिभेद मानणे हा कायद्याने गुन्हा ठरविला आहे. प्रत्यक्ष कायद्याने जरी जातिभेद नष्ट केलेला असला, तरी हे सारे कायद्याच्या पुस्तकातच राहिले आहे. म्हणून प्रथम मनातील दुष्टावा काढून टाकला पाहिजे. प्रत्यक्ष बोलणे म्हणजे अनुकरण नव्हे. तेव्हा प्रत्येकाने आपले आचरण शुद्ध ठेवून अनुकरण केले, तर अस्पृश्यता कमी होण्यास मदत होईल. नुसते 'अस्पृश्य', 'अस्पृश्य' व त्यांना मिळणाऱ्या 'सवलती', 'सवलती' अशा ओरडण्याने नाही.

लेखकाने अस्पृश्य जमातींची लहान मुलांशी केलेली तुलना माझ्या मते अयोग्य वाटते. लहान मुलांवर विशिष्ट काळपर्यंतच संस्कार होत असतात; पण समाजावर मात्र वर्षानुवर्षे संस्कार सातत्याने होत असतात. तुलनेच्या दृष्टीने समाजावरील संस्कार आणि मुलावरील संस्कार याचा मेळ बसत नाही. म्हणून लेखकाची ही तुलना गैर आहे.

लेखकाच्या म्हणण्याप्रमाणे या समाजाची लहान मुलाशी केलेली तुलना मान्य केली तर काय होईल, याचे माझ्या बुद्धीच्या कुवतीनुसार खालील उदाहरण देत आहे :

समजा, एखाद्या आईला चार मुले आहेत आणि त्यांतील एक अशक्त आहे, दुबळा आहे, तर ती आई त्या दुबळ्या मुलाकडे जास्त लक्ष देईल. त्याला जास्त खाऊ-पिऊ घालून इतर तीन मुलांप्रमाणे सशक्त बनविण्याचा प्रयत्न करील. आणि जर ती आई त्या दुबळ्या मुलासाठी ह्यांपैकी वा इतर कोणत्याही गोष्टी करणार नसेल, तर तिला आई वा माता म्हणता येणार नाही. तसे ह्या आईने (भारतीय समाजाने) आपल्या 'अस्पृश्य बाळाला' कधी मायेचा ओलावा दिलाय का ? कधी त्याची नीट विचारपूस केलीय का ? उलट हजारो वर्षे या आईने या 'अस्पृश्य बाळाला' दूर लोटून दिलं होतं. एवढ्या दीर्घ काळानंतर आताच कुठे या बाळाला आपल्या आईने एकोणतीस वर्षे मायेचा ओलावा दिला आहे. जवळ घेतलं आहे. एवढ्यात हे बाळ सशक्त कसे होईल ? हे बाळ सशक्त होईपर्यंत तिची इतर मुले कितीही ओरडली, तरी ती आई आता त्यांच्यावर हे मूल व्यवस्थित चालेपर्यंत लक्ष देणार नाही. मग त्यांनी व्यर्थ ओरडण्यात काय अर्थ !

आतापर्यंत हे 'अस्पृश्य बाळ' विकासाच्या दिवसांतच दूर राहिले, त्याच्या हालअपेष्टा झाल्या. त्याची आई आताशी त्याला लांबून तुकडे टाकते आहे (सवलतीचे). हे तुकडे खाऊन या बाळास सुधारण्यास बराच अवधी लागणार. अशी तर अवस्था तिने (भारतीय समाजाने) आपल्या इतर बाळांची (अस्पृश्येतर समाजाची) केली नव्हती ना ? मग आम्हाला काही मिळत नाही, मिळत नाही, असं म्हणून ही बाळं (अस्पृश्येतर समाज) का रडतात ? हजारो वर्षे त्यांनी पुष्कळ खाल्लंय, त्यांनी आता रडू नये. त्यांनी समजूतदारपणा दाखवावा, असे वाटते.

ब्रिटिश अमलात अस्पृश्य अथवा मागास वर्गास इतरांपेक्षा काकणभर जास्तच सवलती मिळत होत्या, असे एक विधान भाव्यांनी केले आहे. ऐतिहासिक पुरावा देऊन त्यांनी हे स्पष्ट केले नाही, परंतु माझ्या मात्र अभ्यासात असे आले नाही. जर ब्रिटिशकाळात अशा सुधारणा वा सवलती मिळत असतील, तर भारत सरकारला कायदे करण्याची काय गरज !

सुधारणाही स्वतःपासून व्हायला पाहिजेत. आपल्या घरापासून, आपल्या कुटुंबातून निदान आपल्या समाजाचं कर्तव्य म्हणून तरी

स्वाभिमानी जीवन जगलं पाहिजे. हे लेखकाच्या म्हणण्याप्रमाणे निर्विवाद खरं आहे. दुसरा कोणी आपला उद्धार करू शकत नाही हेही खरंच आहे. पण समजाचं एक अंग अजून अधू आहे, ह्याची तरी लेखकाने जाणीव ठेवली पाहिजे. परंतु वस्तुस्थितीकडे लेखक जाणूनबुजून डोळेझाक करण्यास प्रवृत्त करीत आहे. त्यामुळे त्याच्या स्वतःच्याच सद्हेतूबद्दल कोणी शंका घेतली, तर कदाचित अयोग्य होणार नाही. शासनाने दिलेल्या सवलती योग्यच आहेत. परंतु त्याचा फायदा अस्पृश्य समाजातील, तसेच स्पृश्य समाजातीलही पुढारलेल्या लोकांनीही घेण्याची अपेक्षा करू नये, असे आम्हाला वाटते.

अस्पृश्य समाजाने ज्यूंप्रमाणे वागावे, त्यांचा आदर्श पुढे ठेवावा, असे लेखक अप्रत्यक्षपणे सुचवितो. याचा अर्थ ज्यूंप्रमाणे अस्पृश्यांनी फुटून निघावयास पाहिजे का, असे तर लेखकाचे म्हणणे नाही ना? आणि जर अस्पृश्य फुटून निघाले असते, तर लेखकाने अस्पृश्याची ज्यूंशी केलेली तुलना सयुक्तिक वाटली असती.

गेल्या एकोणतीस वर्षांत भारताने विशेष अशी (लेखकाच्या दृष्टिकोनातून) कोणती प्रगती केली, याचा लेखकाने प्रथम पुनश्च अभ्यास करावा आणि नंतर मग भारतामधील राहणाऱ्या जमातीचा विचार करावा. माझ्या मते मात्र राष्ट्रातील सर्व समाजाच्या प्रगती-शिवाय कोणतेही राष्ट्र प्रगती करू शकत नाही. म्हणून अलीकडील काळात लोकशाही कल्याणकारी सरकारला, तसेच दलितांबद्दल आस्था असणाऱ्या लोकांना, सामाजिक संघटनांना प्रगतीच्या दृष्टीने सवलती देणे आवश्यक वाटते. केवळ ढोबळपणे चीन, रशिया इत्यादी राष्ट्रांची अस्पृश्य जमातींच्या प्रगतीशी तुलना करणे योग्य होणार नाही.

सवलतीमुळे स्वाभिमानशून्य लोक निर्माण होतात, हा भाव्यांचा सिद्धान्त बहुतांशी खरा नाही. जर तो खरा असता, तर भारताने त्याचा वापर केला असता. आणि भाव्यांचा उदोउदो केला असता, सवलती माणसाला केवळ कार्यक्षम बनविण्यासाठी असतात. दुःखी, कष्टी व निरुत्साही तसेच बराच काळ दडपून टाकलेल्यांना त्या संजीवनी देतात. जो समाज आर्थिकदृष्टचा मागासलेला आहे, मग तो अस्पृश्य वा स्पृश्य असो, त्याला सवलती दिल्याच पाहिजेत. सध्या मागासवर्गीयांना सवलतीची गरज आहे, म्हणून त्यांना सवलती देणे इष्टच वाटते. मात्र अस्पृश्य वा स्पृश्य समाजातील ज्या लोकांचा आर्थिक व सांस्कृतिक दृष्टचा विकास झालेला आहे, अशा लोकांनी सवलतीची अपेक्षा करणे देशहिताच्या दृष्टीने तोटचाचे आहे. त्यांनी त्याचा गैरफायदा घेऊ नये. समाजाने त्यांच्यावर कडाडून हल्ला करावा.

मनुष्य हा स्वार्थी आहे, एखाद्या भकभकलेल्या लांडग्याप्रमाणे, असे एकेकाळी हॉब्जने म्हटले होते. फायदा उठविणे ही मानवी प्रवृत्ती आहे. अस्पृश्यांच्या ठिकाणी स्पृश्य असते तरी त्यांनी फायदाच उठविला असता. फक्त अस्पृश्य समाजात जागृती झाली, एवढेच या ठिकाणी महत्त्वाचे आहे.

अस्पृश्यांना आपण अस्पृश्य होतो, हे मूळ माहीतच नव्हते. परंतु ज्यावेळी त्यांना दूर फेकले गेले, त्या वेळी त्यांना अस्पृश्यत्वाची जाणीव झाली. ही जाणीव होणे हे काही अनैसर्गिक नव्हते. शेकडो वर्षे तुम्ही (सवर्णांनी) त्यांना अस्पृश्य ठरविले, त्यांच्या डोक्यावर काटेरी मुकुट चढविला, इतकेच नव्हे, तर त्यांच्या गळचात मडकी बांधविली आणि अस्पृश्यतेचा कायमचा शिक्का मारला तो काय म्हणून? कारण सत्ताधारी तुम्ही होता. अस्पृश्य स्वतःला अस्पृश्य म्हणत नाहीत तर तुम्हीच त्यांना अस्पृश्य म्हणता. अस्पृश्याची जात तुम्हीच शोधून काढली. प्रत्यक्ष भगवद्गीतेतसुद्धा भगवान श्रीकृष्णाने म्हटले आहेः 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।' त्यांनीसुद्धा जातींची निर्मिती केली नव्हती. तुम्ही त्या चार वर्णांतून जातीयतेची कटू फळे निर्माण केलीत; आणि उलट तुम्हीच त्यांना म्हणता, की ते अस्पृश्य अस्पृश्य म्हणून समाजात मिरवितात व सवलतीची मागणी करतात. हा कुठला न्याय? अस्पृश्यांबद्दल ओरड करणे म्हणजे चोरांच्या उलटचा...म्हणण्यासारखे आहे.

एवढचा प्रदीर्घ काळानंतर आता कुठे त्यांना थोडचाशा सवलती मिळू लागल्या, की तुमच्या पोटात जळू लागलं, ओकाऱ्या होऊ लागल्या. अस्पृश्यांना सवलती मिळाल्या तरी तुम्ही त्यांना अस्पृश्य म्हणणार आणि नाही मिळाल्या तरी तुम्ही त्यांना अस्पृश्यच म्हणणार आणि तुमचा अस्पृश्य म्हणण्याचा रोख केवळ त्यांच्या सवलतींशी आहे. एकोणतीस वर्षांत राष्ट्र जेवढे म्हणून प्रगतिपथावर जायला पाहिजे, तेवढे गेले की नाही, याचा लेखकाने प्रथम विचार करावा. विनाकारण पश्चिमी राष्ट्रांची भारताशी तुलना करू नये. मग भारतात हजारो वर्षे दडपलेल्या समाजाची प्रगती कितीशी होणार? आणि स्वातंत्र्योत्तर काळात अस्पृश्येतर समाजाची तरी कितीशी प्रगती झाली?

लेखक स्वतःच अस्पृश्यांना अस्पृश्य संबोधितो, हे त्याच्या 'गरज आहे अस्पृश्य बांधवांचा स्वाभिमान जागा करण्याची', ह्या शीर्षकावरून दिसते. स्वतः अस्पृश्य म्हणता व दुसऱ्यांनी अस्पृश्य म्हटले, की राग येतो, हा कुठला न्याय? वरील शीर्षकाऐवजी 'गरज आहे स्वाभिमान जागा करण्याची' एवढे शीर्षक पुरेसे झाले असते. पण ती भावना मूळ हृदयातच असावी लागते. ☐

[पुढील अंकी : 'गरज आहे स्पृश्य बांधवांचा मानभावी स्वार्थ संपण्याची' : लेखक – डॉ. नरेन्द्र दाभोळकर.]



# आर्थिक विकास आणि कर्तृत्वप्रेरणा

प. श्री. पांढरीपांडे

गेल्या एक वर्षात भारतीय औद्योगिक जीवनाचे चित्र फार मोठ्या प्रमाणात बदललेले दिसते. संप, हरताळ, घेराव इत्यादी अनुत्पादक गोष्टी नाहीशा झालेल्या आहेत आणि परिणामतः औद्योगिक उत्पादनाचे उच्चांक पूर्वीपेक्षा वाढलेले आहेत, असे शासकीय वृत्तान्त सांगतात. औद्योगिक विकासाचे असे उत्तेजक चित्र आणीबाणी-सारख्या असामान्य परिस्थितीत दिसणे साहजिक आहे. परंतु राष्ट्राच्या औद्योगिक विकासप्रक्रियेचे विश्लेषण यापूर्वीच्या गेल्या काही वर्षांच्या आकडेवारीवरून करावे लागेल.

महाराष्ट्रात १९७१–७२ मध्ये किर्लोस्कर कन्सल्टन्टस्कडून जे सर्वेक्षण करण्यात आले, त्यात दिसते की, महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत नैसर्गिक साधनसामग्री विपुल असून देखील उद्योग निर्माण झालेले नाहीत, किंवा निर्माण झालेले अनेक उद्योग अस्तंगत होण्याच्या मार्गावर आहेत. १९७२ मध्ये बँक ऑफ इंडियाने विदर्भातील जिल्ह्यांचा जो अभ्यास केला, त्यातूनही हेच चित्र दिसते. पंजाबसारखी काही थोडीशी राज्ये सोडल्यास भारतातील इतर अनेक राज्यांत यापेक्षा फारसे वेगळे दिसत नाही. शासनाने विविध प्रकारच्या आर्थिक सोयी उपलब्ध करून दिल्यानंतरही या समाजाचे औद्योगिक जीवन अपेक्षेसारखे फुलले नाही. अनेक ठिकाणी तर उद्योजकांनी घेतलेला पैसा परत मिळेल की नाही, याविषयी बँकांच्या मनात चिंता उत्पन्न झालेली आहे. उद्योगाला लागणारी साधन-सामग्री व आर्थिक मदत या दोन्ही महत्त्वाच्या गोष्टी असताना देखील औद्योगिक प्रगतीची झेप अपेक्षेइतपत का नसावी, हा प्रश्न निर्माण होणे साहजिक आहे. या देशातील औद्योगिक विकासाची गती जर अशी संथ किंवा खंडित नसती, तर कदाचित आजची बेकारीची समस्याही फार कमी प्रमाणात दिसली असती.

औद्योगिक विकासाची मीमांसा केवळ आर्थिक कारणांच्या आधारे होऊ शकत नाही. साधनसामग्री व आर्थिक मदत यांची उणीव नसतानाही औद्योगिक प्रकल्प अनेक जिल्ह्यांत उभे होऊ शकले नाहीत, ही घटना, आर्थिक घटकांव्यतिरिक्त इतर घटकांवर लक्ष द्यावयास भाग पाडते.

## आर्थिक विकासातील मानसिक कारणे

अनेक राष्ट्रांचा आर्थिक विकास समाजातील काही विशिष्ट समुदायांनीच केलेला आहे, असे संशोधनावरून दिसून येते. पाकिस्तानातील जास्तीत जास्त औद्योगिक विकास हलाई मेमन या जमातीने केलेला आहे व एकूण लोकसंख्येत या समूहाचे प्रमाण तीन टक्क्यांपेक्षाही कमी आहे. जर्मनीसारख्या अनेक पाश्चात्य राष्ट्रांचा औद्योगिक विकास प्रॉटेस्टन्ट पंथियांनीच प्रामुख्याने केला आहे. आपल्याही देशात पारशी, जैन यांसारखे औद्योगिक विकासात सिंहाचा वाटा उचलणारे लोकसमुदाय आहेत. तेव्हा निरनिराळ्या राष्ट्रांतील विशिष्ट लोकसमुदाय त्या त्या राष्ट्राच्या औद्योगिक विकासात पुढाकार घेत असतात. परंतु असे का व्हावे, ह्याचा विचार करावयास पाहिजे.

विशिष्ट लोकसमुदायातील व्यक्ती ज्या वेळी उद्योग निर्माण करते व तो यशस्वीपणे चालविते, त्यावेळी त्या व्यक्तीच्या कुटुंबातील नवीन पिढीला देखील एकप्रकारचे अनौपचारिक अप्रत्यक्ष शिक्षण मिळत जाते आणि हा सामाजिक व्यावसायिक स्वरूपाचा वारसा पिढ्यान् पिढ्या सुरू असतो. हे जरी खरे असले, तरी या उत्तराने आर्थिक विकासाच्या मागे असलेल्या विशिष्ट प्रक्रियेसंबंधीचा प्रश्न पूर्णतः सुटत नाही. अशा कुटुंबांत मिळणारे हे अप्रत्यक्ष व अनौपचारिक शिक्षण तरी कोणत्या प्रकारचे असते ? यशस्वी होण्यासाठी कारणीभूत ठरणारी काही तत्त्वे किंवा काही गुण त्यात असतात किंवा काय ? जर अशा प्रकारची काही तत्त्वे असतील तर त्यांची उकल व्हावयास पाहिजे. यशस्वी उद्योजकतेच्या मागची अशी काही तत्त्वे जर शोधून काढता आली, तर 'औद्योगिक विकास' हा एकाच विशिष्ट लोकसमुदायाची मक्तेदारी ठरणार नाही. एवढेच नव्हे तर समाजातील जास्तीत जास्त व्यक्तींना असे प्रशिक्षण जर देता आले, तर समाजाचा आर्थिक व औद्योगिक विकास बहुअंगांनी होण्यास फारसा वेळ लागणार नाही.

औद्योगिक विकासासाठी समाजाने काही विशिष्ट अभिवृत्तींची व मूल्यांची जोपासना करावयास हवी. आर्थिक व औद्योगिक विकासासाठी पोषक असलेल्या काही अभिवृत्तींची मांडणीही करता येईल. जसे, रूढिप्रियतेमुळे आर्थिक विकासाला खीळ बसते, तर आधुनिकतेच्या किंवा नवतेच्या अभिवृत्तीने त्याची गती वाढत असते. 'आधुनिक अभिवृत्तीत' आधुनिक तंत्रांचा व यंत्रांचाच उपयोग केवळ अंतर्भूत नाही, तर व्यक्तीची मानसिक घडणदेखील 'आधुनिक' असावयास हवी, अशी कल्पना आहे. या प्रकारच्या मनोवृत्तीत वस्तुनिष्ठ दृष्टी, कठोर तार्किकता व एकप्रकारचे रूढिभंजनाचे सामर्थ्य यांचा अंतर्भाव होतो. सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने या प्रकारची विविध मूल्ये स्पष्ट करता येतील. परंतु ही मूल्ये समाजात व विशेषतः परंपरावादी समाजात रुजतील कशी ? जुनाट रूढिप्रिय समाज ही मूल्ये एकाएकी स्वीकारतील काय ? आणि या प्रकारच्या परिवर्तनासाठी फार मोठा कालखंड जर लागणार असेल तर, समाजाचा विकास देखील कासवाच्याच गतीने होईल. विकसनशील किंवा अविकसित राष्ट्रांना आज हे परवडण्यासारखे नाही.

## कर्तृत्व–प्रेरणा

या प्रश्नाचा विचार अगदी वेगळ्या दृष्टीने अमेरिकेत मॅक्लीलँड या संशोधकाने केला. मॅक्लीलँड हा मनोवैज्ञानिक. त्यामुळे त्याने मानवी वर्तनाच्या दृष्टिकोनातून या समस्येकडे बघितले. मानवी वर्तनाचा विचार करताना वर्तन ‘कसे’ घडते व ते ‘का’ घडते, या दोन प्रश्नांचा विचार प्रामुख्याने करावा लागतो. आर्थिक विकासाला पोषक असे वर्तन माणूस ‘का’ करतो, हे शोधून काढण्याचा प्रयत्न मॅक्लीलँडने केला. त्याच्या मते या प्रकारच्या वर्तनामागे समाजातील माणसामाणसात असलेली ‘कर्तृत्वाची प्रेरणा’ (achievement motivation) असते. या कर्तृत्व-प्रेरणेने किंवा सिद्धि-प्रेरणेने भारलेली माणसे ज्या समाजात अधिक असतील, त्याच समाजाचा विकास सर्वतोपरी सतत होत जातो. अर्थात कर्तृत्व-प्रेरणेची मूळ कल्पना मॅक्लीलँडची नाही. परंतु त्याने या कल्पनेचा विकास इतक्या वेगळ्या पद्धतीने केला की, आज हा नवीन विचार त्याच्याच नावाने ओळखला जातो.

हातात घेतलेले कोणतेही काम जास्तीत जास्त चांगले व्हावे, यासाठी जी माणसे सतत व अविरत धडपड करीत असतात, त्यांच्यात कर्तृत्व-प्रेरणा आहे, असे मानण्यात येते. मी काल जे काम केले, त्यापेक्षा माझे आजचे काम अधिक चांगले व्हावयास हवे, आणि कामाचा गुण किंवा प्रत अधिकाधिक श्रेष्ठ होत जावी, ही कल्पना या प्रेरणेच्या मुळाशी असते. अर्थात या प्रेरणेतून निर्माण झालेल्या वर्तनात स्पर्धा आहे, पण ती इतरांशी करण्याऐवजी स्वतःशीच अधिक प्रमाणात करावयाची असते. मॅक्लीलँडच्या संपूर्ण संशोधनाचे वैशिष्टच असे की, त्याने या प्रेरणेचे मोजमाप करण्याचे तंत्र शोधून काढले व हे मापनतंत्र शास्त्रीय आधारावर सिद्ध केले. मापनतंत्र जोपर्यंत हाती येत नाही, तोपर्यंत अशा कल्पना केवळ अमूर्त पातळीवरच असतात व त्यांचा उपयोग व्यावहारिक जीवनात करताच येऊ शकत नाही. त्यामुळे कर्तृत्व-प्रेरणेच्या मापनाचे तंत्र निर्माण केल्याबरोबर या तंत्राचा उपयोग मॅक्लीलँडने व त्याच्या सहकाऱ्यांनी सर्व जगभर केला, आणि कर्तृत्व-प्रेरणेचे एक स्वतंत्र शास्त्रच तयार झाले.

मॅक्लीलँडच्या संशोधनांनी हे सिद्ध केले की जगातील राष्ट्रांचा आर्थिक व औद्योगिक विकास त्या त्या राष्ट्रांतील माणसात असलेल्या कर्तृत्व-प्रेरणेच्या प्रमाणावरच अवलंबून असतो. ज्या समाजातील माणसात कर्तृत्व-प्रेरणा अतिशय प्रभावी असते, ती माणसे उद्योगाच्या क्षेत्रात उतरतात, श्रेष्ठत्वासाठी अविरत धडपड करतात, सतत नवीन तंत्रांचा शोध घेतात, आणि नवीन समाजनिर्मितीला पोषक असलेल्या आधुनिक अभिवृत्तींची जोपासना करीत असतात. या धडपडीतून ही माणसे स्वतःच्या समाजाला व राष्ट्राला आर्थिक विकासाच्या क्षेत्रात सतत वरवर नेत असतात. जर्मनी, जपान व इस्रायल या राष्ट्रांतील व्यक्तींत कर्तृत्व-प्रेरणेचे प्रमाण फार तर जास्त असलेले आढळते. या राष्ट्रांची आर्थिक प्रगती केवढ्या वेगाने झाली, हे आपल्याला ठाऊक आहे. भारतात देखील पंजाब व दिल्ली येथील तरुणांची कर्तृत्व-प्रेरणाविषयक गुणांक सापेक्षतः फार जास्त असलेले दिसतात. याउलट विदर्भातील विद्यार्थी-तरुणांत या प्रेरणेचे प्रमाण कमी असलेले आढळून आलेले आहे. आर्थिक व औद्योगिक विकासाच्या श्रेणीवरदेखील याच प्रकारचा क्रम दिसतो. तात्पर्यार्थ, समाजाचा आर्थिक विकास व त्यातील व्यक्तीत असलेल्या कर्तृत्व-प्रेरणेचे प्रमाण यांचा संबंध अतूट असतो, हे शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध झालेले आहे.

भारतासारख्या विकसनशील राष्ट्राच्या दृष्टीने हा शास्त्रीय विचार महत्त्वाचा असला तरी केवळ कर्तृत्व-प्रेरणेचे प्रमाण शोधून आर्थिक विकास साधणार नाही, हेही तेवढेच खरे आहे. धडपड करण्याची वृत्ती असलेल्या व्यक्ती समाजात कमी आहेत, हे लक्षात आल्यानंतर त्या समाजाने स्वस्थ बसावयाचे काय? असे असेल तर शास्त्रीय संशोधनांचा व्यावहारिक जीवनात काय उपयोग? शास्त्रीय संशोधनांनी समाजजीवनाला नवीन दिशा द्यावयास हवी.

## कर्तृत्व-प्रेरणेचे मूळ घटक

याच दृष्टिकोनातून, कर्तृत्व-प्रेरणेचे मूळ घटक शोधून काढण्याचा प्रयत्न या संशोधकांनी केला. जर्मनी व इतर अनेक पाश्चात्त्य राष्ट्रांची आर्थिक प्रगती प्रामुख्याने प्रॉटेस्टन्ट पंथीय व्यक्तींनीच केली, कारण त्यांची जीवनमूल्ये कॅथॉलिकांपेक्षा वेगळ्या प्रकारची असतात, या मॅक्स वेबरच्या सुप्रसिद्ध तत्त्वज्ञानाचा पाठपुरावा मॅक्लीलँडने केला. कर्तृत्व-प्रेरणेचा सिद्धान्त जर खरा असेल, तर मॅक्स वेबरच्या या तत्त्वज्ञानाशी त्याचा कितपत संबंध आहे, हे बघण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि असे लक्षात आले की, प्रॉटेस्टन्ट पंथीय व्यक्तीचे कर्तृत्व-प्रेरणादेखील सापेक्षतः अधिक असते. असे का व्हावे? मॅक्स वेबरने सुचविल्याप्रमाणे प्रॉटेस्टन्ट पंथीय व्यक्तीची जीवनमूल्ये व कर्तृत्व-प्रेरणेचे पोषण करणारी जीवन-मूल्ये एकच आहेत काय? आणि जर ती तशी असतील तर ती निर्माण तरी होतात कशी? प्रॉटेस्टन्ट पंथीयात जी कर्तृत्व-प्रेरणा दिसते, तिचा मूलस्रोत तरी कुठे असतो?

यासंबंधीचे संशोधन विन्टरबॉटम या स्त्रीने केले, व तिच्या हे लक्षात आले की, प्रॉटेस्टन्ट पंथीय मुलांच्या माता प्रामुख्याने याच्या मागे असतात. कॅथॉलिक मातांच्या तुलनेत प्रॉटेस्टन्ट पंथीय माता आपल्या मुलांना फार वेगळ्या पद्धतीने वाढवितात. विशेषतः स्वतंत्र वृत्तीचे व स्वावलंबनाचे प्रशिक्षण प्रॉटेस्टन्ट मुलांना बाल्यावस्थेत फार काटेकोरपणे देण्यात येते. स्वतःच्या मुलांना वाढविण्याची या मातांची पद्धती जरी प्रेममूलक असली, तरी त्यात स्वतंत्रवृत्तीच्या प्रशिक्षणावर निरतिशय भर असतो. कर्तृत्व-प्रेरणांचा संबंध याच प्रकारच्या बाल-संगोपन पद्धतीशी आहे. एकूण, मातेने दिलेल्या प्रशिक्षण स्वरूपावरच कर्तृत्व-प्रेरणेचा विकास अवलंबून आहे.

ही विशेषतः विकसनशील राष्ट्रांचा आर्थिक पुनरुद्धार करावयाचा असेल, तर तिथल्या मातृत्व-प्रकारचे प्रारूपच बदलावयास हवे. कर्तृत्व-प्रेरणेच्या विकासाला पोषक ठरणाऱ्या बाल-संगोपन पद्धती कशा असाव्यात, याचे शिक्षण राष्ट्रातील तरुण स्त्री-पुरुषांना दिले गेले तर कर्तृत्वशाली किंवा पुरुषार्थी व्यक्ती समाजात निर्माण होऊ शकतात हे आता शास्त्रसिद्ध झालेले आहे. आर्थिक विकासाचा हा मार्ग जरी सापेक्षतः टिकाऊ व कायम स्वरूपाचा असला, तरी तो जवळचा मात्र नाही. प्रशिक्षणाचे परिणाम ताबडतोब दिसणार

पृष्ठ २५ वर



# अशी चौकशी, अशी फाशी !

र. धों. घाणेकर

## : तीन :

टॅफ्ट-हार्टले कायदा ३०८ विरुद्ध १०७ मतांनी पास झाला. त्या वेळी हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हच्या सभेमध्ये १६ एप्रिल १९४७ ला भाषण करताना रिचर्ड निक्सन म्हणाला :

'अमेरिकेतील कामगारांच्या दृष्टीने हा कायदा महत्त्वाचा आहे. असे सांगितले जाते की, संप झाल्याने कारखानदारांचे नुकसान होते, परंतु आपण हे विसरता कामा नये की, संपामुळे जास्त नुकसान कुणाचे होत असेल तर ते संपावर जाणाऱ्या कामगारांचे होत असते. म्हणून या कायद्यात अशी तरतूद आहे की, संपावर जायचे की नाही, यासंबंधीचा निर्णय त्या त्या कारखान्यातील कामगार 'गुप्त मतदान' पद्धतीने करतील.'

हे बिल पास झाल्यावर 'हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हने अमेरिकन विरोधी लोकांच्यावर व त्यांच्या हालचालींवर नजर ठेवणे, यासाठी कमिटी नेमली. निक्सनची अर्थातच ह्या समितीवर सभासद म्हणून नेमणूक झाली. जनतेमध्ये आणि जबाबदार वर्तमानपत्रकारांच्यामध्ये ह्या कमिटीविषयी घृणाच होती. पूर्वी ही कमिटी होती पण नुसती नावाचीच ! सभासद निष्काळजीपणाने काहीच काम करीत नव्हते. आता हा कायदा पास झाल्यानंतर व निक्सन आत शिरल्यावर मात्र त्या कमिटीत एक नवीनच चैतन्य आले.

ह्या कमिटीने १९४७ मध्ये पहिला तडाखा मारला तो जेऱ्हार्ड हसलर ह्या कम्युनिस्ट व्यक्तीवर. १९४३ मध्ये खोटया पासपोर्टवर, ही स्वारी अमेरिकेत आली आणि युद्धकाळात व नंतरही अमेरिकेत रशियाचा हेर म्हणून काम करत राहिली. चौकशीसाठी ह्या व्यक्तीला कमिटीपुढे आणल्यानंतर प्रश्नांची उत्तरे देण्याचेच त्याने नाकारले. निक्सनने कमिटीच्या स्पष्टपणे नजरेला आणले की, ह्या व्यक्तीने जर्मनी व चीन येथे हेरगिरी करून अनेक लोकांचे मुडदे पाडण्यास मदत केली आहे. आशिया खंडातील काही भाग व युरोप खंडातील काही ब्रिटिश देश, ह्यांमध्ये श्रमजीवी वर्गाकडून राष्ट्रीय मालमत्तेची अतोनात नुकसान करविली आहे आणि अमेरिकेतही तशाच प्रकारचा धोका हा हसलर व त्याचे साम्यवादी भाईभाई ह्यांच्यापासून निर्माण झालेला आहे. तेव्हा असल्या व्यक्तीवर कायदेशीर इलाज ताबडतोब केला जावा. ठराव मताला टाकल्यावर व्हिटो मार्कान्टोनिओ ह्यांनी विरुद्ध मत दिले व कम्युनिस्ट ॲडम पॉवेल ह्याने मत देण्याचे नाकारले.

ठराव असा होता :

'ह्या व्यक्तीने कमिटीचा जाणूनबुजून अपमान केला असून त्याच्यावर न्यायालयाचा अवमान करणे ह्याकरता कारवाई करावी.'

जेरॉल्ड हिसलरची बहीण रूथ फिशर हिने कमिटीपुढील साक्षीत सांगितले, ती स्वतः कम्युनिस्ट व जेरॉल्ड हिसलरही कम्युनिस्ट. हिसलरविषयी सर्व हकीकत मोकळेपणाने तिने कमिटीपुढे सांगितली.

नंतर व्हिक्टर क्रव्हेंन्चेको ह्याची साक्ष झाली. हा १९४२ ते १९४८ मध्ये रशियाचा, अमेरिकेतील माल खरेदी करणारा सरकारी दलाल व रशियाचा हेर होता.

जेरॉल्ड हिसलरला कोर्टाचा अवमान केल्याच्या आरोपाखाली २॥ वर्षांची शिक्षा झाली व हेरगिरीचा खटला न्यायालयाकडे सुपूर्द केला गेला.

ह्याच्यातूनच पुढे प्रसिद्धी पावलेले [COMMUNIST CONTROL BILL] कम्युनिस्ट विरोधी बिल अमेरिकेच्या प्रतिनिधिमंडळापुढे मांडले गेले. ते ३१९ विरुद्ध ५६ मतांनी पास झाले.

ह्या बिलातील महत्त्वाची कलमे खालीलप्रमाणे होती :

१. व्हाईट-हाऊसच्या न्यायखात्याकडे कम्युनिस्ट पक्षाचे पदाधिकारी व सभासद ह्यांनी वैयक्तिक नोंद केली पाहिजे.

२. कम्युनिस्ट संघटनांनी आपले छापलेले वाङमय अ‍ॅटर्नी जनरलच्या कार्यालयात धाडून दिले पाहिजे.

३. फेडरल सरकारी कार्यालयातून साम्यवाद्यांना नोकऱ्या दिल्या जाऊ नयेत.

४. कम्युनिस्टांनी चालविलेल्या संघटनांच्या उत्पन्नावर प्राप्तिकर बसविला जाईल.

५. कम्युनिस्ट संघटनांनी आपल्या पैशाच्या व्यवहाराची नोंद सरकारच्या दप्तरी धाडून दिलीच पाहिजे.

६. अमेरिकेमध्ये ज्या कम्युनिस्टांवर कायदेशीर इलाज केला जाईल त्यांना देशाबाहेर हाकलून देण्यात येईल व अमेरिकेत जन्मलेले व कम्युनिस्ट म्हणून समजले जाणाऱ्यांना पासपोर्ट नाकारण्यात येईल.

७. स्वतः साम्यवादी असून सरकारी नोकरीत शिरताना जर 'मी साम्यवादी नाही' असे खोटेंच प्रतिज्ञा-पत्रकावर लिहून दिले तर त्यावर रीतसर न्यायालयामार्फत जबर दंड, कारावास, नागरिकत्वाचे हक्क काढून घेणे-व हद्दपारी अशा शिक्षा केल्या जाव्यात.

ह्या बिलाने सर्व ठिकाणी वातावरण एकदम तप्त झाले. 'डेली वर्कर'ने आपल्या अग्रलेखात म्हटले, 'हुकूमशाहीची ही पावले आहेत.' गव्हर्नर ड्युई उद्गारला, 'An attempt to beat down ideas by clubs.' 'न्यूयॉर्क टाईम्स'ने म्हटले, 'It could be used to impose restraint of Freedom such as the American People have not known for last 150 years.'

[अमेरिकन लोकांना गेल्या १५० वर्षांत ज्याचा अनुभव नाही, अशा तऱ्हेची त्यांच्या स्वातंत्र्यावर बंधने घालण्यासाठी हा कायदा वापरला जाऊ शकेल.]

ख्रिश्चन मॉनिटरने रागात भलतेच लिहून टाकले :

'It would create precedents and a machinery for the kind of political proscription which could be turned by any party in power against any minority'

[या कायद्यामुळे एका अशा राजकीय हत्याराचा जन्म होतो आहे की, जे हत्यार सत्ताधारी पक्ष, अल्पमतवाल्याविरुद्ध केव्हाही वापरू शकेल.]

२२ जुलै १९४८ ला फादर क्रोनिननें निक्सनची गाठ घेतली. पूर्वी तो बाल्टिमोरला महाविद्यालयात प्राध्यापक होता. कामगार-चळवळीतही तो काम करीत असे. १९४८ च्या सुरुवातीला तो बाल्टिमोरहून वॉशिंग्टनला मजूर-संघटनांना मार्गदर्शन करण्यासाठी आला व त्याला तेथे असे आढळून आले की, मजूर-चळवळी व त्यांच्या संघटनांमधून रशियातून आलेले कम्युनिस्ट हेरगिरी करीत आहेत.

फादर क्रोनिनने सर्व हकीकत, कागदपत्रे दाखवून, निक्सनच्या पुढ्यात ठेवली. त्यांनी सांगितलेल्या नावांमध्ये हॅरी व्हाईट, अर्थुर अलेक्झांड्रोविच्, अ‍ॅडम्स, स्टीव्ह नेल्सन व हिस यांची नावे होती. ही सर्व नावे अ‍ॅटर्नी-जनरल व राष्ट्राध्यक्ष यांना माहीत असूनदेखील त्यांच्याविरुद्ध सरकार काहीच करत नव्हते.

३१ जुलै १९४८ ला एलिझबेथ बेंटले, पूर्वीची कम्युनिस्ट, ह्या कमिटीच्या अध्यक्षांना भेटावयास आली व तिने सरकार-दरबारीं वरवरच्या जागांवर ३२ कम्युनिस्ट कामावर असल्याची नावनिशीवार माहिती दिली. त्यांच्यापैकी काहींना कमिटीने बोलावून घेतले, परंतु शपथेवर साक्ष देण्याचे बहुतेकांनी नाकारले.

३ ऑगस्ट १९४८ ला डेव्हिड व्हिटॅकर चेंबर्स, ही एक व्यक्ती कमिटीच्या कार्यालयात आली व त्या व्यक्तीने अध्यक्षांना भेटून आपणास काही महत्त्वाचे सांगावयाचे आहे, ते साक्षीरूपाने नोंद करून घ्यावे, अशी विनंती केली. त्याने तोंडी सांगितले ते प्रकरण तर फारच भयंकर होते. अल्जर हिस व इतरांच्या साहाय्याने अमेरिकन सरकार-दप्तरातील महत्त्वाच्या कागदपत्रांची चोरी व त्यांची रशियाला रवानगी! अल्जर हिस ह्याचे नाव ऐकताच कमिटीच्या सभासदांना फारच मोठा धक्का बसला.

पुढे १९६२ साली निक्सनने Six Crisis हे पुस्तक लिहिले. त्यात तो म्हणतो :

'हिसची केस ही माझ्या राजकीय जीवनातील एक अत्यंत महत्त्वाची घटना. त्यात मी जीव तोडून काम केले नसते तर नावारूपाला आलो नसतो व पुढे उपराष्ट्रपतिपदाला लायक ठरलो नसतो! त्याच हिंमतीवर मला राष्ट्रपतिपदाची निवडणूक लढता आली!'

व्हिटॅकर चेंबर्सनी आपल्या साक्षीत सांगितले की, तो स्वतः १९२५ ते १९३७ पर्यंत अमेरिकेमध्ये कम्युनिस्ट पक्षाचे काम करीत होता, परंतु त्याने नंतर तो पक्ष सोडला. त्याचे कारण म्हणजे त्याची अशी पूर्ण खात्री झाली की, साम्यवाद हा व्यक्तीला अखेर गुलाम बनवतो. कम्युनिस्टांची जीत होत राहिली होती, तरी देखील मला असेच वाटले की जेत्यांच्या पक्षात जिवंत राहाण्यापेक्षा जितांच्या पक्षात मृत्यू आलेला फार बरा!

त्याच्या पक्षाचे जे काही लोक अमेरिकेच्या सरकारी-दरबारात मोठमोठ्या हुद्द्यांवर काम करीत होते, त्यांची नावनिशीवार यादी त्याने प्रकट केली. त्यात नाथन् विट्, जॉन अ‍ॅबट, ली प्रेसमन आणि अल्जर हिस ही नावे प्रमुख होती. तो पुढे म्हणाला की, त्याने ही सर्व नावे दुय्यम सेक्रेटरी ऑफ स्टेट, अ‍ॅडॉल्फ बार्ड ह्याच्याजवळ दिलेली होती; पुढे काहीच झाले नाही. उलटे असेच दिसले की, ही सर्व माणसे वरवरच्या पदावर चढविली जात आहेत!

त्याच्या पहिल्या दिवशीच्या जबानीला वर्तमानपत्रांनी चांगलीच प्रसिद्धी दिली. त्याच्या सांगण्यावरून तो 'डेली वर्कर' ह्या साम्यवाद्यांनी चालविलेल्या वर्तमानपत्राचा संपादक होता व त्यानंतर 'टाईम' साप्ताहिकाचा दुय्यम संपादक झाला. त्याच्या सांगण्यावर इतरांपेक्षा निक्सनचा चांगलाच भरंवसा बसला.

वर्तमानपत्रांत नाव प्रसिद्ध झाल्याचे दिसल्याबरोबर अल्जर हिस याने अध्यक्षांना आपण आपले म्हणणे कमिटीपुढे ५ ऑगस्टला मांडावयास येणार असल्याचा टेलिफोन केला.

हा एकच टेलिफोन-पण त्यामुळे अल्जर हिसवर अनर्थ कोसळला, आणि निक्सनच्या कीर्तिमंदिराचा पाया रोवला गेला.

## हा अल्जर हिस होता तरी कोण?

अगदी सामान्य घराण्यात जन्म झालेला हा हिस लहानपणापासूनच तीव्र व कुशाग्र बुद्धीचा होता. हॉपकिन्स युनिव्हर्सिटीचा पदवी-

धर, पुढे हारवर्डचा कायद्याचा पदवीधर व नंतर सरकारी खात्यात नोकरी. हळूहळू पावले पुढे टाकीत तो डंबरटन् ओक्स येथे बड्यांची परिषद भरली, त्याचा चिटणीस होता. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी याल्टा येथे भरलेल्या राष्ट्रपती रुझव्हेल्ट, स्टॅलिन व चर्चिल ह्यांच्या शेजारी बसून त्यांच्यातील सर्व खलबते ऐकण्याची ह्याला संधी मिळाली. सॅन्फ्रान्सिसको येथे यू. एन्. स्थापन करण्यासंबंधी जी गुप्त बैठक भरली, त्याचा हा मुख्य चिटणीस होता. युनायटेड नेशान्सच्या जनरल असेंब्लीकडे अमेरिकेचे जे पहिले शिष्टमंडळ धाडण्यात आले, त्याच्यातही ह्याचा समावेश होता. १९४० मधे जॉन फॉस्टर डलेस ह्याच्या संमतीनुसार हिस हा 'CARNIGIE ENDOWMENT FOR INTERNATIONAL PEACE' ह्या संस्थेचा अध्यक्ष झाला आणि त्याला दरमहिना वीस हजार डॉलर्स पगार मिळू लागला.

वरच्या थरावर कामे करून मानसन्मान भोगणारी ही व्यक्ती अमेरिकेमध्ये रशियाचा हेर म्हणून काम करीत असेल, असे कोणत्याच अमेरिकनला कधीच वाटले नव्हते व ते स्वाभाविक असेच होते.

पण ते सर्व बेंड आता बाहेर फुटले.

५ ऑगस्टला हिसची जबानी नोंदविण्यात आली. हिस असा वस्ताद की, तो कशाचा थांगपत्ता लागू देईना. जबानीत तो म्हणाला की, 'कम्युनिस्ट पक्षाचा तो केव्हाच सभासद नव्हता, व्हिटॅकर चेंबर्स ह्या नावाची व्यक्ती त्याच्या परिचयाची नाही.'

इतकीच वरवर जबानी देऊन तो थांबला असता, तर कमिटीतील कोणत्याच सभासदाच्या मनात किंतू येताना, परंतु जेव्हा तो म्हणाला, 'व्हिटॅकर चेंबर्स हे नावच चमत्कारिक आहे—माझ्या मुळीच परिचयाचे नाही,' तेव्हा मात्र निक्सन व रॉबर्ट स्ट्रिपलिंग जागे झाले व त्यांचा संशय दुणावला.

वरील वाक्य हिसच्या तोंडून बाहेर पडले अन् तो भोवऱ्यात अडकला. कमिटीचा मुख्य अन्वेषक (चौकशी करणारा) रॉबर्ट स्ट्रिपलिंग ह्याने व्हिटॅकर चेंबर्सचा फोटो हिसला दाखवला व 'ह्या व्यक्तीला तुम्ही कार्ल म्हणून ओळखत होता का?' असे विचारले.

हिसने नकारार्थी उत्तर दिले, परंतु त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले, हे निक्सनच्या ताबडतोब ध्यानात आले.

७ ऑगस्टला हिसला पुनः अधिक माहिती देण्यासाठी बोलवण्यात आले.

कमिटीतील बहुतेक सभासदांचे म्हणणे असे की, उगीचच हात दाखवून अवलक्षण करून घेण्यापेक्षा झालेल्या कामाचा तपशील व घेतल्या गेल्या तशा जबान्या न्यायखात्याकडे धाडून द्याव्यात व हे काम बंद करावे. फक्त निक्सन आणि स्ट्रिपलिंग ह्या विचाराशी सहमत नव्हते.

अल्जर हिस ही फार वजनदार व्यक्ती. त्याने ताबडतोब चाव्या फिरविण्यास सुरुवात केली. वर्तमानपत्रांनी आपल्या लिखाणात व्हिटॅकर चेंबर्स हा एक वेडा पीर, बावचळलेला म्हातारा आहे, त्याच्यावर कसला विश्वास ठेवावयाचा—असा ध्वनी उमटविला!

अलेक्झांडर सोल्झेनित्सेन ह्याने आपल्या GULAG ARCHIPELAGO ह्या ग्रंथात रशियन राजकर्त्यांविषयी असे लिहून ठेवले आहे :

'रशियन राज्यनीतीचे हे एक ठरीव साच्याचे सूत्र की आपल्या विरुद्ध कोणी एखादा पुरावा देण्यास यदाकदाचित पुढे आलाच तर तो वेडा आहे, त्याला म्हातारचळ भरला आहे, अशा तऱ्हेने आरडाओरड करीत राहावयाचे.'

तसाच प्रकार अमेरिकन पत्रकारांनी व्हिटॅकर चेंबर्सविरुद्ध करण्याचा सपाटा लावला. तरुण काँग्रेसमन निक्सन ह्याला अक्कल नाही. अल्जर हिससारखा अमेरिकेच्या राष्ट्रपतीच्या गोटात सतत वावरणारा, अगदी वरच्या थरावरचा मनुष्य रशियाचा हस्तक एक तर असू शकणार नाही व असला असे आपण घटकाभर मानले तरी व्हिटॅकर चेंबर्ससारख्या माणसाने कमिटीकडे ते इतक्या वर्षांनंतर सांगणे व त्याच्या म्हणण्यावर कमिटीच्या सभासदांनी विश्वास ठेवून हिसची बेअब्रू करणे, ही तर अत्यंत लाजिरवाणी व तिरस्करणीय गोष्ट होय.

५ ऑगस्टला राष्ट्रपती ट्रूमननी वर्तमानपत्रांच्या बातमीदारांना मुलाखत देताना सांगितले, 'हा कमिटीचा अव्यापारेषु व्यापार आहे. जबान्यांतून काहीही तथ्य नसून, व्हाइट-हाऊसमध्ये कोणीही कम्युनिस्ट घुसलेला नाही.'

काही वर्तमानपत्रकारांनी चेंबर्सला अट्टल दारूड्या, बाहेरख्याली, वेडपट व वेड्यांच्या इस्पितळात ठेवण्यालायक असा ठरवला.

कमिटीचे बहुतेक सर्व सभासद अंग झाडून मोकळे झाले; व त्यांनी तसे निक्सनला सांगितले देखील. पण निक्सन व स्ट्रिपलिंग ह्यांना कमिटीचे म्हणणे पटेना. त्या दोघांनी आपल्या शिरावर सर्व जबाबदारी घेतली व प्रकरण धसास लावावयाचे ठरविले. हे असे ठरविण्याला सर्वांत मुख्य कारण म्हणजे वर सांगितलेला वर्तमानपत्रामधील प्रचार. हा प्रचार इतक्या झटकन करण्यामागे खास हिसचाच हात असावा असे त्या दोघांनाहि वाटले. त्यांचा हिसविषयी संशय बळावला.

कमिटीच्या अध्यक्षांनी स्वतः राजीनामा देऊन निक्सनला हिस–चेंबर्स प्रकरण हाताळण्यासाठी म्हणून तात्पुरता अध्यक्ष बनवून टाकले. निक्सनने ती जबाबदारी आनंदाने स्वीकारली.

७ ऑगस्टला व्हिटॅकर चेंबर्सला कमिटीपुढे पुन्हा बोलावण्यात आले. निक्सनने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देताना चेंबर्सनी सांगितले की, १९३५ पासून तो हिसला ओळखत होता व कम्युनिस्ट–पक्षाच्या सभासदत्वाची वर्गणी जमा करण्याच्या निमित्ताने त्याच्या घरी पण जात होता. कित्येक वेळा तो त्याच्या घरी राहिला होता. हिसला 'हिली' व त्याच्या पत्नीला 'डिली' अशा नावांनी ते एकमेकांना पुकारीत. हिसच्या विषयी बरीचशी खाजगी माहिती, त्याची व त्याच्या पत्नीची निरनिराळी नावे, त्यांच्या सवयी, निरनिराळ्या वेळी त्यांनी बदललेली घरे, ह्याची सुसंगतवार माहिती त्याने कमिटीपुढे ठेवली.

## रशियन राजनीतीचे एक ठरीव साच्याचे सुत्र असे....

१० ऑगस्टला निक्सन एकटाच व्हिटॅकर चेंबर्सच्या घरी गेला. पुनः १२ तारखेला बरोबर एक व्यक्ती घेऊन गेला व १४ तारखेला गेला त्यावेळी स्ट्रिपलिंगला त्याने बरोबर नेले होते.

ह्या चार दिवसांमध्ये निक्सनने रात्रंदिवस कष्ट घेतले. निरनिराळ्या कांग्रेसमनना जबानीच्या नकला धाडून देऊन, त्यांची त्याने मते अजमावली. डल्लेसला भेटून त्याला प्रत दाखविली. सर्वांचे म्हणणे पडले की, चेंबर्स हिसच्या चांगलाच परिचयाचा असावा.

जबानी आपणहून देण्यात चेंबर्सचा हेतू काय असे विचारता चेंबर्स म्हणाला, 'अमेरिकेसारख्या सुंदर देशाला कम्युनिस्ट विचाराचा स्पर्श होऊ देणे हे भविष्यकाळात धोक्याचे ठरणार आहे, असे माझे मत बनले म्हणून!'

१६ ऑगस्टला हिस कमिटीपुढे साक्षीसाठी येणार होता. तो आला. निक्सननी त्याची चांगलीच छेडछाड केली. निक्सनचा विश्वास दुणावला.

२५ ऑगस्टला दोघांनी–हिस व चेंबर्स ह्यांनी–कमिटीपुढे हजर राहावे, असे त्यांना कळविण्यात आले.

दुसऱ्या दिवशी रेल्वेने वॉशिंग्टनहून न्यूयॉर्कला जाताना वाटेत निक्सनने वर्तमानपत्र विकत घेतले. पहिल्याच पानावर हॅरी डेक्स्टर व्हाईट हा मरण पावल्याची बातमी होती. ३ ऑगस्टला इलिझबेथ बेंटले व व्हिटॅकर चेंबर्स ह्या दोघांनी हा पक्का कम्युनिस्ट असल्याचे सांगितल्यावरून कमिटीने त्याला बोलावून घेतले होते. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यास त्याने नकार दिला होता.

चौकशीअंती निक्सनला कळले की, त्याने आत्महत्या केली होती. परंतु डॉक्टरांनी 'हृद्रोग' म्हणून मृत्यूचे कारण दाखवून त्याचे दफन करून टाकले होते.

१७ ऑगस्टला कमोडर हॉटेलच्या १४०० व्या खोलीमध्ये संध्याकाळी ५॥ वा. कांग्रेसमन मॅकडोनॉल्डच्या अध्यक्षतेखाली सब-कमिटीची बैठक अल्जर हिसची जबानी घेण्यासाठी बसली.

मॅकडोनॉल्ड, निक्सन, पार्नेल थॉमस, स्ट्रिपलिंग, ४ कारकून, २ रिपोर्टर्स, अल्जर हिस, त्याचा स्नेही चार्लस डोलार्ड आणि व्हिटॅकर चेंबर्स ह्यांखेरीज त्या खोलीत कोणीही हजर नव्हते. कामकाज सुरू झाले. मॅकडोनॉल्डने हिसला चेंबर्सपुढे जाऊन त्याची काही ओळख पटते का ते पाहून येण्यास सांगितले.

त्याला न ओळखल्याचे ढोंगी प्रदर्शन त्याने फारच सुबक तऱ्हेने केले. त्याला निरखून पाहिल्यावर हिस म्हणतो :

'Oh–He is George Crosley'

['अरेच्या–हा तर जॉर्ज क्रॉसले दिसतो!']

दूर अंतरावर दिलेल्या खुर्चीवर बसून हिसने चेंबर्सला प्रश्न विचारला :

'आपण दिलेल्या नकारार्थी उत्तरांची होकारार्थी उत्तरांशी सांगड कशी काय घालू शकता–ते स्पष्ट कराल का?'

चेंबर्स शांतपणे म्हणाला, 'त्यात काय विशेष आहे? मी कम्युनिस्ट होतो आणि अल्जर्स, आपणही कम्युनिस्टच होता. वॉशिंग्टनला मी आलो तोच मुळी अमेरिकेतील कम्युनिस्ट पार्टीचा एक पदाधिकारी म्हणून आलो. अमेरिकेत मी भूमिगत राहून गुप्त चळवळीत होतो आणि आपणही होता. आपण दोघेही मित्र म्हणून राहत होतो व आपणच मला चळवळीत ओढलेत व खेचलेत. मी संपूर्ण सामील झालो.'

कमिटीच्या अध्यक्षांकडे पाहून हिस म्हणाला, 'जॉर्ज क्रॉसले ह्या नावाने ही व्यक्ती अमेरिकेत वावरत होती, हे मला आता आठवतं. पण तो साम्यवादी होता व मी साम्यवादी होतो, हे मात्र सपशेल खोटे आहे!'

अल्जर हिसने २३ जून १९३६ ला १९२९ च्या मॉडेलची फोर्ड रोडस्टर ही गाडी विल्यम रोझेन ह्या बनावट नावावर बदली करून घेतली होती. व्हिटॅकर किंवा जॉर्ज क्रॉसले ह्या नावावर नव्हे; आणि त्याच्या अगोदर ७ सप्टेंबर १९३५ ला 'प्लायमाऊथ' मेकची कोरी करकरीत गाडी स्वतःच्या नावावर खरेदी केली होती.

विल्यम रोझेन ह्या नावाची कम्युनिस्ट–विचारसरणीची व्यक्ती त्या वेळेस अमेरिकेत होती, तिचा तपास काढून निक्सनने त्याला कमिटीपुढे बोलावून घेतले. त्याने उत्तरे देण्याचे नाकारले.

१७ ऑगस्टला कमोडर हॉटेलमध्ये भरलेली कमिटीची बैठक ही अत्यंत गुप्त बैठक होती; परंतु त्यानंतर भरावयाची २५ ऑगस्टची बैठक सर्वांना खुली असल्याचे कमिटीने जाहीर केले. त्या दिवशी हॉल पूर्ण भरलेला. दाटीवाटीत प्रेक्षक बसलेले. बातमीदार, फोटोग्राफर्स, रेडिओ-टेलिव्हिजनचे कॅमेरे लावून ठेवले गेलेले. सगळा ताफा पूर्ण हजर.

क्रॉसले हे नावच मुळात खोटे, तेव्हा हिसला ह्या खोट्या नावावर त्या नावाच्या सह्या करून जुनी फोर्ड गाडी विकत घेण्याचे काय प्रयोजन, ह्याचा शोध लावण्यासाठी निक्सनने जिवाचा अक्षरशः आटापिटा चालवला होता. अखेर शोध लावला.

२५ ऑगस्टला हिसची जबानी सुरू झाली. त्याने गेल्या १५ वर्षांतील त्याच्या कामगिरीचा आढावा वाचला. मोठमोठ्या ३४ व्यक्तींशी आपले घनिष्ठ संबंध असल्याचे त्याने सांगितले. त्यांत सिनेटर्स, कॉंग्रेसमेन, जजेस, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, मंत्रिमंडळातील मंत्री, निरनिराळ्या खात्यांतील सेक्रेटरीज होते.

हिसचा हेतू Innocence by Association' [ मोठ्यांची दोस्ती व ओळख आणि त्यामुळे आपण निर्दोषी! ] हे सांगण्याचा असावा. त्याने एकदाचे जबानीत सांगून टाकले की, चेंबर्स हा मनुष्य वेडाची लहर येत असलेला आणि चमत्कारिक दिसतो.

५ तासांच्या जबानीनंतर हिस निघून गेला व त्याच्यानंतर चेंबर्स पुढे आला. साक्ष देताना तो म्हणाला :

'हिसने आपल्या जबानीत माझ्याविषयी जे काही सांगितले ते सर्व खोटं आहे. माझ्या मनात हिसविषयी वैर व दुष्टावा असण्याचे मुळीच कारण नाही. मी त्याचा मुळीच द्वेष करीत नाही. मी स्वतः व अमेरिकन राष्ट्र ज्या कम्युनिस्टविचारसरणीशी सामना देत आहोत, त्या तत्त्वाचा हिस अजूनही, आपल्यात राहून, पुरस्कार करतो आहे, हे मला अत्यंत धोक्याचे वाटले म्हणून मी पुढे झालो व जबानी दिली.'

हिसच्या पायाखालची वाळू सरकत होती आणि त्यामुळेच तो दिवसानुदिवस अधिकच चमत्कारिक व अविचारी होऊ लागला होता. त्याला परिस्थितीची पूर्ण कल्पना आलेली होती. चेंबर्सनी आणखी काही गुपिते फोडू नयेत म्हणून त्याच्यावर मारेकरी घालण्याचा

प्रयत्न केला गेला, विषप्रयोगाचाही प्रयत्न झाला. परंतु चेंबर्सने ३ ऑगस्टला झालेल्या बैठकीनंतर कमिटीकडे त्याला संरक्षण मिळावे म्हणून विनंती केली व त्यानुसार कमिटीने त्याच्या घरावर २४ तास पहारा बसविला होता.

१७ ऑगस्टची जबानी झाल्यावर हिसने व्हिटॅकर चेंबर्सला जाहीर आव्हान दिले की, त्याने काँग्रेसच्या संरक्षणाखाली कमिटी-पुढे जी जबानी दिली तशी जाहीररीत्या बाहेर बोलावे म्हणजे त्याच्यावर अब्रुनुकसानीची फिर्यादच लावली जाईल.

हे आव्हान व्हिटॅकर चेंबर्सनी स्वीकारले.

हिसने आपले मरण स्वतःच्या हातांनीच ओढून घेतले.

'MEET THE PRESS' ह्या रेडिओवरील कार्यक्रमात २७ ऑगस्टला चेंबर्सला मुलाखत देण्यासाठी बोलावण्यात आले. ह्या कार्यक्रमात वॉशिंग्टनपोस्टचा एडिटर फोलियर्ड याने त्याची मुलाखत घेतली.

फोलियर्डने पहिलाच प्रश्न विचारला, 'चेंबर्स, अल्जर हिसवर आपण जे आरोप केलेत ते आता ह्या ठिकाणी सार्वजनिकपणे जाहीररीत्या पुन्हा सांगू शकाल का?'

'का नाही? जरूर सांगतो. अल्जर हिस हा पूर्वी कम्युनिस्ट होता व आजही असण्याची शक्यता आहेच!'

नेहमीच ह्या कमिटीची टिंगल उडविण्याचे काम करणारे 'वॉशिंग्टनपोस्ट'सारखे जबाबदार वर्तमानपत्र अल्जर-हिस प्रकरण इत्थंभूत छापू लागले.

बाल्टिमोरच्या दिवाणी न्यायालयात हिसने व्हिटॅकर चेंबर्सवर ७५००० डॉलर्सच्या अब्रुनुकसान-भरपाईचा दावा लावला.

नोव्हेंबर १९४८ च्या निवडणुकीत निवडून आल्यावर प्रेसिडेंट ट्रूमनने 'UN-AMERICAN ACTIVITIES COMMITTEE'सारख्या कमिट्यांची जरूर नाही म्हणून जाहीर केले.

वॉशिंग्टनच्या 'डेली न्यूज' ह्या पत्रात बातमी आली की, व्हाइट-हाऊसचे न्यायखाते अल्जर-व्हिटॅकर चेंबर्स प्रकरण सिनेटकडे पाठविण्याची जरूरी नाही असे म्हणते.

'हेरॉल्ड ट्रिब्यून'नी त्याच्या दुसऱ्या दिवशी बातमी छापली की व्हिटॅकर चेंबर्सचे तर असे म्हणणे आहे की, अल्जर हिस हा नुसताच कम्युनिस्ट नाही तर रशियन हेर आहे! त्याने स्वतः जे कागदपत्र न्यायखात्याकडे सुपूर्त केले आहेत, ते तर एखाद्या स्फोटक अग्नि-गोलकासारखे आहेत.

व्हिटॅकर चेंबर्सनी पुढे WITNESS ह्या नावाचे पुस्तक लिहिले. त्यात ह्या आताच्या परिस्थितीचे चित्रण करताना तो म्हणतो, '१७ ऑगस्टची माझी जबानी झाल्यानंतर हिसपासून मला फारच धोका वाटू लागला व जगातून नाहीसं करण्याच्यादेखील हिस धमक्या देऊ लागला. अशा परिस्थितीत जर मी यदाकदाचित मेलो असतो तर हिस एक फार मोठा प्रामाणिक मनुष्य म्हणून अमेरिकेत वावरत राहिला असता. मी स्वतः मात्र एक वेडा पीर म्हणून इतिहासात जमा झालो असतो.'

चेंबर्सनी आपले अत्यंत महत्त्वाचे असे कागदपत्र १० वर्षांपूर्वीच आपल्या पत्नीच्या भाच्याकडे नेऊन लपवून ठेवलेले होते. या भाच्याचे नाव लेव्हिन. त्यावेळी म्हणजे १९३७–३८ मध्ये आपला खून होईल, असेच चेंबर्सला वाटत होते; म्हणून लेव्हिनला त्याने सांगून ठेवले होते की, त्याच्या मृत्यूनंतर ते कागदपत्र सरकार-दरबारी नेऊन द्यावेत.

ते सर्व कागदपत्र व फोटो-फिल्म्स एक मोठा कोहळा कोरून त्याच्या आत ठेवून दिलेले होते. ते पुढे 'पंपकिन पेपर्स' म्हणून प्रसिद्ध झाले.

निक्सन व्हिटॅकर चेंबर्सला घरी जाऊन भेटला, त्यावेळी चेंबर्सनी आपण सर्व कागदपत्र ॲटर्नी जनरलच्या कार्यालयात जमा करून आलेलो आहोत, असे निक्सनला सांगितले. स्थळप्रतीची नक्कलही निक्सनला दिली.

पंपकिन पेपर्स खालीलप्रमाणे होते.

1) Sixtyfive typed papers of copies and summeries of confidential State Department documents.
(all typed on the typewriter owned by Algier Hiss)
2) Three memoranda in the handwriting of Hiss
3) Two strips of developed microfilmes.
4) Three cylinders of undeveloped microfilmes.
5) Eight Page memo of confidential Treasury Dept. information in the handwriting of Harry Dexter White.

हे सर्व कागदपत्र सरकारी खात्यांतून व कम्युनिस्ट संघटनांच्या कार्यालयातून चोरून आणून इतक्या वर्षे आपण लपवून ठेवल्याचे चेंबर्सनी सांगितले.

१७ नोव्हेंबरला हे कागद सरकार-दरबारी दिले गेले, हे ऐकून निक्सन चाट पडला.

सिनेटच्या ग्रॅन्ड ज्यूरीपुढे ६ डिसेंबर १९४८ ला हजर राहाण्या-संबंधी व्हिटॅकर चेंबर्सवर वारंट बजावले गेले.

मध्यंतरीच्या काळात निक्सनला महत्त्वाच्या अशा तीन गोष्टी कळल्या. पहिली म्हणजे स्टेट डिपार्टमेंट हिसवरती काहीही इलाज करणार नसून चेंबर्सवर खटला भरणार आहे; दुसरे म्हणजे सर्व प्रकरण दडपून टाकून उजेडात काहीही आणावयाचे नाही असा मानस आहे, आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे चेंबर्सनी दिलेले Pumpkin Papers नाहीसे करून टाकण्याच्या विचारात वरवरचे अधिकारी आहेत.

ठरल्याप्रमाणे ६ डिसेंबर १९४८ ला ग्रॅन्ड ज्यूरीपुढे व्हिटॅकर चेंबर्सची जबानी संध्याकाळी ८ वाजता सुरू झाली व रात्री १ वाजता संपली.

निक्सन ताबडतोब न्यूयॉर्ककडे धावला. कारण त्याला माहीत होते की, न्यूयॉर्कच्या चालू ग्रॅंड ज्यूरीची मुदत फक्त ९ दिवसच शिल्लक होती; व नंतर त्या ज्यूरीवर नवीन माणसे नेमली जाणार होती. ट्रूमनची नवीन कारकीर्द २० जानेवारी १९४९ ला सुरू

## चोरून आणलेले पंपकिन पेपर्स

झाल्याबरोबर 'अनअमेरिकन अॅक्टिव्हिटी'चा अध्यक्ष जो आता रिपब्लिकन पक्षाचा होता तो डेमोक्रॅट येणार होता !

ज्यूरीपुढे जबानी देताना चेंबर्स म्हणाला होता–

'हिस आणि सरकार–दरबारातील बरीचशी माणसे कम्युनिस्ट पक्षांची होती.' थोडक्यात ते रशियन सरकारचे हेर होते. त्यांचे काम कसे चालत होते ह्याचे वर्णन करून सांगताना तो म्हणाला, 'अल्जर हिस हा संध्याकाळी काम संपल्यावर महत्त्वाचे कागदपत्र घरी घेऊन येई. नंतर ते चेंबर्समार्फत कम्युनिस्ट फोटोग्राफरकडून मायक्रोफिल्म केले जात, नकला काढल्या जात व पुन्हा दुसऱ्या दिवशी त्या त्या विवक्षित फाइलीमधून ते कागद ठेवले जात. काही काही वेळेला बऱ्याचशा कागदपत्रांचा थोडक्यात सारांश, प्रिसिल्ला हिस ही त्यांच्या घरच्या वुडस्टॉक टाइपरायटरवर टाईप करी. अखेरी ते सर्व कागद चेंबर्सच्या मार्फत कर्नल बाकाव्ह याच्याकडे पोहोचते होत.'

वर्तमानपत्रांतून हिस-चेंबर्स ह्यांचे अद्भुत प्रकरण सविस्तरपणे प्रसिद्ध केले जात होते. प्रेसिडेंट ट्रूमन भयंकर चिडलेला होता. कारण त्याला हे प्रकरण वाढविलेले मुळीच आवडले नव्हते.

चेंबर्सच्या सिनेटपुढील जबानीनंतर 'वॉशिंग्टन्‌पोस्ट' ने अग्रलेख लिहिला. 'अध्यक्षांच्या मनात हे प्रकरण दडपण्याचे आहे असे दिसले. असे असेल तर यांत दूरदृष्टी नाही.'

१५ डिसेंबर १९४८ ला ग्रॅन्ड ज्यूरीच्या सर्वच्या सर्व १९ सभासदांनी एकमतानी निकाल दिला की, हिसवर खटला भरला जावा !

१७ नोव्हेंबर १९४९ ला हिसवरचा खटला सुरू झाला व २१ जानेवारी १९५० ला संपला. जज गोलार्ड ह्याने त्याला ५ वर्षाची शिक्षा दिली.

अल्जर हिसला शिक्षा झाल्याचे कळताच निक्सन म्हणाला.–

'It is not a pleasant picture to see the whole brilliant career of this person destroyed before his own eyes. This case involved the security of whole nation and the case of free men everywhere. Where the battle against Communist is concerned. Victories are never final so long as the Communists are still able to fight.'

[अत्यंत बुद्धिमान माणसाचा अध:पात त्याला आता स्वत:च्याच डोळ्यांनी पाहावा लागणार आहे ! हे चित्र काही चांगलं नव्हे ! ह्या केसनी हे सिद्ध झालेलं आहे की, अमेरिका सुरक्षित नाही. पुरा नि:पात होईपर्यंत आपल्याला कम्युनिस्टांशी झगडावे लागणार आहे.]

२१ जानेवारी १९५० ची ही घटना.

अल्जर हिसने स्वत:चा अध:पात पाहिलाच, पण निक्सनने देखील स्वत:चा अध:पात जेव्हा ९ ऑगस्ट १९७४ ला पाहिला तेव्हा अल्जर हिस जिवंत होता.

सुप्रीम कोर्टाने हिसने शिक्षेविरुद्ध केलेले अपील फेटाळून लावले. शिक्षा भोगल्यानंतर हिस खाजगी कंपनीत नोकरी करीत राहिला. व्हिटॅकर चेंबर्स मात्र ९ जुलै १९६१ ला. अमेरिकेतच मृत्यू पावला होता.

त्यावेळेचा अध्यक्ष ट्रूमन हा डेमोक्रॅटिक पक्षाचा होता व रशियाशी आपले सरळसूत राहिले तर बरे ह्या भूमिकेवरून तो अमेरिकेतील कम्युनिस्टांच्या चळवळीकडे पाहात असे. यामुळे हे हिस-प्रकरण या थराला गेले हे त्याला रुचले नव्हते.

हिसची केस संपली पण सरकारपक्षीय वर्तमानपत्रकार निक्सनवर चिखलफेक करीतच राहिले. १९६२ मध्ये निक्सनने लिहिलेल्या SIX CRISIS ह्या पुस्तकात तो म्हणतो–

'हिसचे पितळ मी जगापुढं उघड करून ठेवलं खरं, पण त्यामुळे माझ्याविरुद्ध नको नको ते आरोप वृत्तपत्रांनी जनतेत प्रसृत केले. मला दोन बायका आहेत, मी दारूड्या आहे, बनावट कागदपत्रे करणारा मी लुच्चा आहे, चोर, दरवडेखोर, वेडापिसा–अशा सर्व दुर्गुणांचा मी पुतळा आहे.'

सत्ताधीशांपुढे गोंडा घोळून जगणारी वृत्तपत्रे ही सरकारला नको असलेल्या व्यक्ती, संस्था व संघटना यांना बदनाम करण्याचे कार्य अविरत कशा करतात, हा सर्व ठिकाणचा अनुभवच निक्सनला येत होता. असे करताना वृत्तपत्रे पहिला वध करतात तो सत्याचा ! कारण ते मारल्याखेरीज खोटे काही काळ देखील विकता येत नाही.

निक्सन पुढे म्हणतो : 'सार्वजनिक आयुष्यातून उठविण्यासाठीच हे सर्व चाललेलं होतं. काही काही वेळेला मस्तक भडकून जाई, व 'नको ते राजकारण' असा मन:स्ताप होई–पण माझे मन मला पुन: पुन: सांगे की, राजकारणात काम करणाऱ्यांची चामडी घट्ट आणि चिवट असावयास पाहिजे...हे असे आरोप होतच राहावयाचे ! त्यांना तुम्ही कोठवर उत्तरे देणार ?'

अध्यक्ष अधूनमधून नेहमीचेच तुणतुणे वाजवीत असे–

'रिपब्लिकन्स–रिकामटेकड्यांचा हा एक उद्योग आहे झालं !'

अध्यक्षांचीच फूस असल्याने वृत्तपत्रांनी निक्सनच्या बदनामीची मोहीम फारच धारदार केली होती.

[क्रमश:]

---


# पॅपिलॉन
# पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पुस्तके

इट कॅन कम्युनिकेट

# नितान्त

लता भिसे

मराठी कवितेला प्रेमकाव्य नवे नाही. नवोदितांपासून प्रस्थापितांपर्यंत असा एकही कवी नाही की, ज्याने एकही प्रेमकविता लिहिलेली नाही. वा. रा. सोनारही यापासून दूर नाहीत. नितान्त हा संपूर्ण संग्रहच याची साक्ष देणारा.

नितांतमधील सर्वच कवितांचा स्थायीभाव प्रेमभावना हा. प्रेमानुभव या एकाच अनुभवाच्या विविध पैलूंभोवती फिरणाऱ्या कवितांनी भरलेला हा काव्यसंग्रह! त्यामुळे या संग्रहांतून बोलकी झाली आहे ती कधी उदासी, निराशा, एकाकी भाव, एकंदर जीवनाबद्दलची निराशा, स्वप्न आणि व्यवहार यांत स्वप्नभंगानंतर कळलेला व्यवहाराचा शब्दकोष आणि त्या व्यवहारी शब्दांचे व्याकरणही.

प्रेम हा सगळ्यांनी चघळलेला विषय आणि सोनारही तोच विषय घेऊन बसलेत. पण तरीही या सर्वच कविता वेगळ्या आहेत. मग सोनारांचे वेगळेपण कशामध्ये? सोनारांचे वेगळेपण आहे ते अनुभव व्यक्त करण्यात, अनुभवाच्या सूक्ष्म सूक्ष्म बाजू, थर दाखवत अनुभवाचं शिल्प समजावून देण्यात.

सोनारांच्या सर्व कवितांत अनुभव फक्त मांडला गेला नाही तर एकाच अनुभवाचे वेगवेगळ्या पोताचे, रंगाचे, लांबीचे, रुंदीचे विविध धागे घेऊन अनुभव कवितेत विणला गेलाय आणि प्रत्येक बाजू लक्षपूर्वक पाहिल्याने, तिची निवडच उत्तम असल्याने कवितेत अनुभवांची वीण पक्की झाली, भाववृत्तीची वीण पक्की झाली आणि ही वीण पक्की होताना धाग्यांची मऊमुलायमता जराशीही संपलेली नाही. उलट यातून जी एक पारदर्शक कविता तयार झाली, ती पारदर्शकता कवीच्या रसिक, संवेदनाशील मनापर्यंत नेऊन पोहोचवतेच, पण कवितेलाही देखणं केल्याशिवाय राहत नाही. उदा.–

'सायंकाळ झेलून हृदय पांघरणारा
अनिमिष गुल्मोहर
थकून निजू आलेली पायाखाली वाळू
नेहमीची
वाकून आलेली सोनचाफ्याच्या तंद्रीतली–
नक्षत्रांची यात्रा

ती यायच्यावेळी आधीही बदामाची पाने
कुजबुजतात.'

किंवा

'प्रश्न माझ्या झेलण्याच्या सामर्थ्याचा
नाही
तुझ्या अंधुकही न शहारण्याचा आहे
स्वप्ने नक्षत्राधीन करून आभाळ
नाकारण्याचा नाही
मोडल्या घरट्यावर निवांत पक्ष्याओठी
तुझेच गाणे नित्य का याचा आहे.'

या संग्रहातल्या सगळ्याच कविता शीर्षकहीन आहेत. अंतर्मुख वृत्तीने लिहिलेल्या या भावकवितांत सतत भेटत राहते ती अनेक उत्कट भावनांची सहज भाववृत्तींची एक टवटवीत, सतेज अशी भावसृष्टी नेमक्या आणि मोजक्या शब्दात उभी केलेली.

'अशी पुरातन ओंजळ भरून घेतली
म्हणून नदीचं काळीज कळतंच असं नाही
चार नक्षत्रांच्या खड्यावर जीव टांगला
म्हणून आभाळ पाठीशी उभं रहातं असं
नाही
पाखरांचा पंचम फांद्यांतून थरथरला
म्हणून झाडांची आत्महत्या समजेल असं
नाही–'

सोनार कविता भावोत्कट बनवीत जातात ती अशी. या संग्रहातली प्रत्येक कविता म्हणजे एकएक स्वगत...स्वतःच स्वतःशी अंतर्मुख होऊन केलेल्या बारीकसारीक तपशीलासकटच्या बेरजा–वजाबाक्या. या अनुभवातल्या बेरजा–वजाबाक्या सोनार प्रामाणिकपणाने मांडतात. सबंध नितांतला उदासीनतेची काळी झालर आहे. पण ही झालर प्रसन्न करणाऱ्या प्रामाणिकपणाला असलेली झालर आहे. या कविता मोकळ्या मोकळ्या वाटतात त्या यामुळेच. वाचकाचं अप्रत्यक्षरीत्या भान ठेवून अंतर्मुख होऊन स्वतःशी बोलणं कंटाळवाणं होत नाही आणि वाचकाबद्दलचे भान जेव्हा प्रत्यक्ष होते त्या वेळेला–

"तू यायचास डोंगरापर्यंत तिच्याबरोबर
.................................
हातातल्या एका रेषेला जागून ती म्हणत
असते तिला काहीच समजलेले नाही
अगदी अजून
तर असो."

'तर असो' हा शेवटही कृत्रिम वाटत नाही.

सोनारांच्या कविता प्रेमविषयक असल्याने यात स्त्रीचे चित्रण येणे साहजिक आहे. या स्त्रीबद्दलचे आकर्षण हे शारीरिक आकर्षण नाही. सोनार तिच्या देहापेक्षा तिच्या मनाचेच चित्रण जास्त करतात. सोनारांच्या कवितेतली ही प्रेयसी हळवी, रसिक, संवेदनाशील, मुक्त, थोडीफार चतुर पण या चतुरपणाला निरागसपणाची, अजाणतेपणाची थोडी झाक असलेली अशी. ती कामिनी नाही, मानिनी नाही, ती फक्त तिचे विश्व संभाळून असणारी, 'स्वप्ने वेचून आणणारी', 'तर कधी नक्षत्रांचा थवा घेऊन येणारी', 'जिचे डोळे उमलतात' अशी, अंधार केसात माळणारी, आकाशगंगेचा गजरा हातात माळणारी, सारे चित्र चांदण्यात भिजवून टाकणारी कधी ग्रामकन्या होणारी तर कधी राजकन्या होऊन मेण्यातून जाणारी किंवा–

घळणाऱ्या पानावरून
विखुरलेला शेवटचा सूर्य
पालाण आटोपल्यावर

जोगिणीने विश्रांतीच्या कमंडलूकडे पाहावा तसा पाहाणारी. या प्रेयसीचे विविध रूपांत वर्णन करून तिला जास्तीत जास्त स्पष्ट करण्याचा सोनारांचा प्रयत्न सर्व कवितांत जाणवत राहातो. पण तिचे वर्णन पूर्णपणे प्रतिक्रियेतून केले गेले असल्याने ती जास्तीत जास्त गूढच होत गेली आहे आणि ती स्त्री जास्त गूढ असल्याकारणानेच ती जास्त आकर्षक बनली आहे.

सोनारांची कविता फक्त प्रतिक्रियात्मक नाही. या कवितेच्या आत चिंतन आहे म्हणून

प्रतिक्रिया आहेत. स्वप्नभंगानंतर भोगाव्या लागलेल्या वैफल्याची, स्वीकाराव्या लागलेल्या नको असलेल्या व्यवहाराबद्दलची प्रत्येक भावना सोनार व्यक्त करतात. या भावनेचं स्वरूप म्हणजे स्वतःला लावलेली एक शिस्त, स्वतःला सापडलेला एक क्रूर नियम असंच. उदा.—

आणि आता ऋतु येतात आणि जातात

किंवा

आपले हसू आसू आपण असू नसू
या पृथ्वीवर चिमणासा फरक पडणार काय

अगर

सगळ्याच कोमेजल्या फुलांचा एकच रंग असतो

किंवा

एखादीच सावली एखाद्या मुक्कामावर
सगळ्या सावल्यांवर सावली धरते
मित्रहो तिची जातकुळी कुणी विचारित नसतात.

वर सांगितल्याप्रमाणे सोनार फक्त अनुभव आडवाउभा विणीत नाहीत तर अनुभवाचे स्थळ, काळ, दृक्-संवेदना, स्पर्श संवेदना, त्या वेळेला निसर्ग कसा होता त्याचे विविध तपशील देत अनुभव सजीव, खोल, उत्कट, स्पष्ट करीत जातात. 'असहाय गळा थांबलेले जळून गेलेले गाणे', 'वितळलेल्या यातनांचा पाझरता प्रकाश', 'काळीकुट्ट भूक त्यांच्या चोचीतून परजलेली' ही काही उदाहरणे.

सोनारांच्या कवितेमागे उभे आहे तो सर्व स्पंदनांसह, स्पंदनांच्या सूक्ष्म आंदोलनांसह अनुभव टिपणारे जागरूक आणि संवेदनाशील मन! वेगवेगळ्या अनुभवाच्या संदर्भात नेहमीची न वापरली जाणारी क्रियापदे, नामे वापरून क्रियापदांना, नामांना काव्यात्मक करण्यात सोनार अतिशय यशस्वी झाले आहेत. "कोरड्या पात्राना नाखुशीचे पाझर", "मौनातले शहाणपण मी अदबीने शिंपले", "उत्तरात तिने फक्त डोळे वळवले" ही त्याची उदाहरणे. प्रत्येक भाषेत प्रत्येक शब्दाला विशिष्ट असा एक अर्थ असतो, परंतु तोच शब्द इतर शब्दांच्या बरोबर वापरला, वेगळ्या संदर्भात वापरला तर त्याला एक नवीनच काल्पनिक अर्थ प्राप्त होतो. क्रियापदे, नामे यांना असा काल्पनिक अर्थ देण्यात आणि त्यातून सूचकता व्यक्त करण्यात सोनार यशस्वीच झाले आहेत, एवढे नसून ते त्यांच्या स्वतःच्या शैलीचे वैशिष्ट्य आहे. पु. शि. रेग्यांच्या कवितेत नेहमी फारशा न वापरल्या जाणाऱ्या शब्दांना वेगळाच काल्पनिक अर्थ प्राप्त होतो तर ना. धों. महानोरही शब्दांना असा काल्पनिक अर्थ देऊन स्वतःचा 'महानोरी' थाट निर्माण करतात. सोनारही बोलीभाषेतले शब्द वेगळ्या प्रकाराने वापरून काल्पनिक अर्थ सूचित करतात आणि त्यामुळे त्यांच्या कवितेतले शब्द बोलीभाषेतले असूनही ते वेगळ्याच रूपात वावरताना दिसतात· 'ओल्या काळजावरून तहान टिपणे", "निरोपाची जखम गोंदविली", "आता सांडतील तेवढी गाणी..." "प्रश्नांचे कोंभ सरसरून उठले", "मी घातलेला प्रत्येक प्रश्न ती झेलत गेल्याचे समजले." प्रत्येक कवीच्या कवितेत शब्दाला असा काल्पनिक अर्थ असेलच असे नाही, पण सोनारांचा प्रत्येक अनुभव शब्दाचे काल्पनिक अर्थ एकत्र करीतच व्यक्त होतो.

या सबंध संग्रहात छंदातल्या कविता ३-४ च आहेत, याच संग्रहातल्या मुक्तछंदातल्या इतर कवितांसारख्या त्या उठावदार नाहीत. या कवितेत छंदामुळे आशय, अनुभव अडकल्यासारखा वाटतो तो मोकळा आणि म्हणूनच खरा वाटत नाही. सोनारांच्या काव्यप्रकृतीला छंद मानवणारा नाही. त्यांची स्वतःची शैली संभाषणात्मक आहे. 'नितांत'-च्या आधीच्या 'अनाद' संग्रहातही संभाषणात्मक शैलीचा त्यांनी उपयोग केला होता. संभाषणात्मक शैलीत आशय जेव्हा छंदात येतो, तेव्हा पूर्ण कविता बनावट वाटण्याचा बराच संभव असतो. पान ५७ वरची 'तुझी नियंत्रणे पावलात ये जशी कोवळी उन्हे', ही कविता किंवा 'रात्र काळी पावसाळी कोठे गर्जती घनावळी' ही ४१ पानावरची कविता, या कवितांत छंदामुळे अभिव्यक्तीला अडसर आल्यासारखा वाटतो.

नाद, ताल, लय वगैरे काव्याला आवश्यक असणारे गुण या कवितांत नाहीत, तरीही या कविता आकर्षक झाल्या आहेत. याचे कारण एकच, संभाषणात्मक शैलीला आवश्यक असणाऱ्या गोष्टी. म्हणजे मोजके शब्द, आशयघन वजनदार शब्द आणि बोलीभाषेतले वापरलेले शब्द. यामुळे कवितेचं शिल्प सजलंय, आणि सर्व बारकाव्यांसह उभं राहिलंय.

'हा दुखियारी स्वप्नाचा कोलाज' सोनारांनी मोठ्या ताकदीनं उभा केलाय. विविध प्रतिमांची पखरण, प्रतिमांतील लालित्य, अनुभवाची सतत जाणवत राहाणारी उत्कटता यामुळे नितांत हा संग्रह सहजसुंदर झाला आहे.

थोडं मुखपृष्ठासंबंधी... मुखपृष्ठ सुभाष अवचटांचं. त्यांच्या नेहमीच्या मुखपृष्ठापेक्षा वेगळं, अतिशय आकर्षक आणि आतल्या कवितांना न्याय देणारं.

शेवटी एवढंच...

टी. एस. इलियटनी एका ठिकाणी म्हटलंय, 'Genuine poetery can communicate before it is understood.' सोनारांच्या संग्रहाचं यश आहे ते इथंच. It can communicate. म्हणूनच कोणाही संवेदनाशील माणसाच्या पसंतीला उतरावा, असाच हा संग्रह. *

नितान्त : वा. रा. सोनार
चेतश्री प्रकाशन : अमळनेर
पृष्ठ : ६४
किंमत : ७ रुपये

---

## The Ascent of Man

By J. Bronowski (Pages 448, Published by BBC., Rs. 90/–)

---

जनरल नॉलेज वाढावे अशी ज्यांची इच्छा आहे त्यांनी तर हे पुस्तक वाचलेच पाहिजे, पण प्रत्येक शाळा व कॉलेज यांनी हे पुस्तक विकत घेतलेच पाहिजे, इतके हे पुस्तक उत्कृष्ट आहे. या पुस्तकात अनादी काळापासून ते १९७३ पर्यंत मानवाने यशस्वी वाटचाल कशी केली आहे, त्याचे अगदी सोप्या, सरळ भाषेत वर्णन केले आहे. वेगवेगळ्या संशोधकांची माहितीसुद्धा दिली आहे. पायथागोरस, कोपर्निकस, कॅप्लर, गॅलिलिओ, न्यूटन, डार्विन, वॉलेस, मेंडेलिव्ह, प्लँक, वॉल्टझ्मेन, हीसेनबर्ग, आईन्स्टाईन व इतर कैक वैज्ञानिकांच्या कार्याचा परिचय आहे. छायाचित्रे इतकी सुंदर आहेत की, निव्वळ त्यातच आपल्याला पुस्तकांच्या किंमतीचा मोबदला मिळून जातो.

आणि लिहिलेल्या मजकुराबाबत तर

कोणताच दोष काढता येणार नाही. भाषा व शैली थेट हृदयाला भिडणारी असल्यामुळे वाचकांच्या मनात विज्ञानाविषयी आदर व उत्कंठा उत्पन्न तर होतेच, परंतु सबंध मानवजातीबद्दल एक दांडगा आत्मविश्वास निर्माण होतो.

मला फक्त एकच गोष्ट खटकली ती ही की, इतक्या प्रतिभावंत लेखकाने भारत व इतर जुन्या संस्कृतींना Static civilizations असे म्हटले आहे. पाश्चात्य देश इतके विकसित झाले आहेत की, त्यांनी थोडी (किंबहुना बरीच) वल्गना केली तर नवल वाटण्यासारखे काही नाही. मला वाटते की, मनुष्यस्वभावच इतका ठिसूळ आहे की, हातात सत्ता व संपत्ती आली की, त्याचे वागणेच एकदम बदलते. Tielhard de Chardin सारखा बुद्धिमान लेखकसुद्धा म्हणतो की, जर मानवाचे सध्याचे अति बिकट प्रश्न सुटलेच तर ते पाश्चात्य देशामधल्या पुढारी किंवा पुढाऱ्यांमुळेच सुटतील. कदाचित तसे होईलही. परंतु जर का हे प्रश्न अणुयुद्धांनीच सुटले तर ते सुद्धा पाश्चात्य देशामुळेच होईल ! पण चांगला माणूस निर्माण करावा याची मक्तेदारी जशी फक्त पौर्वात्य देशाकडे नाही तशीच पाश्चात्य देशाकडेही नाही. ब्रॉनोव्हस्की व Chardin ची पुस्तके वाचली की, त्यांचा ज्ञानाचा पल्ला केवढा भव्य आहे ते प्रकर्षाने जाणवते. पण हेच लेखक जेव्हा पाश्चात्य व पौर्वात्यमधले भेद दाखवतात, तेव्हा मनुष्याने कितीही ज्ञान संपादन केले तरी त्याचा ठिसूळ स्वभावधर्म काही नाहीसा होत नाही, ते सुद्धा अधिक प्रकर्षाने जाणवते. या बाबतीत आणखीन थोडे पुढे लिहीत आहे. कारण हे सर्व लिहिणे म्हणजे ब्रॉनोव्हस्की साहेबांच्या पुस्तकाचे मोल कमी करणे नव्हे.

हे पुस्तक आधी पुस्तक म्हणून लिहिले गेलेच नव्हते. मुळात ते BBC ने १३ प्रणालींमध्ये TV वर प्रोग्रॅम म्हणून दाखवले होते. BBC वर ही प्रणाली तयार करायला ब्रॉनोव्हस्की टीमला २ वर्षे लागली व ३० देशांना भेटी दिल्या. मुंबई TV वर सुद्धा कोणतीच पूर्वसूचना न देता या प्रणाली रविवारी सकाळी दाखवल्या गेल्या ! या कारणामुळे Ascent of Man बद्दल बऱ्याच लोकांना माहिती नाही. या प्रोग्रॅमचे हिंदीकरण करून TV वर दाखवण्याचा बेत होता.

ब्रॉनोव्हस्कीने या पुस्तकाचा परिचय करून देताना म्हटले आहे की, हे पुस्तक मानवाचे इतिहासवजा तत्त्वज्ञान आहे आणि ते तत्त्वज्ञान मानवाचे नाही, परंतु निसर्गाचे आहे.

जॅकॉब ब्रॉनोव्हस्की १९७४ मध्ये त्यांच्या ६६ व्या वर्षी निवर्तले. त्यांचा जन्म पॉलेन्ड येथे झाला व १२ व्या वर्षी ते इंग्लंडमध्ये गेले. पुढे त्यांनी केंब्रिज येथे गणित हा विषय घेऊन अभ्यास केला. ते UNESCO कडेही कामाला होते. पुढे ते कॅलिफोर्नियात स्थायिक झाले. रेडिओ व TV वर विज्ञानाबद्दल सोप्या व सरळ भाषेत माहिती सांगण्याबद्दल त्यांची हातोटी होती. त्यांनी इतर कैक पुस्तके लिहिली आहेत. त्यात Identity of Man हे प्रख्यात पुस्तक आहे. इंग्रजी कवी व कोरीव काम करणारा कलावंत विल्यम ब्लॅक (१७५७ ते १८२७) यांच्यावर सुद्धा त्यांनी एक पुस्तक लिहिले आहे. (ब्लॅकच्या कोरीव कामात जशी एक प्रकारची प्रगल्भता व थेट हृदयाला भिडणारी सरळता होती, तसेच त्यांच्या काव्यात त्यांनी स्वतःचाच एक धर्म व पौराणिक साहित्य निर्माण केले आहे.)

विज्ञानशास्त्राच्या क्षेत्रात दीर्घकाल तपश्चर्या करून संशोधकांनी शोध कसे लावले व त्याचा उपयोग कितीसा झाला, हे या पुस्तकाचे प्रमुख आकर्षण म्हणावे लागेल. छायाचित्रे तर नॅशनल जिऑग्राफिकची आठवण करून देतात. वैज्ञानिकांच्या Peculiarities सुद्धा ब्रॉनोव्हस्की चवीनं सांगतात. आईन्स्टाईनबद्दल ते सांगतात, 'आईनस्टाईनचं जुनं स्वेटर, पायमोजे न घातलेले त्याचे ते स्लीपर्स अशा स्थितीत तो केंब्रिजमध्ये (मॅसाच्युसेटस्) सेनेट हाऊसला लेक्चर देत असे. ' आणि आईन्स्टाईनच्या कार्याबद्दल ते म्हणतात, 'उभ्या हयातीत आईन्स्टाईननं प्रकाशाचा वेळेशी, वेळेचा अवकाशाशी, energy चा matter शी, matter चा space शी, व space चा गुरुत्वाकर्षणाशी संबंध लावला.'

ब्रॉनोव्हस्कीने ही प्रणाली प्रथम पूर्व आफ्रिकेत सुरू केली. त्यावेळेला त्यांच्या टीममधला एक फोटोग्राफर व Sound recordist हे दोघे एका हलक्या विमानातून उड्डाण करीत असताना विमान कोसळले. सुदैवाने वरील दोघे बचावले. या दुश्चिन्हांचा ब्रॉनोव्हस्कीवर बराच परिणाम झाला. परंतु कॅमेरामन दोन दिवसांनी दुसऱ्या


**Some New Titles Received**

| | | |
|---|---|---|
| (1) | **The Ascent Of Man** (Bestseller– Nonfiction– Man's achievement from earliest days to the present period.) – J. Bronowski | Rs. 90/00 |
| (2) | **90 Minutes At Entebbe** – William Stevenson | Rs. 18/90 |
| (3) | **The Ultra Secret** – F. W. Winterbotham | Rs. 16/95 |
| (4) | **Laing And Anti – Psychiatry** – Editors : Robert Boyers & Robert Orrill | Rs. 8/00 |
| (5) | **Face Language** – Robert J. Whiteside | Rs. 14/55 |
| (6) | **Dolores** – Jacqueliene Susann | Rs. 10/00 |
| (7) | **The Deep** – Peter Benchiley | Rs. 12/00 |
| (8) | **Nightwork** – Irwin Shaw | Rs. 18/90 |

- नॉन–मेंबर्सकरिता डेलिबेंसीसवर पुस्तके वाचावयास मिळतात.
- दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून सभासद होता येते.
- आपल्या पुस्तकांना उत्तम प्लॅस्टिक कव्हर्स घालून देतो.
- खास फॅक्टरीतील लोकांसाठी लायब्ररी दर बुधवारी बंद राहील.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०**

विमानात उड्डाण करायला तयार झाला. 'मी माझ्या कामाला कमीटेड राहीन—मला थोडीशी भीती वाटते तरी सुद्धा!' मानवजात अशीच पुढे चढत राहील (थरथरत्या मनाने का होईना), असे शेवटी ब्रॉनोव्हस्की म्हणतो. मानवजातीवरचा व स्वतःवरचा एवढा बुलंद आत्मविश्वास खचितच कौतुकास्पद आहे.

आत्मविश्वास व न्यूनगंड, आशावाद व निराशावाद, हे प्रत्येकाच्या भोवतालच्या परिस्थितीनुसार eugenic प्रश्न बनू शकतात. एक Subjcctive अनुभव होऊ शकतो. परंतु आपल्या मनातली सर्व कवाडे उघडी ठेवून सध्याच्या परिस्थितीकडे पाहिले की, मनुष्य एवढा धडपडत वर चढण्याचा प्रयत्न करतो तो कशासाठी? हा प्रश्न मनात आल्याशिवाय राहात नाही. तो निव्वळ GNP (Gross National Product) म्हणजेच per capital income चा प्रकार वाढवण्यासाठी प्रयत्न करतो हे उघड आहे. हा GNP वाढविण्यासाठी तो जंगले तोडील, वन्यपशुजीवनाचा ऱ्हास करील, पंचनहाभूतात प्रदूषणे भरून टाकेल, एक ना दोन! 'चुका सुधारण्यासाठी अजून भरपूर वेळ आहे!' असेच त्याला सारखे वाटत असले पाहिजे. पण Frankenstein च्या गोष्टीपासून आपण काही धडा शिकलो आहोत, असे काही वाटत नाही.

या पुस्तकात हिरोशिमा शहर अणुयुद्धानंतर कसे उद्ध्वस्त झाले आहे ते दाखवले आहे. अलीकडे जगात वीजनिर्मितीसाठी अणुभट्टयाही वाढत आहेत. त्यासाठी प्लुटोनियमची ने–आण बऱ्याच प्रमाणात करावी लागते. रस्त्यावरनं हे अणुभट्टयांकडे जाणारे प्लुटोनियम सहज कुणी हायजॅक करू शकेल व थोडयाशा अनुभवी शास्त्रीय पदवीधर माणसाला त्या प्लुटोनियमपासून छोटासा अणुबाँब करायला फारसा वेळ लागणार नाही. थोडया दिवसांपूर्वी अशीही एक बातमी आली होती की, दीड लाख रु. व थोडे प्लुटोनियम असले की, कोणालाही छोटा अणुबाँब तयार करता येईल. आणि नंतर दहशतवाद कसा थैमान घालील ते बघा. देशाच्या अंतर्गत मागण्यांसाठी त्याचा उपयोग केला जाईल. अविकसित देशात लोकसंख्येच्या वाढीमुळे म्हणा किंवा बदलत्या हवामानामुळे म्हणा, धान्याचा अती तुटवडा निर्माण झाला तर ही छोटी छोटी राष्ट्रे विकसनशील देशाला धान्य मागणीने (अणुबाँबची भीती दाखवून) बेजार करून सोडतील, अशीही शक्यता एका वर्तमानपत्रात आली होती. उलट दुसरी शक्यता मला वाटते ती ही की, विकसनशील देशातील शहरे थोडयाच वर्षांत महासाथींची (Pandemis) उगमस्थाने बनतील व ते थांबविण्यासाठी पाश्चात्य देश अण्वस्त्राचा उपयोग करील. आणि नंतर Ascent of man चा Descent of man व्हायला वेळ लागणार नाही! हे व इतर अनेक प्रश्न जे माणसाला भेडसावत आहेत त्याचे विवेचन या पुस्तकात केले असते तर पुस्तक आणखीनच वाचनीय झाले असते. कारण असे की, केवळ संपादन केलेल्या यशावरच जास्त भर दिला तर त्याने कैफ चढण्याची व वंचना होण्याची शक्यता असते.

भारतातील एका नामांकित वृत्तपत्रात एम्. व्ही. मेथ्यूनी या पुस्तकाचे इतके गुण गाइले होते की, ते वाचूनच हे पुस्तक मी घेतले. या परीक्षणात टीका जवळजवळ नाहीच. मी मागेच म्हटले आहे की, पुस्तक उत्कृष्ट आहेच, पण मेथ्यूचे परीक्षण वाचून ते कुणी देवांनी लिहिले आहे, असा भास होतो. तेवढे परिपूर्ण मला ते आढळले नाही.

जे. एन्. पोंडा,
फिनिक्स लायब्ररी


प्रसिद्ध झाले!




लेखक : पु. ल. इनामदार

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

## जेसी, तू निर्दोष आहेस.......पण हे खरे ठरण्यास मात्र पन्नास वर्षे लागली !

# जेसी जोन्स

प. बा. सामंत

पॅसिफिक व अटलांटिक महासागरांना जोडणारा अमेरिकेतील ४००० मैलांच्या रेल्वेमार्गाचा अलीकडे कुणी फारसा वापर करीत नाही. जेट विमानाने सहा तासांत पार पडणाऱ्या या प्रवासासाठी रेल्वेने तीन दिवस घालविण्याचा उपद्व्याप कोण करणार? परंतु एक प्रवासी म्हणून आणि जवळचे पैसे संपुष्टात आले म्हणून मी तो प्रवास केला. रेल्वेने न्यूयॉर्क सेंट्रल गाठून तिथून बोटीने अल्पशा खर्चात युरोपला पोहोचण्याचा माझा मानस होता.

रेल्वेचा हा तीन दिवसांचा प्रवास तसा स्वास्थ्याचा, विविधतेमुळे नटलेल्या सृष्टिसौंदर्याची पाहता पाहता भूक भागविणारा होता. गाडी गतिमान, एअरकंडिशन्ड डबे, इतक्या दीर्घ पल्ल्याच्या प्रवासासाठी मुद्दाम केलेल्या सुखसोयी यांमुळे मी तृप्त झालो होतो. जवळचे पैसे संपुष्टात आले होते, ही एका अर्थाने मला इष्टापत्ती वाटली. संथपणे अमेरिकेच्या भूमीचे विविध प्रकारांनी दर्शन झाले.

होक्स व्हीले या छोटयाशा स्टेशनपासून स्टेशनवरून एक्सप्रेस पुढे निघाली आणि स्टेशनपासून थोडयाच अंतरावर थांबली. एक्सप्रेसच्या इंजिनीअरने (ड्रायव्हरने) डिझेल इंजिनच्या तीन कर्कश शिट्या मारल्या आणि गाडी संथपणे पुन्हा सुरू झाली. मी पाहिले, डिझेल इंजिन उभे होते तिथे एक छोटे स्मारक होते. त्यावर खालील मजकूर कोरलेला होता :

'जेसी जोन्स, ग्रीन व्हीले गावचा रहिवासी हा एक उत्कृष्ट असा रेल्वे इंजिनीअर होता. अमेरिकेच्या अध्यक्षांना अपघातामधून वाचविण्यासाठी कौशल्याची पराकाष्ठा करता करता या ठिकाणी दिनांक २४ एप्रिल १९१४ रोजी तो मृत्युमुखी पडला. त्याचे इंजिन चालविण्याचे प्रेम व कौशल्य असामान्य होते. आमच्या पुढील पिढयांना तो नक्कीच मार्गदर्शक ठरेल.'

शेवटी हे स्मारक २४ एप्रिल १९६४ रोजी म्हणजे त्याच्या मृत्यूनंतर ५० वर्षांनी केल्याचा उल्लेख केला होता.

जेसी जोन्स कोण होता कुणास ठाऊक, पण त्या स्मारकाने जेसीबद्दल मनात थोडे कुतूहल निर्माण केले, एवढे मात्र नक्की ! 'अशा माणसाचं स्मारक होण्यास पन्नास वर्षे का लागली?' हा प्रश्न माझ्या मनात घोटाळू लागला. एक्सप्रेसने गती पकडली. निळ्या काचेतून बाहेरचे सृष्टिसौंदर्य सारखे बदलू लागले, पण तो प्रश्न माझा पिच्छा सोडीना. शेवटी मी डब्यातील तरुण निग्रो कंडक्टरला जेसीबद्दल विचारले. त्याला काहीच माहिती नव्हती.

'प्रत्येक गाडीचा इंजिनीअर या ठिकाणी गाडी उभी करतो. तीन शिट्यांनी मानवंदना देतो आणि मगच गाडी सुरू करतो. जेसी जोन्स ग्रीन व्हीले गावचा होता. आता एक तासाने ते गाव येईल. तिथला कुणी जाणकार तुम्हाला हवी ती माहिती देऊ शकेल.' त्या तरुण कंडक्टरने सांगितले. एवढ्या माहितीने माझे कुतूहल पुरेसे जागृत झाले. ग्रीन व्हीले स्टेशनवर उतरून जेसीची माहिती मिळवायची, असे मी ठरवून टाकले.

तासाभराने ग्रीन व्हीले आले. स्टेशनपासून मैलभर अंतरावर असलेली मूठभर छोटी छोटी बैठी घरे आणि त्यांच्या पलीकडे उठावदारपणे उभे असलेले चर्च पाहिल्यावर हेच ग्रीन व्हीले असावे, असे मला वाटले आणि गाडी थांबल्यावर खात्रीच पटली. त्या छोटयाशा स्टेशनवर उतरणारा मी एकमेव उतारू होतो.

'गुड मॉर्निंग, वेलकम टू ग्रीन व्हीले.' स्टेशनमास्तरने माझे सुहास्य स्वागत केले.

'आपले तिकीट तर सरळ न्यूयॉर्क सेंट्रलचे आहे. इथे कुणाला भेटणार आहात काय? मी आपणास काही मदत करू शकतो का?' त्याने आर्जवाने विचारले.

'मला जेसी जोन्सची माहिती हवीय. तो या गावचा होता, एवढे मला समजले. त्याची कुणी मला माहिती देईल काय?'

'ओ ! जेसी जोन्स ! तो एक फार मोठा इंजिनीअर होऊन गेला. मी त्या वेळी जन्मलोही नव्हतो. या पन्नास-साठ वर्षांत हा छोटा गावही पार बदलून गेला आहे. त्या वेळचे कुणीही आता या गावात नाही. दहा वर्षांपूर्वी होक्स व्हीलेजवळ ते स्मारक केले, त्या वेळी इथे चर्चमध्ये सत्कारासाठी एक गावकऱ्यांची सभा झाली होती. त्या वेळी कुणी एक वृद्ध गृहस्थ जेसी जोन्सची माहिती सांगत होता. मी इथला नवाच आहे. आपण गावात जा. स्कूल टीचर नाही तर प्रीस्टला भेटा. ते तुम्हाला जरूर ती मदत करू शकतील. मी तुम्हाला सोबतीला कुणी तरी देतो.' असे म्हणून त्याने एका रेल्वेकर्मचाऱ्याला माझ्याबरोबर दिला.

आम्ही त्या छोटया गावात शिरेपर्यंत आमच्या आगमनाची आणि चौकशीची वर्दी स्टेशनमास्तरने फोनवरून कळविली होती. स्कूल टीचर आणि प्रीस्टही तिथे नवेच होते. दहा वर्षांपूर्वी चर्चमध्ये झालेल्या सभेत कुणी जॉर्जी म्हणून वृद्ध गृहस्थ बोलला होता असे समजले, पण तो गावात राहणारा नव्हता, मुद्दाम बाहेरून आला होता असे कळले. त्याचा ठावठिकाणा तसा कुणालाच माहीत नव्हता. मी निराश झालो. पण एका परक्या प्रवाशाचे एका फार जुन्या तशा अज्ञात रहिवाशाबद्दलचे कुतूहल गावकऱ्यांना स्वस्थ बसू देईना. जिकडे तिकडे फोनाफोनी चौकशी झाली आणि शेवटी जॉर्जीचा पत्ता तिथून पंधरा मैलांवर असलेल्या एका रँचवर (शेतावर-मोठ्या शेतावर) लागला. गावकऱ्यांनी दिलेल्या मोटारीतून मी

जॉर्जीच्या शोधात रँचवर निघालो. रेल्वेने प्रवास करावयाचे ठरविल्याबद्दल आता मला खरेखुरे समाधान मिळाले.

'जॉर्जी आजोबा, तुम्हाला भेटावयास कुणी अंकल आले आहेत,' या आरोळीने माझ्या आगमनाची वर्दी जॉर्जी आजोबांना मिळाली. पंचाऐंशी वर्षांचा जॉर्जी काठी टेकीत टेकीत व्हरांड्यात माझ्या स्वागतासाठी आला. 'वेलकम जंटलमन, आय अॅम रिअली व्हेरी ग्लॅड टू मीट अ पर्सन इन्क्वायरिंग अबाऊट जेसी जोन्स.' त्याने माझा हात घट्ट धरून शेकहॅण्ड केला.

दुपारच्या मस्त जेवणानंतर आम्ही व्हरांड्यात आरामात बसलो आणि मग जॉर्जीने सुरुवात केली.

'मी अगदी लहान होतो, तेव्हा म्हणजे ९० वर्षांपूर्वी ग्रीन व्हीले पाच-दहा घरट्यांचे खेडे होते. केवळ चर्चमुळे त्याचे महत्त्व! आजूबाजूच्या परिसरातील सर्व मंडळी रविवारी नियमितपणे चर्चमध्ये जमायची. प्रार्थनेनंतर गाठीभेटी, गप्पागोष्टी होत असायच्या. तेवढेच एकत्र येण्याचे चर्च हे एक साधन होते. तेव्हा विमाने नव्हती, मोटारी नव्हत्या, वीज, टेलिफोन्स नव्हते. अमेरिकेच्या दोन्ही किनाऱ्यांना जोडणारे, देशभर त्वरित कमीत कमी खर्चात फिरण्याचे एकमेव साधन रेल्वेमार्ग हे होते. अमेरिकेच्या आर्थिक, सामाजिक हालचाली बऱ्याचशा रेल्वेवर विसंबून होत्या. त्या काळी रेल्वेकंपन्या अर्थव्यवस्थेत फार महत्त्वाच्या स्थानी होत्या. महत्त्वाकांक्षी माणसे अमेरिकेचा अध्यक्ष होण्याऐवजी रेल्वेकंपनीचा अध्यक्ष होण्याची स्वप्ने पाहत, तर सामान्य धडधाकट तरुण मनुष्य तुफान गतीने धावणाऱ्या वाफेच्या इंजिन्सवरील इंजिनीअर्स होण्याची स्वप्ने पाहत.'

'ग्रीन व्हीले गावात असाच एक जेसी जोन्स नावाचा गुराखी तरुण रेल्वे इंजिनीयर होण्याचे स्वप्न मनात बाळगून होता. ग्रीन व्हीले हे फ्लॅग स्टेशन होते. दिवसातून दोन गाड्या जायच्या-यायच्या, त्यापैकी एक ग्रीन व्हीले स्टेशनवर थांबायची. गाडी येण्याच्या वेळेअगोदर एक तासभर स्टेशनवर जमणे हा गावकऱ्यांचा आवडीचा उद्योग होता, तर गुराखी मुले रेल्वेमार्गाजवळील शेतामध्ये उभे राहून अधाशासारखी त्या दोन गाड्यांची ये-जा पाहात असत. धूर ओकणारी किंचाळणारी इंजिन्स, रंगीबेरंगी मोठे डबे आणि घोड्यापेक्षा जलद असणारी गाडीची तुफानी गती न्याहाळणे हा त्यांचा उद्योग होता.'

'सोळा वर्षांचा जेसी, इतक्या लहान वयातच सहा फूट उंच वाढला होता. तगडा झाला होता. दिवसभर गुरे वळण्याचे काम करी. घोड्यावरून रपेट मारी. या कामी त्याचा हात धरणारा कुणी नव्हता. पण त्याचे मन धडाडत जाणाऱ्या वाफेच्या इंजिनवर खिळले होते. अनेक वर्षे गाड्यांच्या जाण्या-येण्याच्या वेळी शेतात उभे राहण्याचा त्यांचा उपक्रम होता. इतर गुराखी मित्रांबरोबर तो रेल्वे इंजिनीअर होण्याच्या गोष्टी करत असे. मनाने बसविलेले रेल्वेचे आडाखे तो मित्रांना सांगत असे. मनाचे खेळ असे वर्षानुवर्षे चालू होते. पण रेल्वे कंपनीचे ऑफिस एक हजार मैलांवर असलेल्या न्यूयॉर्कमध्ये होते. या खेडवळ जेसीला तिथे जाण्याला काही साधन नव्हते की रेल्वेत नोकरी देण्यास कुणी ओळखीचे-नात्याचे नव्हते. तगडा जेसी शेवटी गुराखीच राहिला. आणि शेवटी गुराख्यांच्या आणि गावकऱ्यांच्या हास्याचा आणि नंतर थट्टेचा विषय झाला.'

'एके दिवशी जेसी गावातून नाहीसा झाला. त्याचे नाहीसे होणे एक महिना गावच्या चर्चेचा विषय झाला. आणि मग गाव जेसीला विसरला. रेल्वेच्या बाजूच्या शेतात अजूनही गुराखी मुले जमत होती. जाणाऱ्या-येणाऱ्या गाड्या पाहत होती, इंजिनच्या शिटीत आपल्या शिट्यांचे आवाज मिळवीत होती, हात वर करून अनोळखी इंजिनीअर्स, पॅसेंजर्स, गार्ड्स, यांना निरोप देत होती. खेळ चालूच होता.'

'पाच-सहा वर्षांनी गुराखी मुले गावात सांगू लागली, की जेसीला त्यांनी रेल्वे इंजिनमध्ये पाहिला. त्याने हात वर करून रुमाल फडफडावून, एकदा तर शिटी वाजवून त्यांचे लक्ष वेधले होते. पण गुराख्यांच्या सांगण्यावर गावकऱ्यांनी-प्रीस्टनेसुद्धा विश्वास ठेवला नाही.'

'पण एक दिवस फायरमनच्या निळ्या कपड्यात, एका हातात अवजड ओव्हरकोट आणि दुसऱ्या हातात रेल्वेचा खास कंदील घेऊन ताडमाड जेसी ग्रीन व्हीले स्टेशनवर खराखुराच उतरला.'

'तो रविवार होता. जेसी घरी आई, वडील आणि भावंडांना भेटला. मित्रमंडळी, गुराखी जमा झाले. गर्दीचा लोट चर्चकडे वळला. सारा गाव चर्चमध्ये प्रार्थनेला जमला. नंतर जेसीची कहाणी ऐकायला आणि कौतुक करायला थांबला. सर्वांना तो रविवार एक वेगळा रविवार वाटला.'

'काही वर्षांपूर्वी जेसी घरून जो पळाला तो विनातिकिट प्रवास करून मजल दरमजल करीत न्यूयॉर्कला पोहोचला. काही दिवसांनी त्याला तिथे रेल्वे शेडमध्ये झाडूवाल्याचे काम मिळाले. मन लावून ते काम करता करता इंजिन्स धुण्याच्या कामावर तो चढला. तिथून तेलपाणी करीत करीत तो प्रथम मालगाडीवर फायरमन आणि नंतर मेल गाडीवर फायरमन झाला. इंजिनमध्ये कोळसे मारता मारता इंजिनीअरच्या कामावर त्याची नजर होती. तेही काम तो हळूहळू शिकला. त्या कामातही तो तरबेज झाला. त्याच्यावर विसंबून इंजिनीअर्स इंजिन्समध्ये विश्रांती घेऊ लागले. आता लौकरच तो परीक्षा देऊन खराखुरा इंजिनीअर होणार होता.'

'ग्रीन व्हीलेमधील गरीब गांवढळ शेतकऱ्यांना त्याची कहाणी चित्तथरारक वाटली. गुराख्यांचा तर तो हीरो बनला, त्याच्यापेक्षा बराच लहान असलेल्या जॉर्जीनेही त्याचे कौतुक केले. सर्वांना तो हवाहवासा झाला. अमेरिकेतील उभ्या-आडव्या सफरीमधील गंमती सांगता सांगता जेसीची सुटी संपूनही गेली.

थोड्याच वर्षांनी जेसी इंजिनीअर झाला. इंजिनीअरची रुबाबदार कॅप, कातडी हातमोजे आणि युनिफॉर्म यांनी तो फार रुबाबदार दिसे. त्याचे इंजिन हाकण्याचे कौशल्यही असामान्य होते. त्या दीडहजार अश्वशक्तीच्या वाफेच्या प्रचंड इंजिन्समधील गुणदोषाची झटकन पारख करून तो त्यांना तुफान गतीने दौडवीत असे. चार-पाचशे मैल प्रवासाच्या ड्युटीत त्याची गाडी क्वचितच उशीरा मुक्कामावर पोहोचायची.

मग त्याने गावातील अनेक तरुणांना हळूहळू रेल्वे कंपनीत घेतले. चर्च, शाळा यांना वेळोवेळी मदत पाठविली. घर सुधारले. पण स्वतः मात्र साधासुधाच राहिला. त्याच्या लग्नाच्या वेळी पंचक्रोशीतील गावे ग्रीन व्हीलेच्या चर्चमध्ये लोटली होती. आता तो ग्रीन व्हीलेमध्ये जरी राहात नसला तरी अधूनमधून तिथे येत होता. जेसीच्या

संबंधामुळे गावकऱ्यांना असे वाटे की, सारी रेल्वे जणू काही जेसीच्या-नेच चालते.

त्याच्या गाडी चालविण्यातील नियमितपणामुळे त्याला लौकरच बढती मिळाली. देशातील उत्कृष्ट इंजिनीअर म्हणून सुवर्णपदक मिळून गौरव झाला. मोठचा रेल्वेकंपन्यांकडून मोठचा पगाराच्या ऑफर्स आल्या, पण जेसीने मूळ कंपनी सोडली नाही. कंपनीशी त्याने कृतज्ञता ठेवली.

पुढे त्याच्या कंपनीने 'सिल्वर अँरो' आणि 'बुलेट' नावाची तुफानी गतीने धावणारी–ताशी १०० मैल वेगाने धावणारी–इंजिन्स आणली. जेसी खूष झाला. त्याने इंजिनसवर बसविण्यासाठी स्वतःची विशिष्ट आवाजाची शिटी करून घेतली. ज्या इंजिनवर तो जाई तिथे तो कंपनीची शिटी काढून स्वतःची शिटी बसवी, आणि चार्ज सोडताना ती काढून घेई.

जेसीच्या त्या शिटीचा आवाज आसमंतात भेदून जाणारा पण फार करुण असा होता. सर्व स्टेशन्सवर तो परिचित झाला होता. जेसीच्या शिटीवरून रेल्वे नोकर, स्टेशन स्टाफ आणि ग्रीन व्हीलेमधील माणसे जेसीची गाडी येण्याअगोदरच त्याची गाडी ओळखीत असत. रेल्वे लाईनच्या बाजूला असलेल्या शेतातील माळरानांवरील गुराख्यांचा तर शिटी ऐकून रेल्वेलाईनकडे धावत यायचा छंद होता. शेतात काम करणारी मोठी माणसेही तो आवाज ऐकल्यावर क्षणभर कामे थांबवून गाडीच्या येण्याची वाट पाहायची. 'जेसीची गाडी–जेसीची गाडी–' नकळत त्यांचे तोंडून शब्द बाहेर पडायचे.

एकदा तब्बल सोळा तासांची अप आणि डाऊन गाड्यांची डबल ड्युटी करून थकून जेसी जंक्शनवर पोहोचला. आता रिटायरिंग रूममध्ये जाऊन झोपण्याचा–विश्रांती घेण्याचा त्याचा विचार होता. एवढचात डिव्हिजनल सुपरिंटेंडंट त्याच्याजवळ आला.

'जेसी, तू दमला आहेस हे खरे, पण आता अमेरिकेच्या प्रेसिडेंटची स्पेशल डाऊन लाईनवरून जायची आहे. तिला चार तास लेट झाला आहे. इथे तिला 'बुलेट नं. १' जोडावयाचे आहे. परंतु त्याच्यावरचा इंजिनीअर मार्टिन हा एकाएकी आजारी पडला आहे. आता तूच ती गाडी ने. वेळ भरून काढावयाचा आहे. तुझ्याशिवाय दुसरा कोण एवढी जोखीम घेणारा ? तू आराम कर. 'स्पेशल'ला इंजिन जोडले की मी तुला उठवितो.

जेसी कितीवेळ झोपला होता कुणास ठाऊक ? जेव्हा त्याला उठवले तेव्हा त्याला 'आपण थकलेले आहोत, नाराज आहोत' असे वाटले. त्याने खळखळून तोंड धुतले. नवा युनिफॉर्म चढविला. 'प्रेसिडेंट स्पेशल' हाणायची या कल्पनेने तो सुखावला. चार तासांचा लेट काढून गाडी वेळेवर न्यायची म्हणजे काय सामान्य काम आहे ? कधी नव्हे ती संधी समोर येऊन उभी राहिली होती. आपण फार थोडी विश्रांती घेतली आहे, हेही तो विसरला.

प्रेसिडेंटना अभिवादन करून तो 'बुलेट नं. १' वर चढला. आपली शिटी त्याने इंजिनवर बसविली. सिग्नल मिळाल्यावर त्याने 'थ्रॉटल' उघडला. पहिल्या दहा-पंधरा मैलांतच त्याने इंजिनची तपासणी केली. खात्री झाल्यावर त्याने 'थ्रॉटल फूल' केला. बुलेट नं. १ धडाडू लागले. प्रेसिडेंट स्पेशलने गती पकडली. थोडचाच वेळात स्पीडोमीटरचा काटा १०० मैलांवर गेला. प्रेसिडेंट स्पेशल-साठी डाऊन लाईन थेटपर्यंत मोकळी केलेली होती. होक्स व्हीलेला एक मालगाडी सायडिंगवर थांबवून धरली होती. ही सर्व माहिती जेसीला अगोदरच मिळाली होती. अडीचशे मैलांवरच्या जंक्शनवर कोळसा, पाणी, तेल घेऊन थेट मुक्कामावर पोहोचायचे असे त्याने मनाशी ठरविले. या गाडीच्या गतीने शेवटपर्यंत गेलो तर चार तासांचा खोळंबा भरून निघेल अशी त्याची खात्री होती. त्यामुळे तो निश्चित झाला. बुलेट नं. १ च्या तुफानी धडाडण्यात त्याने स्वतःला मिसळून टाकले.

वाटेतल्या सर्व लहान-मोठचा स्टेशन्सवर प्रेसिडेंटच्या स्पेशल गाडीची माहिती होती. चार तास लेट झाल्यामुळे उगीचच सर्वत्र एक प्रकारची हुरहुर वाटत होती. थोडे कुतूहलही वाटत होते. इंजिनवरचा फायरमन शिटी वाजवून आगमनाची खबर देत होता.

'ओ! जेसीचे इंजिन! मग लेट भरून निघणार,' असे प्रत्येकजण दुसऱ्यास सांगत होता. स्वतः स्टेशनमास्तर्स हिरवे झेंडे दाखविण्या-साठी स्टेशना-स्टेशनांवर जातीने उभे होते. सर्व स्टेशन स्टाफ, आजू-बाजूचे बघे यांची सर्व स्टेशन्सवर गर्दी जमली होती. बुलेट नं. १ धडाडत जाताना पाहून आणि त्याची शिटी ऐकून आपोआप त्यांचे हात 'बाय बाय' करण्यासाठी उंचावत होते.

### जेसीने प्रेसिडेंट स्पेशल नेली....

ग्रीन व्हीलेच्या अलीकडे तीन मैलांवरून जेसीने स्वतःच शिटी वाजविण्यास सुरुवात केली. प्रेसिडेंटची गाडी जेसी नेतोय हे गावात आई, वडिलांना, मित्रांना, गावकऱ्यांना कळावे अशी इच्छा त्याच्या मनात नकळत उमटली. शिटीचा आवाज ऐकून ग्रीन व्हीले गाव हादरला. कारण अगोदर सोळा तासांत दोन वेळा त्यांनी शिटी ऐकली होती आणि लगेच तीन एक तासांनी पुन्हा शिटी ऐकू आली म्हणजे काय ? गावकरी हातातील कामे सोडून बाहेर आले. प्रथम जेसीच्या घरी आणि नंतर चर्चमध्ये मंडळी जमली. आणि त्यांना गुराखी मुले येऊन मिळाली. जेसीने आज एक पांढरी शुभ्र गाडी तुफान गतीने नेल्याची बातमी त्यांनी सांगितली. एवढी फास्ट गाडी त्यांनी कधीच पाहिली नव्हती. लोकांचे आश्चर्य वाढले. गप्पा सुरू झाल्या. तेवढचात स्टेशनवरचे लोक आले. त्यांनी जेसीने 'प्रेसिडेंड स्पेशल' नेली म्हणून सांगितले. लोकांना दिवसभर कौतुकाचा विषय मिळाला.

संध्याकाळी स्टेशनवरून बातमी आली की, होक्स व्हीले या स्टेशन-जवळ प्रेसिडेंट स्पेशल मालगाडीवर आदळून मोठा अपघात झाला. फायरमन ग्रेगरी वाचला, पण जेसी मात्र ठार झाला. बाकी कुणी दगावले नाही. घसरलेले इंजिन बाजूला काढून प्रेसिडेंट स्पेशल पुढे जाण्यास आणखी बारा तास उशीर झाला. कॅलिफोर्नियामधील प्रेसिडेंटचे काही महत्त्वाचे कार्यक्रम बिघडले. अपघाताची सरकारने चौकशी सुरू केली.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ग्रीन व्हीलेमधील चर्चच्या मागील स्मशानात जेसीच्या छिन्नभिन्न झालेल्या प्रेताची कॉफीन पुरली. ती तारीख २५ एप्रिल १९१४ होती. प्रार्थना संपवताना प्रीस्ट म्हणाला, 'जोझस, जेसीला दोषी ठरवू नकोस. तो निर्दोष आहे.'

परंतु सरकारी चौकशीत जेसी जोन्स दोषी ठरला. नियमांचे पालन न करता त्याने बेफामपणे गाडी चालविली, त्यामुळे हा अप-

घात झाला, असे चौकशीत ठरले. रेल्वे कंपनी आणि बाकीचे संबंधित अधिकारी निर्दोष ठरले.

ग्रीन व्हीले गाव फार हळहळले. बरेच दिवस गावावर उदासीनतेची छाया पसरली होती. पण कालप्रवाह सुरू होता. दिवस गेले, वर्षे गेली. जेसीच्या साहसाची दंतकथा मात्र उरली. रेल्वे लाईनच्या बाजूला गुरे चारणाऱ्यांच्या जिभेवरून ती वर्षानुवर्षे चालू राहिली. कालांतराने तीही विरून गेली. जेसीचा परिवार गाव सोडून गेला. जाताना त्याने जेसीचे सुवर्णपदक चर्चला भेट दिले. तिथे ते एका बंदिस्त काचेच्या पेटीत जेसीची साहसकथा कुतूहल असेल त्यांना मूकपणे सांगत होते.

जॉर्जी हा जेसीपेक्षा लहान, पण त्याचा गुराखी जिवलग मित्र. लहानपणापासून दोघेही रेल्वे लाईनच्या बाजूला गुरे चारायचे—गाड्या पाहावयाचे आणि हितगूज करायचे. पुढे जेसी नाहीसा झाला, जॉर्जी गुरे हाकीतच राहिला. जेसीच्या प्रगतीबद्दल जॉर्जीला अभिमान वाटत असे. जेसीला अखेरची माती घालता घालता जॉर्जी मनातल्या मनात पुटपुटला होता, 'जेसी, हे असे कसे झाले ? तुझ्या हातून हे कसे घडले ?'

## जेसीच्या नावे प्रार्थना करा

पुढे दोन वर्षे गुराख्यांना—गावकऱ्यांना जेसी निर्दोष असल्याचे तो सांगत होता.

'ग्रेगरी फायरमन वाचला, मग जेसी का नाही वाचला?' त्याच्या प्रश्नाला कुणाकडेच उत्तर नव्हते. पुढे पुढे सारेजण जेसीला विसरले. जॉर्जीने ग्रेगरी फायरमनला शोधण्याचा प्रयत्न केला. पण त्याने दुसऱ्या एका रेल्वे कंपनीत, फार दूर, दुसरी नोकरी धरली होती. जॉर्जीच्या पत्रांना त्याने उत्तरेही पाठविली नाहीत. अशी अनेक वर्षे गेली, दशके गेली. जॉर्जीही म्हातारा झाला. जवळजवळ एकटाच उरला होता.

एक दिवस ग्रीन व्हीलेच्या चर्चमध्ये एक पत्र आले की, 'जेसी जोन्सच्या नावे प्रार्थना करा. ग्रेगरी.' सोबत शंभर डॉलर्सचा चेक होता.

त्या पत्राचा गावात कुणालाच उलगडा झाला नाही. पत्राची बातमी कर्णोपकर्णी सर्वत्र फैलावली. जॉर्जीच्या कानावर आली. तो ग्रीन व्हिलेच्या चर्चमध्ये आला. त्याने ते पत्र पाहिले. ग्रेगरीचा पत्ता घेतला आणि फार दूर राहाणाऱ्या ग्रेगरीला त्याने हुडकून काढले. ग्रेगरीने जेसीचा निर्दोषीपणा कबूल केला. त्याला आता इतक्या उशीरा का होईना—पश्चाताप होत होता. रेल्वे कंपनीने त्याला खूप पैसे देऊन आणि दुसरीकडे चांगली नोकरी देण्याचे प्रलोभन दाखवून खोटी साक्ष द्यावयास लावले होते. सर्व दोष जेसीवर ढकलला होता.

ग्रेगरीने तसा जबाब शपथेवर लिहून दिला. चाळीस वर्षांपूर्वी घडलेल्या अपघाताबद्दलचा एक जबाब खिशात घालून जॉर्जी परत आला. त्याने इंजिनीअर्स असोसिएशनला पत्र लिहिले. एव्हाना वाफेची इंजिन्स जाऊन त्याचे जागी डिझेल इंजिन्स आली होती. या नव्या तऱ्हेच्या इंजिनीअर्सना चाळीस वर्षांच्या अगोदरच्या अपघाताच्या चौकशीची काय चिंता ? त्यांच्याकडे काही होत नाही हे पाहिल्यावर जॉर्जी स्थानिक सिनेटरकडे वळला. त्यालाही हे चाळीस वर्षांपूर्वीचे चौकशीचे मढे पुन्हा उकरून काढण्यात काही गम्य वाटले नाही. अनेक धक्के मारल्यावर त्याने जॉर्जीच्या म्हणण्याला नकार दिला. जॉर्जी अनेक वकिलांना, सार्वजनिक संस्थांना, त्यांच्या चालकांना भेटला. पण कुणीही त्याला मदत करण्याचे आश्वासन दिले नाही. सरकारला हलविण्यासारखे महत्त्वाचे या प्रकरणात काही आहे असे त्यांना वाटले नाही. शेवटी जॉर्जीने वृत्तपत्रांत पत्रे लिहून वाफेची इंजिन्स चालविणारे जुने वृद्ध इंजिनीअर्स कुठे असतील अशांना आवाहन केले. त्याला मात्र काही वृद्धांकडून, वॉशिंग्टनमधील एक दोन सार्वजनिक संस्थांकडून आणि रेल्वेशी काहीना काही संबंध आलेल्या एका सिनेटरकडून प्रतिसाद मिळाला.

सिनेटर आणि त्या दोन सार्वजनिक संस्थांनी जॉर्जीजवळची माहिती तपासून घेतली. जेसीचे सुवर्णपदक पाहिले. अपघातात इंजिन रुळावरून घसरले, पण 'प्रेसिडेन्ट स्पेशल'चे बाराही डबे काहीही न होता रुळावर कसे राहिले याचा उलगडा त्यांनाही झाला नाही. जॉर्जीजवळची वृत्तपत्रांतील जुनी कात्रणे, इतर पत्रे वगैरे पाहून या प्रकरणी फेरचौकशीची आवश्यकता आहे, याबद्दल त्यांची खात्री झाली. वृत्तपत्रांत काही लेख लिहून, जॉर्जीच्या मुलाखती छापून त्यांनी हे चाळीस वर्षांपूर्वीचे अपघाताचे प्रकरण पुन्हा उजेडात आणले.

नंतर सिनेटरने प्रेसिडेंटकडे फेरचौकशीची मागणी केली. सिनेटमध्ये चौकशीच्या ठरावाची नोटीस दिली. आणि शेवटी मागणी मंजूर होऊन फेरचौकशी झाली. या साऱ्या प्रकरणात दहा वर्षे गेली. १९६४ मध्ये चौकशी समितीने मृत जेसी जोन्सला निर्दोष ठरविले.

अपघाताच्या वेळी झाले असे की, होक्स व्हीलेच्या सायडिंग लाईनपेक्षा मालगाडीची लांबी अधिक होती. तेव्हा मालगाडीचे काही डबे जेसी जोन्सला त्याच्या स्पेशलच्या लाईनवर आले होते. स्पेशल गाडी उभी करून मालगाडी पुढे-मागे करून स्पेशल गाडीला वाट करून देण्याचे स्टेशनमास्तरने ठरविले होते. ट्रॉलीवरून तीन मैल अलीकडे येऊन त्याने जेसीच्या लाईनवर इशारा देणारे डिटोनेटर्स ठिकठिकाणी लावून ठेवले होते. आणि मालगाडी पुढे ओढून मागील बाजू मोकळी करावयाच्या खटपटीत तो होता. खरे म्हणजे सायडिंग लाईनपेक्षा मोठी मालगाडी सोडणे हा गुन्हा रेल्वे कंपनीचा होता, पण स्टेशनमास्तर आता दुसरे काही करू शकत नव्हता. जेसीची 'स्पेशल' अपेक्षेपेक्षा लवकर आली आणि मालगाडीच्या शेवटच्या डब्यावर आदळून हाहाःकार माजला. फक्त इंजिनच कसे

घसरले हे स्टेशनमास्तरच्याही लक्षात येईना. ते कोडे त्याला कधीच सुटले नाही.

ग्रेगरीने आता नव्याने लिहून दिलेल्या जबाबात त्याच्याबद्दल उल्लेख होता. तो जबाबात म्हणाला होता :

'होक्स व्हीलेच्या अलीकडे तीन मैलांवर इंजिनखाली डिटोनेटर्सचे इशाऱ्याचे स्फोट झाले तेव्हा गाडी १०० मैलांच्या वेगाने धावत होती, पण स्फोटांचे आवाज ऐकल्यावर जेसीने सारे कौशल्य पणाला लावून वाफ तोडली. ब्रेक्सच्या घर्षणाने उडू लागलेल्या ठिणग्या इंजिनमध्ये भरल्या. आणखी तीन–चार इशाऱ्यांचे आवाज मी ऐकले. गाडीच्या गतीवर त्याचा काबू येत होता. परंतु मी स्वतः फार घाबरलो होतो. पुढे दूर अंतरावर रेल्वेच्या बाजूला एक गवताची गंजी होती. गाडीचा वेग बराच कमी झाला होता. त्या गंजीवर उडी मारून जीव वाचविण्यास आणि घरी अखेरचा निरोप देण्यास त्याने मला सांगितले. आणि मी गंजीवर उडी मारून जीव वाचवला. गाडीचा वेग कमी कमी होत होता, पण शेवटी ती पुढे जाऊन मालगाडीवर आदळलीच. नंतर मी ते दीड मैल अंतर चालत गेलो आणि झालेला अपघात पाहिला. पण नंतर कंपनीच्या सांगण्यावरून इंजिनमध्येच होतो असे खोटे सांगितले.'

नव्या समितीने निर्णय दिला की, 'लाईन मोकळी असल्याची खात्री असताना १०० मैलांच्या गतीने जाण्यात काही गैर नव्हते. उलट इंजिनीअर जेसी जोन्सने अपघात होईपर्यंत एक श्वास वेळ वाचविला होता. शंभर मैल वेगाने धावणारी मेलगाडी थांबविण्यास किमान दहा मैल अंतर तरी असावे लागते, पण जेसी जोन्सने तीन मैल अंतरात गाडी जवळ जवळ थांबवली आणि प्रेसिडेन्ट धरून जवळ जवळ तीनशे लोकांचे प्राण त्याने वाचविले. फायरमन ग्रेगरीला प्राण वाचविण्याची संधी त्याने उपलब्ध करून दिली, हेही प्रशंसनीय वर्तन आहे.'

समितीचा हा निर्णय जाहीर होईपर्यंत दहा वर्षे गेली. १९६४ साल उजाडले. पण जेसी जोन्सचा निर्दोषीपणा शेवटी पन्नास वर्षांनी सिद्ध झाला आणि अमेरिकेच्या एका प्रेसिडेन्टचे प्राण वाचविणाऱ्या जेसी जोन्सचे एक छोटेसे स्मारक अपघाताच्या जागी २४ एप्रिल, १९६४ रोजी उभे करण्यात आले. ग्रीन व्हीलेमधली चर्चची घंटा त्या दिवशी अखंड वाजत होती आणि मागील बाजूला जेसीच्या थडग्याजवळ उभा असलेला जॉर्जी मनात म्हणत होता–

'जेसी, तू दोषी नाहीस– तू निर्दोष आहेस.

'हे तेव्हापासून माझ्या मनात होतं, पण ते खरे ठरण्यास पन्नास वर्षे लागली. जेसी, तू खरंच निर्दोष आहेस.'

वृद्ध जॉर्जीशी हस्तांदोलन करून ग्रीन व्हीले स्टेशनवर मी परतलो तेव्हा तृप्त झालो होतो. □

(रीडर्स डायजेस्टमधील एका जुन्या व्यक्तिरेखेचा स्वैर अनुवाद)

---

## आर्थिक विकास आणि कर्तृत्वप्रेरणा : पृष्ठ १० वरून

नाहीत. ही बालसंगोपन भूमिका रुजावी लागेल, आणि परंपरानुगामी समाजात ती देखील दीर्घकालीन प्रक्रियाच असते. तेव्हा, विकसनशील किंवा अविकसित देशांना त्यांच्या आर्थिक विकासासाठी दीर्घकाळ वाट बघावी लागणार काय ?

### कर्तृत्व-प्रेरणेचे प्रशिक्षण

याच विचारातून नवीन संशोधनांनी जन्म घेतला. राष्ट्रातील तरुणांना कर्तृत्व-प्रेरणेचे प्रशिक्षण प्रत्यक्ष शिक्षण देता येणार नाही काय ? जीवनमूल्यांच्या परिवर्तनापर्यंत न जाता, कर्तृत्व-प्रेरणेच्या विकासासाठी पोषक ठरणाऱ्या कल्पनाविश्वाने त्यांना भारावून जर टाकता आले, तर या प्रेरणेच्या दृष्टीने निर्मितिक्षम मानसिक पार्श्वभूमी तयार करता येईल की नाही ? या प्रश्नांवर संशोधन केल्यावर शेवटी याही प्रश्नांची उत्तरे मिळाली. विशिष्ट तंत्राने जर केवळ एक महिना प्रशिक्षण दिले, तर तरुणांत कर्तृत्व-प्रेरणा विकसित होते व याचे अत्यंत यशस्वी परिणाम त्यांच्या शालेय प्रगतीवर होतात, असे कोल्ब व डी चार्म्स या संशोधकांनी दाखवून दिले. भारतात देखील दिल्ली, राजस्थान व गुजरात या भागांत जे प्रयोग झाले, त्यांचेही निष्कर्ष यांना तंतोतंत जुळणारे आहेत. परंतु या तंत्राने आर्थिक विकासाचा वेग वाढविता येईल काय ? शालेय प्रगतीपेक्षा आर्थिक विकासाची घटना अधिक जटिल असते. तेव्हा आर्थिक विकासाबद्दल काय ?

मॅक्लीलँड व विन्टरबॉटम यांनी भारतातच या दृष्टिकोनातून १९६५–६६ च्या सुमारास प्रयोग केले. आंध्र प्रदेशातील काकीनाडा व राजमुन्द्री या गावांतील सामान्य व्यवसाय करणारी सर्वसामान्य माणसे निवडून त्यांना 'कर्तृत्व-प्रेरणेचे' प्रशिक्षण विशिष्ट तंत्राने दिले व त्यांच्या आर्थिक क्षेत्रातील प्रगतीचा अनुसरणाभ्यास केला. निष्कर्षाचे स्वरूप अत्यंत आशादायक आहे. हे व या प्रकारची या क्षेत्रातील इतर संशोधने विकसनशील राष्ट्रांना प्रेरित करणारी आहेत, हे लक्षात घ्यावयास हवे. समाजाच्या किंवा राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी शेवटी व्यक्तीच तयार कराव्या लागतात आणि त्याही कर्तृत्व-प्रेरणेने भारावलेल्या व्यक्तीच असतील. या दृष्टिकोनातून प्रशिक्षणाची नवीन तंत्रे जर आत्मसात केली गेली आणि शालेय व औद्योगिक अभ्यासक्रमांना या तंत्रांचा आधार दिला गेला, तर अविकसित किंवा विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक विकासाचा काळ निश्चितपणे जवळ येणार आहे. नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ मोटिव्हेशनल अँड इन्स्टिटयूशनल डेव्हलपमेन्ट, या संस्थेने या प्रकारचे कार्य महाराष्ट्रात व महाराष्ट्राच्या बाहेर करावयास सुरुवात केलेली आहे. विशेषतः आर्थिकदृष्टया मागास जिल्ह्यांतील तरुणांना या नवीन तंत्रांनी तयार करावयाचे व साधनसामग्री विपुल असणाऱ्या या मागास जिल्ह्यांतील आर्थिक विकासाला चालना द्यावयाची ही या संस्थेच्या कार्याची दृष्टी आहे. आर्थिक विकासात केवळ औद्योगिक विकासच अंतर्भूत असतो, असे नाही. कृषिविकासाचाही त्यात फार मोठा वाटा असतो. यशस्वी शेतकऱ्यांची कर्तृत्व-प्रेरणा जास्त असते, हेही आज संशोधनांती लक्षात आलेले आहे. त्यामुळे या देशातील कृषिवर्गाकडेही या दृष्टीने लक्ष देण्याची आज नितांत गरज आहे. उद्योग, शिक्षण, कृषी या सर्वच क्षेत्रांत जर कोणते महत्त्वाचे कार्य सामाजिक संस्थानिकांना करावयाचे असेल, तर निर्मितिक्षम प्रेरण कसे निर्माण होईल, याचाच विचार त्यांना करावा लागणार आहे. □

[ समाज प्रबोधन पत्रिका, नोव्हेंबर-डिसेंबर १९७६ अंकावरून साभार पुनर्मुद्रित. ]

## नाट्यपरीक्षण

# ' सासू मेलीच पाहिजे ! '

' नाट्यमंदार 'चे छत्रपती
राजाराम शिंदे यांस जाहीर खलिता
स. न.

मराठी रंगभूमीच्या उद्धारासाठी आपण अलीकडे जे निकराचे प्रयत्न चालविले आहेत, त्याबद्दल आपले मानावेत तितके आभार कमीच होतील.

' सासू मेलीच पाहिजे ' हा आपण सादर केलेला नवा फार्स पाहिल्यानंतर आपले हे प्रयत्न कितपत फलदायी होतील याची शंका येते. यापूर्वी अलीकडेच '-नवऱ्याला हवी मैत्रीण ' नावाचा फार्स आपण सादर केला होता. लेखनात सुमार असलेला हा फार्स केवळ आत्माराम भेंड्यांसारख्या 'समर्थ अभिनेत्यानं तारला होता. एरवी त्यात फारसा राम नव्हता, अगदी त्याचे प्रयोग अजूनही चालू असले तरी. त्यानंतर आलेल्या नाट्यसंपदेच्या 'तीन लाखांची गोष्ट ' नावाच्या अपयशी फार्सला हेच दुखणं, थोड्याबहुत फरकानं, जडलं होतं. मराठी फार्सचं हे असं का होत आहे याचा विचार आपल्यासारख्यांनी नाही तर कुणी करायचा ?

देखणं नेपथ्य, इतर सजावट, एखादी पायाभूत फार्सिकल सिच्युएशन आणि फार्स-मध्ये बागडण्याचा सराव असल्यानं हशे पिळून वसूल करणारा गुणी नटसंच, या सगळ्यांच्या गोळाबेरजेतूनही चांगला फार्स निर्माण होऊ शकणार नाही, हे आपणाला माहीत नाही असं कसं होईल ?

सासू मेलीच पाहिजे या आपल्या फार्सचं बलस्थान त्याची थीम किंवा लेखन यात आहे की बबन प्रभूंच्या स्त्रीभूमिकेत आहे, फार्स आणि ' डीसेन्सी ' यांचा काही संबंध आहे का, ठरीव नमुन्याच्या विनोदी पात्रां-द्वारे ( set characters ) अपेक्षिलेले हशे हे कितपत दर्जेदार म्हणता येतील, फार्समध्ये काहीही म्हणजे नक्की काय काय चालू शकतं. असे अनेक प्रश्न ' सासू ' पाहून निर्माण झाले, त्यांची उत्तरं खरं तर आपल्याकडूनच हवी आहेत.

चांगल्या फार्सला इतर कुठल्याही चांगल्या नाटकाइतकंच ताकदीचं स्क्रिप्ट लागतं. अली-कडे अशी स्क्रिप्ट्स् गवसत नसतील तर ' सासू मेलीच पाहिजे– ' सारख्या नाटकाचे दौरे वाचवून ते वेळ-श्रम-पैसा, चांगली स्क्रिप्ट्स् हुडकण्याच्या कामी आणता येतील.

असं समर्थ नाटक मिळेपर्यंत हाती साप-डतील त्या सा ( पि ) सवा मारत बसण्या-पेक्षा आपण एक वर्षभर नवं नाटक हाती घेतलंच नाही तर चालणार नाही का ? कदाचित त्यातूनच मराठी रंगभूमीचा उद्धार व्हावा असं विधिलिखित असेल !

आपला प्रेक्षक
**शिरीष सहस्रबुद्धे**

## मराठी चित्रपट

# आराम हराम आहे

### अर्थात ज्याच्या त्याच्या तोडीचे जे–ते

हिंदीतील बी. आर. चोप्रांच्या तोडीचे मराठी चित्रनिर्माते श्री. कमलाकर तोरणे यांनी काढलेला ' आराम हराम आहे ' हा सप्तरंगी मराठी चित्रपट नुकताच पाह-ण्यात आला. (या वाक्यातील बी. आर. चोप्रांची बदनामी करणारा मजकूर माझा नसून या मराठी चित्रपटाच्या जाहिरात-कर्त्यांचा आहे. हिंदीतील कशाच्या तोडीचे काय मुद्दे यात आहेत, हा प्रश्न त्यांना पडतच नाही. जाहिरातदारांनीच प्रेक्षकांचा हा त्रास कमी केलेला आहे. अर्थात हिंदी चित्रपटाच्या तोडीची अंगोपांगे आपल्या चित्रपटात असणे हा प्रकार जाहिरात करण्यालायक आकर्षक नव्हे, हे त्यांना कसं कळावं देव जाणे ! )

तर ' आराम हराम आहे ' हा एक अति-आधुनिक धर्तीचा समृद्ध मराठी चित्रपट आहे. ' श्रीमंत बापाच्या एकुलत्या एका मुलानं बेपर्वाईनं हवे ते रंगढंग उधळणं आणि शेवटी आपल्या जुन्या मास्तरांच्या उपदेशा-मुळं कष्टाचं महत्त्व जाणून त्याची गाडी रुळावर येणं ', अशी रुळलेली कथा लाभ-लेल्या या चित्रपटाचं प्रमुख आकर्षण त्याची संपन्न बाह्यांगे हे आहे, हे निश्चित. सुरेख सप्तरंगी बाह्यचित्रण, पार्श्वभूमीसाठी निवड-लेल्या वैभवशाली सिच्युएशन्स (वृंदावन गार्डन हा तथाकथित अपूर्वाईचा प्रकार याच सदरात मोडतो.) आणि सफाईदार ध्वनि-मुद्रण ही या चित्रपटाची वैशिष्ट्यं अभिनंद-नीय आहेतच. चित्रपटाची कथा आणि पात्रे या प्रमुख अंगांमधून मात्र पुरेसं समाधान मिळू शकत नाही, हे नमूद केलंच पाहिजे. महेश कुबेर ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा उभी करण्यात रवींद्र महाजनीला मिळालेलं यश मर्यादित आहे. ठराविक मर्यादेपर्यंतच भाव-प्रवण होणारा चेहरा व सदोष उच्चार हे त्याचे दोन प्रमुख दोष. त्याच्या चिकणेपणा-वर वेळ मारून न्यायचा प्रयत्नही फारसा यशस्वी होण्यासारखा नाही. महेशची प्रेयसी म्हणून रूही अजीबात शोभत नाही. उंची आणि फॉर्म या दोन्हीत कमी पडणाऱ्या या नटीच्या चेहऱ्याची फीचर्स खूपशी जया भादुरीसारखी आहेत, या एका कारणासाठी तिला मारूनमुटकून जया बनविण्यात आलंय्. जीवं नसलेली ती भ्रष्ट नक्कल पाहणं त्रास-दायकच आहे. त्यामानाने गणेश सोळंकी (सुदाम), शरद तळवलकर (महेशचे सेक्रे-टरी) आणि धुमाळ (मॅनेजर) या त्रिकुटाने मनापासून कामं करून जास्त मजा आणला आहे. तीच गोष्ट मास्तर (रामचंद्र वर्दे) व ऑडिटर गोखले (दत्ता भट) या गेस्ट रोल-सारख्या छोट्या भूमिकांची. पद्मा चव्हाण या हिंदी चित्रपटातील कुणाच्या तोडीच्या नायिका आहेत, ते ' आराम हराम आहे ' च्या जाहिरातवाल्यांनी दिलेलं नाही. एरवी त्या हिंदी नायिकेनं बदनामीची फिर्याद करावी असा सावळागोंधळ पद्माबाईंनी संपूर्ण चित्रपटात घातला आहे. आपल्या वयाला व कुवतीला साजतील अशाच भूमिका स्वीका-रणं त्यांना केव्हा जमेल, याची वाट पाहणं एवढंच सध्या आपल्या हाती उरतं. त्या सौ. तोरणे आहेत, हेच कथेवर चिकटवलेल्या त्यांच्या भूमिकेमागचं रहस्य असावं. वृंदावन गार्डनमधील द्वंद्वगीतात त्यांना टाळून बाग पाहताना बरेच परिश्रम करावे लागले.

या चित्रपटातली गाणी हा एक चीड आणणारा प्रकार आहे. एक तर सर्व गाणी अतिशय कामचलाऊ व रटाळ आहेत. ग. दि. मां. ची गीतं खेबुडकरांच्या गाण्यांपेक्षा वेगळी

ओळखता येऊ नयेत हे म्हणजे फारच झालं. ही चार-सहा गाणी हवी तिथे हवी तशी ठोकली आहेत. रूही पडद्यावर आल्याआल्या एक निरर्थक रोमँटिक साँग ठोकते. मास्तरही निरुद्योगी असल्यासारखे रामप्रहरी एक भजन हाणतात. वस्तुतः हे एक साधं-सरळ सूचक गाणं. अध्यात्माशी वगैरे दूरचाही संबंध नसलेल्या या गाण्याचं भजन का करून टाकलंय् देव जाणे. एक कॅबरे व एक मुजरा नृत्य उपेक्षणीय आहेत.

कथा–पटकथा–संवादलेखक मधुसूदन कालेलकर आणि दिग्दर्शक कमलाकर तोरणे यांनी काही मोजके प्रसंग (उदा.– गणेश सोळंकीच्या 'इन्ट्रोडक्शन' नंतरचे त्याचे बहुतेक सर्व प्रसंग, मॅनेजर–सेक्रेटरी–ड्रायव्हरच्या कारवाया वगैरे) चांगले खुलविले आहेत. छायाचित्रकार रत्नाकर लाड यांनी मात्र या चित्रपटाची खरी बाजी मारली आहे, असं म्हणायला हवं. हिंदी चित्रपटाच्या जवळपास जाईल इतकं सफाईदार व तंत्रदृष्ट्या निर्दोष रंगीत चित्रण त्यांनी केलं आहे. या दृष्टीनं चित्रपटाच्या यशाचे निम्मे मानकरी ते ठरतील. वृंदावन गार्डन्समधली दृश्यं त्यांनी खरोखरच नयनरम्य टिपली आहेत.

हिंदी चित्रपटाच्या धर्तीचा (किंवा तोडीचा म्हणा) हा चित्रपट काढून तोरण्यांनी नक्की काय साधलेलं आहे ते कळत नाही. हिंदीच्याच तोडीचा चित्रपट त्यांना काढायचा होता तर हिंदीतले भिकार सिनेमेच मॉडेल्स म्हणून घ्यायची सक्ती कुणी केली होती ? हिंदीच्या तोडीचा सिनेमा काढणं (थोडक्यात, नक्कल करणं) यात त्यांना प्रतिष्ठा कुठं दिसली ? आता हिंदी चित्रपटांच्या तोडीचे सहनशील व उदार आश्रयदाते प्रेक्षक भेटले तरच त्यांच्या या धाडसाची खैर आहे.

हिंदीच्या तोडीच्या चित्रपटकारांनी चित्राच्या टायटलसमध्ये 'रविंद्र' आणि 'सहाय्यक' अशा किचकट चुका सोडल्या तरी 'प्रमूख', 'पूनर्ध्वनिमुद्रण' अशा कुरूप ढोबळ चुका टाळायला हरकत नव्हती.

# आप बीती

## प्रेक्षकांवर कोसळलेले संकट

आप बीती हा नवा हिंदी सिनेमा म्हणजे एका सुखी कुटुंबावर कोसळलेल्या संकटपरंपरेची कर्मकथा आहे. अशा कौटुंबिक रडकथा काही कमी संख्येनं पडद्यावर आलेल्या नाहीत. सुखी-समाधानी आणि कुणाच्या अध्यातमध्यात नसणाऱ्या कुटुंबावर हिंदी सिनेमात येणारी संकटं हा माझ्या दृष्टीनं काळजीचा आणि विनोदाचा व्यामिश्र मुद्दा आहे. सुखी कुटुंबांवरच अशा आकाशीच्या कुऱ्हाडी का कोसळतात आणि ते माहीत असलं तरीही त्यांना सुखी कुटुंब असं सुरुवातीला तरी का म्हटलं जातं, हाही मला अतिकुतूहलाचा विषय वाटतो. एनी वे, माझ्या अशा बारीक अपशंकांचा जाच निर्माते–दिग्दर्शक मोहनकुमार यांना बिल्कुल होत नसल्यामुळे त्यांनी आप बीती नावाचा पिक्चर काढून टाकला आहे. मोहनकुमार हे गोलगुळगुळीत, गुळमुळीत आणि गुलगुलीत प्रेमकथा पेश करणारे असामी म्हणून ओळखले जातात. राजेंद्रकुमार–साधना या हिट पेअरच्या उतरत्या काळात (आणि चढत्या वयात) त्यांना घेऊन मोहनकुमार यांनी काढलेला 'आप आये बहार आयी' नामक एक नामी पिक्चर पाहण्याची घनघोर सक्तमजुरी चार वर्षांपूर्वी एकदा माझ्या कपाळी आली होती. सुमार प्रेमकथा पाजळणारे हिंदी सिनेमे जास्तीत जास्त किती भिकार असू शकतात याचा तो आदर्श वस्तुपाठ होता. आप बीती त्यामानानं बराचसा सह्य वाटला.

अशोककुमार हे एक साधे कारखान्यातले फोरमन. स्वतः अशिक्षित असले तरी कर्ज काढूनही आपल्या मुलाला परदेशी शिकायला पाठवतात. त्यासाठी त्यांची लाडली बेटी गीता (हेमामालिनी) एका पादत्राणाच्या दुकानात सेल्सगर्लची नोकरी धरते. फावल्या वेळात सभ्य पेहरावात शशीकपूर या बड्या बापाच्या बेट्याबरोबर प्रेम चालू ठेवते. तिच्या नादानं एकीकडे शशीसाब आपल्या व्हिलन बापाच्या इस्टेटीवर लाथ मारतात तर दुसरीकडे परदेशाहून परतलेले चिरंजीव सुजितकुमार आपल्या प्रेयसीच्या (रीना : अरुणा इराणी) नादानं आईबापालाच टाटा करतात. मग सुधा व इतर सत्पक्षीयांवर नाना आपत्ती ओढवतात. एकदमच इमोशनल फॅमिली ड्रामा विथ् जजबात सुरू होतो. तो संपतो तेव्हा अशोककुमार स्वर्गवासी झालेले असले तरी त्यांच्या सौ. च्या पायी सर्व जिवंत पात्रे मातृप्रेमाची महती गात गात नतमस्तक होऊन कोलमडलेली असतात आणि अशा सानेगुरुजीछाप वळणामुळे हादरलेले प्रेक्षक खुर्च्यांतून कडमडून उभे राहिलेले असतात.

अशी ही वहिवाटीला सोडून न जाणारी कौटुंबिक कथा, कथाबाह्य आकर्षणांमुळेच थोडीफार प्रेक्षणीय झालेली आहे. आधी मोहनकुमारांनी इतपत तरी खोलगंभीर विषयाला हात घातला हेच विशेष. हेमामालिनीनं गीताची दुरंगी भूमिका बऱ्यापैकी तयारीनं सजविली आहे. सेल्सगर्लच्या निळ्या जीन्सच्या गणवेशात तिला पाहाताना काही जुन्या आणि चांगल्या चित्रपटांतल्या तिच्या दर्शनाची आठवण होणं शक्य आहे. शशिकपूरमहाशयांनी एक तर म्हातारपण लपविण्याचा फॉर्म्युला देवआनंदकडून शिकून घ्यावा किंवा चक्क कॅरॅक्टर ॲक्टिंगकडे वळावं, असा आमचा प्रेमळ सल्ला त्यांना आहे. अशोककुमार व प्रेमनाथ (होय, तोसुद्धा) यांनीही आपापल्या भूमिका समजूतदारपणे वठविल्या आहेत. अपवाद एकच. अशोककुमारनं दारू पिऊन म्हटलेलं 'बुढ्ढा बन गया शराबी' नावाचं आचरट व हिडीस नृत्यगीत. शब्दजुळारी आनंद बक्षी व संगीतमजूर लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांची कामगिरी नेहमीसारखीच डफ्फड, कानफाडी व लोकप्रिय. 'दिलरुबा मेरे पास तो आ' या गाण्याचं मजेदार फँटसिकल चित्रीकरण हा ओॲसिसटाइप् अपवाद.

–शिरीष सहस्रबुद्धे

# पेपको–मिल्स

## खोपोली

महाराष्ट्रातील एक अग्रेसर कागद कारखाना
आमचे खोपोली येथील कारखान्यात औद्योगिक वेष्टणासाठी
लागणारे विविध प्रकारचे कागद व पुठ्ठे तयार होतात.

# पेपर अ‍ॅण्ड पल्प कन्व्हर्शन्स लिमिटेड

**रजिस्टर्ड ऑफिस**

११८३ शिवाजीनगर
फर्ग्युसन कॉलेज रोड
पुणे ५ ( महाराष्ट्र )


**मिल्स्**

खोपोली
जि. कुलाबा
( महाराष्ट्र )

इंग्रजी चित्रपट

# किंग एलेफंट

## एक फसलेला पण नयनरम्य वन्यपट



एक गोंडस हरिण चित्त्याने सावज म्हणून हेरले आहे. दबकत दबकत चित्ता पुढे सरकत आहे. हरिण त्याच्या टप्प्यात येते आणि तो ताशी ६० मैलांच्या तुफानी वेगाने हरिणाच्या मागे लागतो. एखादी स्प्रिंग उडावी तशा उडया मारत हरिण जिवाच्या आकांताने धावू लागते. पण चित्ता त्याला गाठतोच आणि क्षणार्धात हरिणाचे मागचे पाय खेचून त्याच्या नरडीवर झेप घेतो... लक्षावधी फ्लेमिंगो पक्ष्यांचा मेळा निळशा-क्षार सरोवराच्या काठी जमला आहे. लांबलचक, काटकुळे तांबडे पाय असणारे हे सुंदर पक्षी विमानाप्रमाणे स्टार्ट घेतात, एकामागोमाग एक आकाशात अलगद झेपावतात आणि पांढऱ्याशुभ्र 'फ्लेमिंगो-मालांनी' अवकाश भरून जाते.

...दोन तासांपूर्वीच जन्मलेले पण चांगलेच गुटगुटीत असे हत्तीचे पिल्लू आईच्या पायांमधून लुडबुडत असताना धपकन् चिखलात पडते. पण तितक्यात आईच्या भक्कम सोंडेचा आधार त्याला मिळतो व ते उठून उभे ठाकते...

आफ्रिकन जंगलातील या अशा अनेक मनोहारी दृश्यांची रेलचेलच 'किंग एलेफंट' या चित्रपटात पाहावयास मिळते. जगविख्यात निर्माते ग्राफ यांचा हा वन्यपट गेल्याच आठवड्यात 'राहूल' येथे दाखल झाला आहे.

सायमन ट्रेव्हर हे या वन्यपटाचे दिग्दर्शक व छायाचित्रकार. केनया, युगांडा व टांगानिका या पूर्वआफ्रिकन राष्ट्रांना घनदाट अरण्ये व विविधरंगी प्राणीसृष्टी यांची अमूल्य नैसर्गिक देणगी मिळाली आहे. 'किंग एलेफंट' हा चित्रपट म्हणजे या प्रदेशांचा 'अनभिषिक्त सम्राट' गजराज यांच्या जीवनाचे रम्य दर्शन !

नुकत्याच जन्मलेल्या हत्तीच्या पिलाबरोबरच आपण या आफ्रिकन हत्तींच्या कळपात पोहोचतो. प्रचंड कान व सुळे असलेले हे आफ्रिकन हत्ती आपल्याकडील हत्तींपेक्षा बरेच भव्य आहेत. हत्तीचे हे पिल्लू हळूहळू जगाचा अनुभव घेत, टक्केटोणपे खात वाढत असते. आपल्या कळपाबरोबर मैलोगणती प्रदेशात मनसोक्त भटकते. त्याच्याबरोबर भटकतानाच आपल्याला आफ्रिकेतील भयाण, परंतु तितक्याच मनोहारी निसर्गाचे व त्यात स्वच्छंदपणे वावरणाऱ्या प्राण्यांचे दर्शन घडते. हत्तींच्या या भटकंतीत त्यांना कोण भेटत नाही ? सिंह व त्याचे कुटुंबीय या गजराजाची जरा दुरूनच दखल घेतात. हत्तीप्रमाणेच शाकाहारी असणारे दोन शिंगी गेंडे; लांब मानेचे जिराफ, वायुवेगाने धावणारे चितळ व सांबर, टिवल्याबावल्या करणारी माकडे हे तर हत्तींचे सहचर. माकडांना हत्तीच्या विष्ठेतल्या फळबिया चविष्ट वाटतात तर बगळ्यासारख्या काही पक्ष्यांना हत्तींच्या भारदस्त आगमनामुळे बावचळून इतस्ततः उडणारे कीटक म्हणजे एक मेजवानीच वाटते. हत्तींच्या या सहचरांखेरीज आपल्याला झेब्रे, रानडुक्करे, रानगायी, गवे, बिबट्या, तरस, रानटी कुत्रे, पाणघोडे, कासव इत्यादी प्राणी, बगळे, पोपट, बदके, लव्ह-बर्डस्, करकोचे, फ्लेमिंगो, गिधाडे हे पक्षी व कोळ्यासारखे कीटक, या भटकंतीमध्ये अधूनमधून दर्शन देतात.

हत्तींच्या कळपाबरोबरची भटकंती हाच या चित्रपटाचा गाभा. याला कथानक नाही, पण या भटकंतीबरोबर आहे खुसखुशीत निवेदन. हत्तीचे अर्भक चिखलात आपटल्यावर निवेदक म्हणतो, 'Don't worry small friend. Your mother is going to come to your help.' आणि पिल्लाची आई त्याला सोंडेचा आधार देऊन उठविते. एकदा निवेदक सांगतो, 'सिंह कुटुंबात शिकारीचे काम सिंहिणीचे. तसा सिंह तिला कधीमधी मदत करतो. But, he prefers to wait.' आणि इकडे सिंह झाडाच्या बुंध्याशी बसून मस्तपैकी आळस देत असतो. या चटकदार निवेदनामुळे हा चित्रपट कुठेच कंटाळवाणा होत नाही.

पण ही रमणीय जंगलदृश्ये पाहताना सारखे जाणवत राहते की, या वन्यपटाचा प्राण कुठे तरी हरवलाय. 'किंग एलेफंट' असे म्हणताना दिग्दर्शकाला हत्तीची

'जंगलचा सम्राट' अशी प्रतिमा उभी करायची आहे, पण त्यात तो सपशेल अयशस्वी झाला आहे. आजपर्यंत आफ्रिकेतील निबिड अरण्यात भटकलेल्या व खास हत्तींचा अभ्यास करणाऱ्या शिकाऱ्यांनी हत्तीची प्रतिमा निर्माण केली आहे, ती एक बुद्धिमान, समंजस, ताकदवान, उमद्या मनोवृत्तीचा व साऱ्या जंगलात आपला दबदबा निर्माण करणारा राजबिंडा प्राणी अशी. जेथे जीवन आणि मृत्यू यांच्यातील सीमारेषा फारच पुसट झालेल्या असतात, अशा जंगलात दीनदुबळ्या जनावरांचा आश्रयदाता म्हणजे हा 'गजराज.' शत्रूपासून जिवाच्या आकांताने धावणारा हरिणांचा कळप जीव बचावण्यासाठी हत्तींच्या कळपाआड दडतो; तो हत्तींच्या उमद्या मनोवृत्तीवर व सामर्थ्यावर असणाऱ्या त्यांच्या गाढ विश्वासामुळे. आपला शत्रू कितीही प्रबळ असो–विद्युत्‌वेगाने दौडणारा चित्ता असो अथवा प्रचंड ताकदीची सिंहीण असो, हत्तींकडे आपल्याला आश्रय मिळेलच, अशी त्यांची भावना असते, असे अनेकांनी लिहून ठेवले आहे. आपण विद्येचे दैवत असणाऱ्या गणपतीला हत्तीचे मस्तक बसवून हत्तीच्या बुद्धिमत्तेबद्दलची पावतीच दिली आहे. तुतारीप्रमाणे आवाज करीत सारे जंगल हादरविणाऱ्या, आपल्या बलवान शुंडेनें प्रचंड वृक्षांच्या फांद्या कडाकड तोडणाऱ्या हत्तींची ताकद आफ्रिकेतील शिकाऱ्यांना नेहमीच भयभीत करीत आली आहे.

पण दुर्दैवाने हत्तीच्या या 'राजस' गुणांना 'किंग एलेफंट'मध्ये अजीबात न्याय दिलेला नाही. 'किंग एलेफंट'मध्ये प्राधान्य आहे हत्तीला हे निर्विवाद. पण यातील हत्ती हा चित्रपटाच्या नावाप्रमाणे जंगलचा 'राजा' वाटत नाही. यातला हत्ती हा इतर प्राण्यांपेक्षा फारसा वेगळा नाही. निवेदकाने ही उणीव भरून काढण्यासाठी ठिकठिकाणी काही comments केल्या आहेत. उदा.– 'हत्ती आपल्या कळपातील अपंग व बालके यांची नेहमी काळजी घेतो. जेथे केवळ बलवानच जगू शकतात, अशा जंगलातील हे एकमेव उदाहरण आहे.', 'हत्तीला काही औषधी वनस्पती माहीत असतात व आजारीपणात किंवा दुखापत झाल्यावर तो त्यांचा उपयोग करतो.'

पण ही काही हत्तीची खास वैशिष्टये नव्हेत. घरातील साधी कुत्री–मांजरेदेखील पोटदुखी झाल्यावर विशिष्ट गवत खातात, कळप करून राहणारी माकडेदेखील एकमेकांची काळजी घेतात. हत्तीचे वैशिष्टय आहे ते त्याच्या हुशारीत, शहाणपणात व सामर्थ्यात! हत्ती इतर प्राण्यांपेक्षा सर्वांत वेगळा वाटतो तो त्याच्या दीनदुबळ्यांना अभय देणाऱ्या 'समाजवादी' मनोवृत्तीमुळे!

आफ्रिकेतील किलीमांजारो पर्वतराजींच्या या घनदाट जंगलात प्राणिजीवनाचे जवळून चित्रीकरण करणे वाटते तितके सोपे नाही. सावजापाठी दौडणारी सिंहीण, ताशी ४० मैलांच्या वेगाने धावून हरिणाला घेराव टाकून त्याचा फडशा पाडणारा रानटी कुत्र्यांचा जमाव, वर्षाकाठी १–१॥ हजार मैलांची भ्रमंती करणारे हत्तींचे कळप यांचे चित्रीकरण ही फार मोठी अवघड व खर्चिक बाब आहे. तरीही ट्रेव्हर त्यात बऱ्याच प्रमाणात यशस्वी झालेले आहेत. या वन्यपशूंच्या नकळत त्यांच्या हालचाली त्यांनी मोठ्या खुबीने टिपल्या आहेत. पण हत्तींची खरी प्रतिमा जनमानसापुढे आणण्यात मात्र हा चित्रपट पार फसला आहे. साऱ्या चित्रपटाभर हत्तींवरून कॅमेरा फिरला असला तरी चित्रपटाच्या शेवटी या 'गजराजा'चा ठसा प्रेक्षकांच्या मनावर उमटत नाही व हा चित्रपट 'किंग एलेफंट'चा न राहता 'आफ्रिकेच्या नॅशनल पार्कमधून' हत्तींच्या एका कळपासमवेत मारलेला रम्य फेरफटका, एवढेच मर्यादित यश मिळवून जातो.

आफ्रिकेतील खरे प्राणिजीवनदेखील ट्रेव्हर यांनी टिपलेल्या प्राण्यांपेक्षाही अधिक समृद्ध व विविधढंगी आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आफ्रिकन जंगलातील 'खरा धोका' म्हणून ओळखले जाणारे महाविषारी सर्प, अजगर, सुसरी यांना या वन्यपटात अजीबात स्थान नाही. या चित्रपटातील काही दृश्ये ही जोड-दृश्ये आहेत, हे सामान्य माणसाच्याही लक्षात येईल. उदा. माकडमंडळी सिंह कुटुंबियांना वेडावून दाखवतात, हे दृश्य, आफ्रिकेतील जंगल जिवंत होते ते रात्री–रात्रीच्या भयाण शांततेत. पण या जंगलपटातील बहुतेक सर्वच चित्रण दिवसाउजेडी केलेले दिसते. या काही उणिवांमुळे ज्यांना प्राणिजीवनाची थोडीफार तोंडओळख आहे त्यांना या चित्रपटातील अपुरेपणा सतत जाणवत राहील.

तरीही मानवप्राण्याला वगळून इतर वन्यप्राण्यांवर बेतलेला हा नयनरम्य वन्यपट म्हणजे एकप्रकारे मोठे धाडसच आहे. महाराष्ट्र सरकारने करमणूक करात सूट देऊन या धाडसाला योग्य प्रतिसाद देण्यास लोकांना उद्युक्त करावे. विद्यार्थ्यांनी तर हा वन्यपट आवर्जून बघावा व सरकारने निदान विद्यार्थ्यांसाठी तरी करमणूक कर माफ करून त्यांना जंगलातील हा मनोहारी फेरफटका मारण्याचे निर्भेळ सुख अनुभवावयास द्यावे.

**–किरण गोखले**


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ४।१२।७६ ते १०।१२।७६

**मेष : भाग्योदयाची चाहूल**

मंगळ हा सामर्थ्यवान ग्रह तुमच्या राशीचा स्वामी असून तोच सध्या तरी तुमचा भाग्यदाता आहे. धैर्य, कार्यक्षमता व असामान्य कर्तृत्व ही मंगळाची वैशिष्ट्ये यावेळी तुमच्या वाट्याला येणार आहेत. त्याचा पुरेपूर लाभ घेणे तुमच्या हाती आहे. नोकरीच्या बाबतीत तुम्ही यावेळी अतिशय भाग्यवान ठरणार आहात. बढती तर सहज मिळून जाईलच, त्याशिवाय तुम्हास अधिकाराबरोबर मोठी प्रतिष्ठा मिळणार आहे. मात्र हाताखालची माणसे दुखवू नका. वैवाहिक जीवनात आनंदाची परिस्थिती निर्माण होईल. पुत्ररत्नाचा लाभ यावेळी तुम्हाला होणार आहे. विवाहेच्छूंचे विवाह चटकन जमून जातील. शुभ दिनांक ४–७.

**महिलांना :** नोकरीत व घरातही आदरयुक्त दरारा निर्माण होईल.

**विद्यार्थ्यांना :** नवी क्षितिजे दृष्टिपथात येतील.

**वृषभ : अपेक्षा उंचावतील**

राशीत असलेला गुरू आता लवकरच आपला पाठिंबा काढून घेत आहे. या गुरूची दखल न घेऊन चालणार नाही. तुमचा भावनेशी निकटचा संबंध असतो व कार्यक्षेत्रात तुमची प्रगती असते. कला व साहित्य ही दोन्ही क्षेत्रे तुमची आवडती आहेत. या क्षेत्रातील तुमच्या कामगिरीला यावेळी बहर येणार असून अपेक्षा उंचावणार आहेत. पैसा व प्रतिष्ठा यांचे जमेल असे मात्र समजू नका. पैशाची अडचण जरी फार मोठी जाणवली नाही तरी हातातील पैसा कसातरी पुरवूनच व्यवहार करावा लागेल. नोकरीधंद्याची परिस्थिती फारशी जिकिरीची राहणार नाही. नवे राजकीय संबंध जोडताना सावधगिरी बाळगा. शुभ दिनांक ४–७.

**महिलांना :** भरतकाम अथवा विणकाम कौतुकाचा विषय होईल.

**विद्यार्थ्यांना :** थांबलेले शिक्षण पुरे होईल.

**मिथुन : अनुकूल पर्व**

मिथुन व्यक्तीच्या भोवती काही काळ जी निराशाजनक परिस्थिती निर्माण झाली होती, त्या परिस्थितीचे धुके आता वितळू लागले असल्याचा प्रत्यय येणार आहे. तुमच्या बुद्धीला नवी क्षितिजे आवाहन करणार असून, त्या क्षेत्रात तुमच्या कर्तबगारीचे अनुकूल असे नवे पर्व सुरू होणार आहे. नोकरीतील कटकटी आता इतिहासजमा होणार असून तुमची कामे सुरळीत होतील. ज्यांना नोकरीत अस्थिरता भोगावी लागत होती, त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. बेकारांना नोकरी तरी मिळेल किंवा धंद्यासाठी मदत तरी मिळेल. लेखनात निर्माण झालेली कोंडी फुटेल. तब्येत सुधारून उत्साह निर्माण होईल. नातेवाईक व कौटुंबिक संबंध सुधारून नवे पर्व निर्माण होईल. शुभ दिनांक २–३.

**महिलांना :** हेतुपूर्तीचे समाधान लाभेल.

**विद्यार्थ्यांना :** बुद्धीची कसोटी यश देईल.

**कर्क : नवे पाऊल**

राशीवर शनीचे बस्तान आहे, ही काही वाईट गोष्ट नाही. तुमची प्रतिष्ठा वाढत आहे. व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडत आहे. यश द्विगुणीत होत आहे. नवी नवी माणसे आकृष्ट होत आहेत, ही सारी या पहिल्या शनीचीच कृपा आहे. कोणत्याही क्षेत्रात तुमच्या कर्तृत्वाची उणीव भासणार नाही. उलट जे विरोधक आहेत ते सहकार्य देतील. वरिष्ठांची मर्जी बसेल. नव्या जबाबदारीची परिणती तुमचा दर्जा वाढण्यात होईल. अनेकांचे सहकार्य मिळेल. आशा-निराशेचा खेळ संपून निश्चित असे कार्य हातून पार पडेल. शुभ दिनांक ५–७.

**महिलांना :** आत्मविश्वास वाढेल. नोकरीत शुभदायक घटना घडतील.

**विद्यार्थ्यांना :** अनेक शुभयोगकारक योग आहेत. महत्त्व वाढेल.

**सिंह : मनःस्वास्थ्य राहील**

रवि-मंगळाची कृपा आहे तोवर तुम्हाला साडेसातीची दखल घेण्याचे मुळीच कारण नाही. यावेळी प्रामुख्याने मनाची स्थिती बरीच सुधारणार आहे. गेल्या काही दिवसांत तुमचे मन अनेक शंकाकुशंकानी डुचमळत आहे. पण ती परिस्थिती आता बदलणार आहे. हे करू का ते करू, ही वृत्ती सोडून आता निश्चित असे काही तरी करा. नोकरीव्यवसाय प्रगतीच्या दिशेने वाटचाल करील. अडचणी दूर होतील. सहकार्य मिळेल. वरिष्ठांच्या मर्जीचा कृपाप्रसाद वाट्याला येईल. अनेक मागण्या कार्यान्वित होतील. प्रकृती सुधारेल. प्रसन्नता लाभेल. कौटुंबिक अडचणींवर मात करू शकाल. शुभ दिनांक ५-६.

**महिलांना :** चांगुलपणाचे बक्षीस मिळेल. अनपेक्षित आनंद मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** तांत्रिक शिक्षणाचा लाभ मिळेल.

**कन्या : नोकरीत ठीक**

तूळ राशीत राहू व हर्शल आहेत, ते मनःस्थिती थोडीफार त्रासिक ठेवतात. तरी पण घाईगर्दीत दिवस जातील. काही उच्चपदस्थ व्यक्ती सहवासात येतील. वजन व प्रतिष्ठा वाढेल. कर्तृत्वाचा प्रभाव वरिष्ठ वर्गावर पडेल. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील, परंतु कामाने जीव थकल्यासारखा वाटेल. दुय्यम धंद्यात प्रगती होईल. नव्या ओळखी होतील. काही नवे काम मिळेल. परंतु ते पुरे करणे लांबणीवर पडेल. आर्थिक परिस्थिती बरी राहील. कौटुंबिक स्वास्थ्य हवेंहवेसे वाटेल. राहणीमानात थोडा अनुकूल बदल होईल. शुभ दिनांक ५–६.

**महिलांना :** मन साशंक ठेवून उगीचच स्वतःचे स्वास्थ्य बिघडवून टाकाल.

**विद्यार्थ्यांना :** घरच्या मायेची पखरण मन आनंदी ठेवील.

**तूळ : पैशाची परिस्थिती सुधारेल**

गुरुमहाराजांची असावी तेवढी अनुकूलता नसली तरी शनी फारच उत्तम आहे. शिवाय सध्या मंगळदेखील अनुकूल आहे. त्यामुळे सारे सुरळीत घडणार आहे. स्थावराची कामे व्यवस्थित पार पडतील. सरकारी कामाला गती येईल. धंद्यासाठी कुणाला भेटायचे असेल तर ते काम पूर्ण होईल. कर्ज वा इतर पैसे मिळू शकतील. आश्वासनांचा चांगला प्रत्यय येईल. कौटुंबिक स्वास्थ्य मिळेल. प्रवास मात्र थोडाफार लांबणीवर पडेल. आध्यात्मिक आनंद मिळू शकेल. साधुसंतांच्या गाठीभेटी होतील. राजकारणात बुद्धीची कसोटी लागेल. डावपेच लढवू नका. शुभ दिनांक ६–७.

**महिलांना :** तब्येत सुधारून मनात ठरवलेले बेत पार पडतील.

**विद्यार्थ्यांना :** वादनकलेचा ध्यास पुरा होईल.

**वृश्चिक : प्रतिष्ठा उंचावेल**

मंगळाचे अभूतपूर्व सहकार्य हेच तुमचे सध्याचे मोठे सामर्थ्य आहे. त्यामुळे तुमची कार्यक्षमता विलक्षण वाढणार आहे. वरिष्ठांवर कामाचा प्रभाव पडेल. तुमची कसोटी लागेल. विशेषत: पोलिसखाते, इंजिनीयरिंग खाते, रेव्हिन्यू खाते, आयकर खाते यांत काम करणारे लोक मोठेच भाग्यवान ठरणार आहेत. त्यांच्या कामाचे चीज होईल. नोकरीत त्यांच्या गुणांची दखल घेतली जाऊन त्यांचा फायदाही होईल. जमिनीसंबंधीची कामे पार पडतील. व्यापारी क्षेत्रात नवे काही तरी घडेल. पण कायदेशीर व नियमाने त्यांनी वागण्याची अतिशय जरूर आहे. नोकरीत 'श्रमाशिवाय पैसा' मिळण्याचा मोह कटाक्षाने टाळावा. शुभ दिनांक ५–७.

**महिलांना :** सार्वजनिक कामात मोठेपणा मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** अनावश्यक खर्च टाळा.

**धनू : निराशा संपेल**

रवि-मंगळ प्रतिकूल क्षेत्रात पदार्पण करण्याच्या विचारात असले तरी त्यामुळे तुमचे काहीही नुकसान होणार नाही. पण शनी आठवा ही एकच गोष्ट तुमच्या प्रगतीत खीळ घालायला पुरेशी आहे. मन अस्वस्थ राहाणे, असमाधान राहाणे, त्रासिक वृत्ती निर्माण होणे, हे सारे आठव्या शनीचे खेळ आहेत. मात्र तुमच्या रोजच्या कामात त्यामुळे कोणताच अडथळा निर्माण होणार नाही. नोकरीत मन उडाले तरी प्रत्यक्षात नोकरीत फरक पडणार नाही. वरिष्ठांची कुरबूर चालू राहिली तरी तिकडे लक्ष देऊ नका लेखन पुरे होईल. लोकांना दिलेली आश्वासने पुरी होतील. मनाची निराशा संपून नवी प्रसन्न परिस्थिती निर्माण होईल. शुभ दिनांक ६–७.

**महिलांना :** आर्थिक परिस्थिती सुधारून स्थावराची प्राप्ती होईल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत काळजीपूर्वक पेपर्स लिहा.

**मकर : अनपेक्षित धनलाभ**

हा आठवडा आर्थिक बाजूने अतिशय उत्तम जाणार आहे. तुमच्यापैकी कुणाला रेसमुळे लाभ होईल तर कुणाला लॉटरीचे बक्षीस लाभेल. कोर्टकचेरीची कामे सुरळीत पार पडतील. जमिनीची खरेदी-विक्री फायदेशीर होईल. स्थावराची प्राप्ती होण्याचा योगदेखील आहे. वारसाहक्काने स्थावर मिळकत मिळू शकेल. परिस्थितिनुरूप वाहन-खरेदीचा योग आहे. ज्यासाठी वाट पाहात होतात ते वाहन यावेळी पदरात पडेल. प्रत्यक्षात लाभ झाला नाही तरी परदेशी प्रवास होण्याची शक्यता आहे. राजकारणात सरशी होईल. नोकरीत बढती व प्रमोशन मिळू शकेल. नोकरीत शाश्वती मिळेल. शुभ दिनांक ६–८.

**महिलांना :** प्रकृतीच्या अनेक तक्रारी दूर होतील.

**विद्यार्थ्यांना :** कौटुंबिक करमणूक मिळेल.

**कुंभ : वनवास संपेल**

गुरू पुन्हा अनुकूल होत आहे. गेले काही महिने तुमच्या बुद्धीची कर्तबगारीची कोंडी झाली आहे, ती या आठवड्यापासून फुटणार असून, तुम्हाला तुमचे निश्चित स्थान मिळणार आहे. ज्याची तुम्ही वाट पाहात आहात, ते महत्त्वाचे स्थान तुम्हाला मिळणार आहे. सार्वजनिक कार्यात तुमची कीर्ती वाढेल, महत्त्व वाढेल. राजकारणात तुमच्या बौद्धिक यशाचे ध्वज आकाशात फडफडणार आहेत. स्तुती ऐकून तुम्हाला आनंद होईल. नोकरीची परिस्थिती एकंदरीत समाधानकारक राहील. सहकार्य व अधिकार यांचा सुरेख संगम तुमच्या बाबतीत घडणार आहे. वरिष्ठांची मर्जी राहील. स्थलांतर होण्याचीही शक्यता आहे. शुभ दिनांक ६–७

**महिलांना :** नोकरीत अपेक्षित ते सारे सहजपणे पदरात पडेल.

**विद्यार्थ्यांना :** वसतिगृहाच्या गैरसोयी दूर होतील.

**मीन : नोकरीत प्रतिष्ठा**

राशिस्वामी गुरू खूपच अनुकूल झाला आहे. शनी पाचवा आहे. रवि-मंगळ धंद्याचे व नोकरीचे तंत्र सांभाळणार आहेत. त्यामुळे हा आठवडा अनेक बाबतीत महत्त्वाचा ठरणार आहे. नोकरीत आजवर न मिळालेले लाभ पदरात पडतील. प्रमोशन मिळण्यात ज्या अडचणी येत होत्या, त्याचे निराकरण होऊन वरिष्ठांना तुमचे हित करण्याची इच्छा होईल. खाजगी नोकरीत मालकाची मर्जी राहील. धंदा उत्तम सुधारेल. त्यातल्या अडचणी कमी होतील. व्यापारी क्षेत्रात मंदीचा फटका बसणार नाही. एखाद्याला नवा उद्योग सुरू करायचा असेल तर त्याला पुष्कळच अनुकूलता आहे. प्रवास होईल. शुभ दिनांक ४–८

**महिलांना :** नोकरीत सोयीसवलती मिळतील, समाधान मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** बुद्धीला नवे क्षेत्र उपलब्ध होईल. □

## इंद्रावती मोहीम

चंद्रपूर–बस्तर जिल्ह्यातील माडिया–गोंड आदिवासींसाठी श्री. बाबासाहेब आमटे यांनी सुरू केलेल्या 'लोकबिरादरी 'तर्फे दवाखाना आणि आधुनिक शेती, जोडधंद्यांचे शिक्षण देणारी आश्रमशाळा चालविली जाते. उपेक्षेच्या अंधारात खितपत पडलेल्या या माणसांची व निसर्गाची मानवी विज्ञानाशी सांगड घालण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे.

घनदाट जंगल आणि निसर्ग संपत्तीचे अमाप वरदान लाभूनही भुकेकंगाल राहिलेल्या अशा आदिवासी भागाचे दुःख तरुणांना जवळून समजून घेता यावे, ते दूर करण्याची डोळस स्फूर्ती यावी, या उद्देशाने 'लोकबिरादरी 'तर्फे वेळोवेळी साहस–सहली आखल्या जातात. या उद्देशाने आदिवासींची जीवनधारा– 'इंद्रावती 'वर मोहीम योजली आहे.

ओरिसात उगम पावलेली इंद्रावती नदी, मध्यप्रदेश–महाराष्ट्रातील माडिया–मुरिया–राजगोंडांना झुलवत महाराष्ट्र–आंध्र सीमेजवळील सोमनूरला गोदावरीला मिळते व पुढे बंगालच्या उपसागरात विलीन होते. कला–विज्ञान, तंत्र–विज्ञान इत्यादी शाखांतील दहा–बारा जाणकार जवानांचा एक जथा घेऊन इंद्रावतीच्या उगमापासून ते संगमापर्यंतचे तीनशे मैलांचे अंतर सुमारे पस्तीस दिवसांत ( २६ जानेवारी–२८ फेब्रुवारी १९७७ ) पायी काटण्याची योजना आहे.

साहसाची आवड व हिंमत अंगी असलेल्या तरुण–तरुणींनी नाव–पत्ता–वय–शिक्षण–पूर्वानुभव इत्यादी तपशीलासह ८ डिसेंबरपूर्वी खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

साहसाला सेवेचे पंख लावून झेपावणाऱ्या 'इंद्रावती मोहिमे 'करिता आर्थिक व इतर साहाय्याचा साभार स्वीकार केला जाईल.

**जगदीश गोडबोले,** सीमा, ब – ७, शिरोळे रोड, पुणे – ४११००४